रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १४३ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹


## कारचे सनरुफ ठरले जीवघेणे



**माणगाव :** ताम्हिणी घाटातून जाणाऱ्या एका चालत्या कारवर दगड पडून महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. माणगावपासून जवळच असलेल्या कोंडेथर गावच्या हद्दीत माणगाव-पुणे रस्त्यावर पुण्याहून गोरेगाव तालुका माणगावकडे येणाऱ्या फोक्स वॅगन कारवर डोंगरातून एक भला मोठा दगड खाली घसरत आला. हा दगड थेट कारवर आदळला. या दगडाचा वेग इतका होता की, कारचे छत ●➤पान ५ वर

## शाब्बास जेमिमा... भारत फायनलमध्ये!

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाने ३३८ धावा केल्यानंतर भारताला हलक्यात घेण्याची चूक केली. पण, मुंबईच्या खेळपट्टीवर क्रिकेटचे धडे गिरवणाऱ्या जेमिमा रॉड्रिग्जने मॅच विनिंग शतक झळकावले. दोन्ही सलामीवीर स्वस्तात माघारी परतल्यानंतर जेमिमाने कर्णधार हरमनप्रीत कौरसह विक्रमी भागीदारी केली. या दोघींच्या खेळीने भारताच्या विजयाच्या आशा पल्लवीत झाल्या आणि जेमिमाने ऑस्ट्रेलियाचा निकाल लावला. भारताने रोमहर्षक विजयाची नोंद करताना महिला वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. भारताला फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेचा सामना करावा लागणार आहे. महिला संघाच्या या विजयानंतर संपूर्ण भारतभर रात्री विजयाचा जल्लोष करण्यात आला.

### वे|ध|क

## न्या. सूर्यकांत नवे सरन्यायाधीश

**नवी दिल्ली :** सरन्यायाधीश बी.आर. गवई यांचा कार्यकाळ २३ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. या पार्श्वभूमीवर आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत यांची भारताचे नवे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. ते २४ नोव्हेंबर रोजी पदभार स्वीकारणार आहेत. केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत यांचे या नियुक्तीबद्दल अभिनंदन केले आणि भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती जाहीर केली. न्यायमूर्ती सूर्यकांत हे २४ नोव्हेंबर रोजी भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. न्यायमूर्ती सूर्यकांत हे सरन्यायाधीश म्हणून सुमारे १५ महिने काम करतील.

## राणीची बाग ६ नोव्हेंबरला बंद

**मुंबई :** गुरुनानक जयंतीनिमित्त बुधवार, ५ नोव्हेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी आहे. तसेच, वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणीसंग्रहालयदेखील साप्ताहिक सुट्टीनिमित्ताने दर बुधवारी बंद असते. मात्र, असे असले तरी राणीची बाग बुधवारी जनतेसाठी खुली ठेवण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे.तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच गुरुवार, ६ नोव्हेंबर रोजी पर्यटकांना बागेत प्रवेश बंद असेल. भायखळा (पूर्व) परिसरातील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणीसंग्रहालय मुंबईकरांची विशेष पसंती मिळते. दररोज शेकडो ●➤पान ५ वर

## चोंढी मारामारी प्रकरण भोवलं

# छोटमला सक्तमजुरी

### २१ जण आरोपी; जिल्हा न्यायालयाने ठोठावली शिक्षा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**चोंढी नाक्यावर घातक शस्त्राने मारहाण केल्याप्रकरणी शिंदे गटातील दिलीप भोईर उर्फ छोटमशेठ यांच्यासह २१ जणांना जिल्हा न्यायालयाने दोषी ठरवत सात वर्षे सक्तमजुरी आणि प्रत्येकी तीन हजार रुपये दंड अशी शिक्षा गुरुवारी (दि.३०) सुनावली. एकूण २५ आरोपींपैकी चार आरोपींची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. प्रमुख जिल्हा न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी ही शिक्षा सुनावली. या प्रकरणात विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. प्रसाद पाटील यांनी काम पाहिले. या निकालाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले होते.** ●➤पान ५ वर




### राजाभाईंना आनंदीआनंद

दिलीप भोईर यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यापासून राजाभाईंचे वजन कमी झाल्याचे चित्र होते. आ. दळवी प्रत्येक निर्णयात दिलीप भोईर यांना विचारात घेऊन राजाभाईंना दूर करीत असल्याने गेल्या कित्येक दिवसांपासून ते नाराज होते. परंतु, आजच्या निकालानंतर राजाभाईंचा मार्ग मोकळा झाल्याची चर्चा सुरू असल्याने राजाभाई खुश झाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

### काय होते प्रकरण?

रुपाली विजय थळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी दिलीप भोईर आणि त्यांच्या साथीदारांनी दि. ११ ऑक्टोबर २०१२ रोजी चोंढी येथील व्हिटेक कॉम्प्युटर क्लासमध्ये घुसून बॅनर्स फाडून, साहित्याची तोडफोड केली. तसेच गैरकायद्याची मंडळी जमवून तलवार, लोखंडी शिगा, स्टम्प्स व लाकडी दांडक्याने मारहाण, धक्काबुक्की व शिवीगाळी केली. फिर्यादींची नणंद मनिष घरत यांचे गंठण खेचून नेले, तसेच त्यांच्या पतींना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

### उमेदवारीचे स्वप्न भंगणार?

दिलीप भोईर गेली काही वर्षे भाजपचे कार्यकर्ते होते. विधानसभा निवडणुकीत महायुतीविरोधात काम केल्याने जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांनी त्यांच्याविरोधात पक्षांतर्गत कारवाई करीत त्यांना निलंबित केले होते. त्यानंतरही ते काही महिने पक्षाचे काम करीत होते. अखेर जिल्हा परिषदमध्ये चांगली जागा देण्याचे आमिष आमदार दळवी यांनी दाखविल्यावर दिलीप भोईर यांनी काही महिन्यांपूर्वी शिंदे गटात प्रवेश केला. नुकतेच जिल्हा परिषदेच्या सदस्यपदांचे आरक्षण जाहीर झाले. मापगाव मतदारसंघात समाधानकारक आरक्षण लागल्याने दिलीप भोईर यांनी उमेदवारीची तयारी केली होती. परंतु, या निकालानंतर त्यांचे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत उभे राहण्याचे स्वप्न पूर्ण होईल का, असा प्रश्न जनमानसातून उपस्थित केला जात आहे. दिलीप भोईर यांनी यापूर्वी आमदारकीचेदेखील स्वप्न पाहिले होते. मात्र, आमदार दळवी यांनीच त्यांचा स्वप्नभंग केला होता, याचीदेखील आता चर्चा आहे.

### हे आहेत आरोपी

दिलीप उर्फ छोटम विठ्ठल भोईर, विक्रम वामन साळुंखे, विक्रांत विश्वनाथ कुडतरकर, मकरंद रवींद्र भोईर, विकेश वसंत ठक्कर, भरत अभिमान्य खळगे, गणेश रमेश म्हात्रे, संतोष वामन साळुंखे, सज्जाद शगीर मुल्ला, गणेश बळीराम भोईर, विवेक विश्वनाथ कुडतरकर, शिशिर शंकर म्हात्रे, हेमंत अनंत केळकर, जयवंत शामराव साळुंखे, विरेश रमेश खेडेकर, प्रभाकर रामचंद्र गवाणकर, प्रसाद दत्ता शिवदे, अशोक शांताराम थळे, मनोज जगन्नाथ थळे, राजेंद्र काशिनाथ ठाकूर, विजय राजाराम ठाकूर.

## निवडणूक आयोगाविरोधात विराट मोर्चा

# हजारोंच्या संख्येने सामील व्हा

### शेकाप नेते जयंत पाटील यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

निवडणूक आयोगाविरोधात शनिवारी (दि.१) मुंबईत विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. महाविकास आघाडीसह मनसेचे असंख्य कार्यकर्ते या मोर्चात सहभागी होणार आहेत. शेतकरी कामगार पक्षाचादेखील या मोर्चात सहभाग असणार आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने या मोर्चात सामील व्हा, असे आवाहन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले आहे.

राज्यातील मतदार याद्यांच्या घोळाबाबत मागील काही दिवसांपूर्वी शेकापसह महाविकास आघाडी व मनसेच्या प्रमुख मंडळींनी निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली. सदोष मतदार याद्या दुरुस्त करून त्या अद्ययावत करा, अशी मागणी



त्यावेळी केली होती. परंतु, त्याची कार्यवाही अद्याप झाली नसल्याने महाविकास आघाडी, मनसेच्यावतीने महामोर्चा काढण्यात येणार आहे. सदोष मतदार याद्या दुरुस्त करून अद्ययावत केल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नका, या मागणीसाठी शनिवारी (दि.१) महाविकास आघाडी-मनसेच्यावतीने विराट मोर्चाचे आयोजन केले आहे. मुंबईतील फॅशन स्ट्रीट चर्चगेट ते आझाद मैदानापर्यंत हा मोर्चा असणार आहे. महाराष्ट्रातील डावे पक्ष हे महाविकास आघाडीचे घटक पक्ष असून, या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी राहण्याचा निर्णय डाव्या पक्षांनी घेतला आहे.

मतदार याद्यांमधील घोळाबाबत निषेध व्यक्त करण्याबरोबरच हक्क आणि अधिकार वाचविण्यासाठी शेतकरी कामगार पक्षदेखील या विराट मोर्चात सहभागी होणार आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील चिटणीस मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, तालुका चिटणीस, तालुक्यातील सर्व सेलचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व कार्यकर्ते यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले आहे.

मोर्चाच्या ठिकाणी फॅशन स्ट्रीट चर्चगेट येथे दुपारी एक वाजण्याच्या सुमारास कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जयंत पाटील यांच्यासह शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी केले आहे.

## बोर्ड परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई :** महाराष्ट्र स्टेट बोर्डानेही परीक्षेच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार, १२ बोर्ड परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. तर, दहावी बोर्ड परीक्षा २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. १२ वी बोर्ड परीक्षा ही फेब्रुवारी महिन्यात शेवटच्या आठवड्यात असते, तर दहावीची परीक्षा ही मार्च महिन्यात सुरू असते. मात्र, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण महामंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२ वी आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वीच्या फेब्रु.-मार्च २०२६ च्या परीक्षांच्या तारखांबाबत शासनाने परिपत्रक जारी केलं असून परीक्षा लवकर होत आहेत.

# आरोपी रोहित आर्यचा एन्काऊंटर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईत पवईतील रा स्टुडिओत १७ मुलांना ओलीस ठेवणारा आरोपी रोहित आर्य याचा पोलिसांनी एन्काऊंटर केला आहे. मुलांना वाचवत असताना आरोपी रोहित आर्य याने पोलिसांवर गोळीबार केला. यावेळी पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात आरोपी रोहित आर्य याच्या छातीत डाव्या बाजूला गोळी लागली आणि त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, असे सांगण्यात येत आहे. दरम्यान, रोहितने ओलीस ठेवलेल्या १७ जणांची सुखरुप सुटका करण्यात आली आहे. गुरुवारी दुपारी ऑडिशनसाठी १७ मुलांना रोहितने ओलीस ठेवले होते. ही सर्व मुलं १० ते १२ या वयोगटातील होती. पोलिसांच्या गोळीबारात




आरोपी रोहित आर्य हा जखमी झाला होता. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. घटनास्थळावरून एक एअरगन आणि केमिकलही पोलिसांनी जप्त केले होते. आरोपी एकटाच होता. आम्ही आरोपीशी बातचीत केली. आणि मुलांना ओलीस का ठेवलं? याचं कारण जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पण, आरोपी आपल्या मागण्यांवर अडून होता. ●➤पान ५ वर

## पोकलनमधील डिझेलचोरी

**रेवदंडा :** पोकलनचालक परप्रांतियाने हातसफाई दाखवित केलेली चोरी उघडकीस आल्याने डिझेल चोरीप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात पोकलन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेवदंडा बायपास रोडवर चिल्डकॉन कंपनीच्या साइडवरील पोकलन क्रमांक ई एक्स २१०/१४९४ वरील चालक बिहार राज्यातील भोजपूर जादीद, नया भोजपुर बक्सर येथील परप्रांतीय, सध्या राहणार चणेरा, ता. रोहामधील २१ वर्षीय दीपक कुमार भोला चौधरी याने दि. २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजण्याचे सुमारास रेवदंडा ●➤ पान ५ वर

# सुरक्षारक्षक वेतनाविना

### पनवेल तहसीलदारांचा मनमानी कारभार

- **कार्यवाहीस दिरंगाई करीत असल्याने आर्थिक संकटात**
- **रायगड जिल्हा सुरक्षारक्षक मंडळाचा आरोप**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

गेल्या सहा महिन्यांपासून सुरक्षारक्षक वेतनाविना अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. वेतन न देणाऱ्या कंपनीविरोधात कारवाई करण्याचे आदेश असताना पनवेलचे तहसीलदार दिरंगाई करीत आहेत. त्यामुळे वसुलीची प्रक्रिया थांबली आहे, असा आरोप सुरक्षा मंडळाने केला आहे. परिणामी, कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तहसीलदारांच्या मनमानी कारभाराविरोधात सुरक्षा रक्षकांमध्ये संताप निर्माण झाला आहे. याबाबत त्यांनी गुरुवारी अलिबागमधील जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी विलास मोरेंसह अन्य मंडळी उपस्थित होते.

> **“वसुली करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाल्यावर कंपनीला नोटीस बजावण्यात आली आहे. कायद्यानुसार नोटीस देण्याची वेगवेगळ्या सहा प्रक्रिया आहेत. त्यामध्ये निधी देण्याची सूचना करणे, मालमत्ता जप्त करणे, अटक करणे अशा अनेक प्रकारच्या नोटीसा बजावल्या जातात. या प्रक्रियेला तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. निम्मी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. कोणत्याही प्रकारची दिरंगाई करण्याचा प्रयत्न केला जात नाही.**
> **– जितेंद्र इंगळे, तहसीलदार, पनवेल (ग्रामीण)”**

मिळालेल्या माहितीनुसार, कळंबोली येथील स्टील ॲथोरिटी ऑफ इंडिया (सेल) मध्ये रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. रात्रीचा दिवस करून हे कर्मचारी सेवा देत आहेत. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून या सुरक्षा रक्षकांचे मानधन कंपनीने थकविले आहे. मानधन थकल्याने सुरक्षा रक्षकांवर उपासमारीची वेळ आली आहे. महिन्यातील खर्चाचा ताळमेळ जुळविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. ●➤ पान ५ वर

# सीफूडच्या कंपनीविरोधात ग्रामस्थ आक्रमक

- **दुर्गंधीमुळे मानवी आरोग्य धोक्यात**
- **भातशेती संकटात असल्याची भीती**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग-वावे मार्गावरील वेलवली खानावनजीक पुष्पाई सीफूड कंपनी आहे. या कंपनीतील दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. कंपनीतील सांडपाणी शेतामध्ये सोडल्याने भातशेतीदेखील नष्ट होत असल्याचा आरोप करीत गुरुवारी सकाळी वेलवली येथील ग्रामस्थांनी या दुर्गंधीविरोधात आक्रमक भूमिका घेतली. कंपनीतील चालकांना घेराव घालत मनमानी कारभाराबाबत संताप व्यक्त केला.



### आजूबाजूच्या गावांना दुर्गंधीचा त्रास

वेलवली येथील पुष्पाई सी फूड कंपनीतील मासळीची दुर्गंधी आजूबाजूच्या गावांना त्रासदायक ठरत आहे. पंधरा दिवसांपूर्वी वढाव गावात दुर्गंधी वाढल्याने अनेकांना त्याचा त्रास झाला होता. त्यामुळे नाक दाबून, दरवाजा बंद करून राहण्याची वेळ ग्रामस्थांवर आल्याची चर्चा समोर आली आहे.

अलिबाग तालुक्यात खानावपासून घोटवडे परिसरात वेगवेगळे प्रकल्प येऊ घातले आहेत. वेगवेगळे लहान मोठे प्रकल्पातील सांडपाणी, दुर्गंधीचे नियोजन केले जात नसल्याने नागरिकांना प्रचंड त्रास होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

वेळवली-खानावनजीक गेल्या अनेक महिन्यांपासून पुष्पाई सीफूड कंपनी आहे. भाड्याच्या जागेत हा प्रकल्प सुरु आहे. समुद्रातील मासळी कंपनीत आणून ती अन्य राज्यात, देश, विदेशात अवजड वाहनांद्वारे पाठविण्याचे काम या कंपनीमार्फत केले जात असल्याची माहिती समोर आली आहे. मुख्य रस्त्याच्या कडेलाच हा प्रकल्प आहे. ●➤ पान ५ वर

> **“वेलवली येथील पुष्पाई सी फूड या कंपनीतून दूषित पाणी सोडले जात आहेत. परिसरात दुर्गंधी पसरत आहे. मुले, इतर मंडळी या दुर्गंधीमुळे आजारी पडू लागली आहेत. भातशेती संकटात आली आहे. रोगराई उद्भवण्याची भीती निर्माण झाली आहे. प्रकल्प येत असताना स्थानिकांचा विचार केला जात नाही. ही मोठी चिंतेची बाब आहे.**
> **– सचिन म्हात्रे, ग्रामस्थ”**

## आरोपीकडे ५० हून अधिक व्हिडिओ

**नवीन पनवेल :** स्पाय कॅमेऱ्याद्वारे स्नान करताना महिलांची व्हिडिओ घेणाऱ्या आरोपीच्या मोबाईलमध्ये पोलिसांना पन्नासहून अधिक व्हिडिओ सापडल्याचे समोर आले आहे. तर, दुसऱ्या मोबाईलमधील व्हिडिओ त्याने डिलीट केले आहेत. त्यादेखील प्राप्त करण्याची प्रोसेस सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. धानसर येथील रियांश फार्म हाऊसमध्ये बाथरूममध्ये लावलेल्या स्पाय कॅमेराद्वारे महिलांची व्हिडिओ काढणाऱ्या आरोपी मनोज चौधरी (रा. रांजणगाव, खारघर) याला तळोजा पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले. एका मोबाईलमध्ये तब्बल ५० पेक्षा अधिक व्हिडिओ सापडल्याची माहिती समोर आली आहे.

### अधिकाऱ्यांना विचारला जाब | पाणीटंचाईविरोधात महाविकास आघाडीचा सिडकोवर मोर्चा

# पनवेलकरांचा पाण्यासाठी आक्रोश

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल शहरात गेल्या काही महिन्यांपासून पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. याविरोधात महाविकास आघाडीने शेकापचे माजी आ. बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली नवीन पनवेल येथील सिडकोच्या कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला. यावेळी सर्व पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने या मोर्चामध्ये सहभागी झाले होते.

नवीन पनवेल शहरातील अनेक इमारतींमध्ये पाणी जात नाही, पाण्यावाचून नागरिकांचे हाल होत आहेत. ऐन दिवाळीतदेखील पाणीटंचाई निर्माण झाली होती. मात्र, नवीन इमारतींना पाणी कुठून मिळते तसेच टँकरने शहरात






पाणीपुरवठा केला जातो, मात्र नळाला पाणी येत नाही, याचा जाब सिडको अधिकाऱ्यांना विचारण्यात आला. यापूर्वी पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी अनेक बैठका झाल्या. मात्र, त्याला यश आले नाही. त्यामुळे हा आक्रोश मोर्चा ३० ऑक्टोबर रोजी काढण्यात आला.

यावेळी भाजपाच्या नगरसेवकांचे फोन गेल्यानंतर त्यांना टँकर मिळतो, मात्र आम्हाला मिळत नाही, असा आरोप यावेळी करण्यात आला.

माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत, माजी सभापती काशिनाथ पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस प्रकाश म्हात्रे, मनसे प्रवक्ता योगेश चिले, बबन विश्वकर्मा, यतीन देशमुख, कामगार नेत्या श्रुती म्हात्रे, पराग मोहिते यांच्यासह अनेक महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक या मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी काही ठिकाणच्या पाईपलाईन लवकरच बदलल्या जाणार असल्याचे सिडकोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

'सिडको प्रशासन जागे व्हा! पाणी द्या, नाहीतर खुर्ची सोडा!' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनादरम्यान सिडकोच्या अधिकाऱ्यांशी महाविकास आघाडीच्या प्रतिनिधींनी चर्चा केली असता, अखेर अधिकाऱ्यांना जाग आली आणि त्यांनी उद्यापासून पाणीपुरवठा नियमित करण्याचं आश्वासन दिलं. जर पुन्हा नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागला, तर पुढील वेळी आम्ही केवळ मोर्चा नव्हे, तर सिडको प्रशासनाच्या निष्क्रियतेविरुद्ध तीव्र आंदोलन उभारू, असा इशारा महाविकास आघाडीने दिला.

# जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे निलंबित

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. कार्यासन अधिकारी प्रेमानंद सोनटक्के यांनी आदेश काढला असून, पदाचा गैरवापर करून कामकाज केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे पाटील यांच्या विरोधात त्यांच्या कार्यपद्धतीबाबत तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीनंतर त्यांची चौकशी करण्यात आली. चौकशीनंतर त्या दोषी असल्याचे आढळून आले. प्राथमिक चौकशी अहवालातील निरीक्षणे विचारात घेता त्यांच्याविरोधात शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्याचे योजिले आहे. त्यांच्याविरोधात निलंबनाची कारवाई तात्काळ करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. हे निलंबन आदेश जोपर्यंत अंमलात आहेत, तोपर्यंत त्यांना खासगी नोकरी स्वीकारता येणार नाही. स्वतःला व्यापार, उद्योगामध्ये गुंतवून घेता येणार नाही. या नियमांचे उल्लंघन केल्यास गैरवर्तन केल्याचा ठपका ठेवून निर्वाह भत्ता मिळविण्यास अपात्र ठरविले जाईल. आदेश अंमलात असेपर्यंत ठाणे येथील आरोग्य सेवा मुंबई मंडळ उपसंचालक हे मुख्यालय राहील. सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही, असे लेखी आदेश काढण्यात आले आहेत.

# रेखाचित्र शाखा कर्मचारी संघटनेचा सुवर्णमहोत्सवी सोहळा

## • मंत्री शिवेंद्रराजे भोसले व भरतशेठ गोगावले यांची उपस्थिती

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य रेखाचित्र शाखा कर्मचारी संघटनेचा सुवर्ण महोत्सवी सोहळा रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी महाड, जिल्हा रायगड येथे विश्वास काटकर, सरचिटणीस राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र त्यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, एच.डी. दशपुते, सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, डॉ. संजय बेलसरे, सचिव जलसंपदा विभाग व लाभक्षेत्र विकास हे उपस्थित राहणार आहेत.

हा कार्यक्रम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य रेखाचित्र शाखा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष जकी अहेमद जाफरी, उपाध्यक्ष रवींद्र बिंड व राहुल साळुंखे, सरचिटणीस सुधीर गभणे, अतिरिक्त सरचिटणीस विनायक जोशी, कोषाध्यक्ष सौ. वंदना परिहार, सहकोषाध्यक्ष अमोल सुपेकर उपस्थित राहणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष जकी अहेमद जाफरी यांनी दिली आहे.

संघटनेच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्याचे औचित्य साधून शनिवार, दि. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता संघटनेच्या आजी व माजी सभासदांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते १० वा. सभासद नोंदणी, १०.३० वा. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, ११.०० वा. मान्यवरांचे स्वागत व सत्कार, ११.३० वा. सरचिटणीस प्रास्ताविक करतील, ११.४० वा. संघटनेचे अध्यक्ष आपले मनोगत व्यक्त करतील, १२.०० वा. मान्यवरांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन, १२.१० वा. प्रमुख अतिथी यांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान, १२.३० वा. मान्यवरांचे व प्रमुख अतिथींचे मनोगत, दुपारी २.०० वा. स्नेहभोजनाचे आयोजन केले आहे.

दुसऱ्या सत्रात दुपारी ३.०० वा. संघटनेचे पदाधिकारी यांचा सत्कार व त्यांचे मनोगत, सायंकाळी ४.३० वा. अध्यक्षीय भाषण, सायंकाळी ५.०० वा. आभार प्रदर्शन व कार्यक्रमाचा समारोप होईल. सुवर्ण महोत्सवी सोहळ्यात कोणतीही कमतरता राहू नये यासाठी कोकण कोअर कमिटीचे सर्व सदस्य अहोरात्र मेहनत घेत आहेत. कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. तरी या कार्यक्रमासाठी संघटनेच्या सर्व सभासदांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष नरेंद्र महाडिक यांनी केली आहे.

## क्षुल्लक कारणावरुन तरुणाला मारहाण

**रसायनी :** थुंकण्याचे कारण विचारल्याच्या रागातून रसायनी रिस येथील २३ वर्षीय तरुणाला चौघांनी धक्काबुक्की करून हेल्मेटने मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विक्रांत ठाकूर हा रिस गाव, रसायनी येथे राहतो. विक्रांत त्याचा मित्र अभिनव जाधव याच्यासोबत मोटारसायकलने ओएनजीसी सिग्रल, पनवेल येथे पोहोचला होता. यावेळी एका कारमधील व्यक्ती कारमधून बाहेर थुंकला, त्याची थुंकी विक्रांतच्या अंगावर उडाली. त्यावर या दोघांनी दुचाकी बाजूला उभी करुन खाली उतरले असता या कारमधून चार जण उतरले. त्यांना विक्रांत याने अंगावर का थुंकलास, असे विचारले असता त्यांच्यात शाब्दिक वाद झाला व पुढे या वादाचे रुपांतर धक्काबुकीत झाले. दरम्यान, या चौघांपैकी एकाने हेल्मेट उचलून विक्रांतला जबरी मारहाण केल्याने तो जखमी झाला. दरम्यान, त्याने मारहाण करणारे चार लोक ज्या कारमधून आले होते, त्यांचा व कारचालकाचा मोबाईलमध्ये फोटो काढला असता त्यांच्यापैकी एकाने विक्रांतच्या दुचाकीची चावी काढून घेतली व फोटो डिलीट कर नाहीतर चावी देणार नाही, असे धमकावत तिथून निघून गेले. या घटनेनंतर विक्रांत याने पनवेल शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी या चौघांविरोधात गुन्हा नोंद करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे खोपोली, ता. खालापुर, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहेत, या मिळकतींचे मालक १.प्रमोद विठ्ठल जाधव, २. अनिता विठ्ठल जाधव, यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

मौजे खोपोली, ता. खालापुर, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे आमच्या मालकीच्या व नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| नगर भुमापन क्रमांक (सिटी सर्व्हे क्रमांक) | क्षेत्रफळ आर.चौ.मी. |
|---|---|
| १०६३ | १०७० पैकी ७१० चौ. मी. |
| १०४७ | १४४० चौ. मी. |

सिटी सर्व्हे मध्ये रुपांतर होणेपूर्वी वरील मिळकतीचा मौजे चिंचवली शेकीन, ता. खालापुर, जि. रायगड येथील, बिनशेती सर्व्हे नंबर ४१ + ४२-३+४ब +३ चा प्लॉट क्रमांक ०५ असा होता.

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणा-या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३१ ऑक्टोबर २०२५

**ॲड.शरद आर.सावंत**
बी. कॉम. एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

### MAHATRANSCO — SRM E–TENDER NOTICE (THIRD CALL)

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 01 | **Tender No:** EE/EHV (O & M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender-21/IIIrd Call/2025-26 Dtd:- 31.10.2025. **RFx No. 7000038017** | **Sub:-** Third Call for SRM E-Tender for Supply of 5kV Digital Insulation Tester at 100/22kV Roha Substation under EHV (O&M) Division Mahad | Rs. 5,04,278/- (Including GST) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST. Bid submission is from 31.10.2025 @ 00:00 hrs to 09.11.2025 @23:59 Hrs for above tender. For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in**.

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.8793505100

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer (I/c)**
**EHV (O&M) Dn. Mahad**

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**सूचना क्र. 13/2025-26**

क्षेत्रीय रेल्वे प्रबंधक, रत्नागिरी, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (केआरसीएल) यांच्या वतीने, क्षेत्रीय यातायात प्रबंधक यांनी माणगाव रेल्वे स्थानकासाठी स्थानक तिकीट बुकिंग एजंट (एसटीबीए) नियुक्तीकरिता निर्धारित स्वरूपातील (हस्तांतरित न होणाऱ्या) सीलबंद निविदा (एकल बोली प्रणाली) तीन वर्षांच्या करार कालावधीसाठी मागविल्या आहेत. निविदा अर्जाचे दस्तऐवज माणगाव स्थानकाच्या स्थानक अधीक्षकांच्या कार्यालयातून किंवा कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या क्षेत्रीय यातायात प्रबंधक कार्यालय, एमआयडीसी, मिरजोळे, रत्नागिरी येथून ₹1180/- (जीएसटीसह) इतक्या दराने प्रत्येक निविदा फॉर्मसाठी खरेदी करता येतील. हे दस्तऐवज सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10:00 ते दुपारी 16:00 या वेळेत 30/10/2025 ते 28/11/2025 या कालावधीत उपलब्ध राहतील. **निविदा क्र.: केआर/आरटीएम/आरएन/सीओएमएल/मिनी/एसटीबीए, दिनांक: 23/10/2025, निविदा सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ:** 01/12/2025 दुपारी 12:30 वाजेपर्यंत. **निविदा बॉक्स उघडण्याची वेळ:** 01/12/2025 दुपारी 12:40 वाजता.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र. २४०/२०२५

मुसा हुसैन जळगावकर
रा.साई ता.माणगाव जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
साई ग्रामपंचायत साई
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.ताहीरा हसन जळगावकर यांचा जन्म/मृत्यू मौजे साई ता.माणगांव जि.रायगड या ठिकाणी दि.१०/११/१९६४ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१६/१०/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू साई येथे दि.१०/११/१९६४ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३(३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. १०/११/१९६४ रोजी साई ता.माणगांव जि.रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : २९/१०/२०२५

सही/-
**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

### जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र. /२०२५

मुकेश नामदेव रव्ते
भागाड — अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
भागाड ग्रामपंचायत भागाड
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.कांता नामदेव रव्ते यांचा जन्म/मृत्यू मौजे भागाड ता.माणगांव जि.रायगड या ठिकाणी दि.२/०९/१९८८ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.०९/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू भागाड येथे दि.२/०९/१९८८ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. रोजी भागाड ता.माणगांव जि.रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : २९/१०/२०२५

सही/-
**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

### जाहीर निविदा
**ग्रुप ग्रामपंचायत दाखणे ता. माणगाव . जि. रायगड**

ग्रुप ग्रामपंचायत दाखणे ता.माणगाव सन - २०२४/२५ या वर्षातील १५ वा वित्त मधून खालील विकास कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत ठेकेदाराकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | १ टक्के इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेची अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रा.जि.प शाळा खर्डी बु मागे गटार बांधकाम करणे. | ८२६६८/- | ८२७ | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.०० वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| २ | खर्डी बु शंकर मंदिरात जवळील विहिरीतील गाळ काढणे व दुरस्ती करणे | ८००००/- | ८००/- | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.०० वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| ३ | रा.जि.प शाळा कोशिंबळे/निजामपूर शाळेसमोर पेव्हर ब्लॉक बसविणे | ९८००१/- | ९८०/- | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.००वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| ४ | खर्डी बु महिलांना कपडे धुण्यासाठी धोबी घाट बांधणे | ३००००/- | ३००/- | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.००वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| ५ | खर्डी बु अंगणवाडी गटार बांधणे | ३२६६७/- | ३२७/- | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.०० वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| ६ | चव्हाणवाडी अंगणवाडी पेव्हर ब्लॉक बसविणे | ३९२००/- | ३९२ | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.०० वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| ७ | दाखणे बौद्धवाडी गटार बांधणे | ६८६००/- | ६८६/- | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.०० वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| ८ | दाखणे बौद्धवाडी महिलांना कपडे धुण्यासाठी धोबी घाट बांधणे | ६००००/- | ६००/- | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.०० वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| ९ | चव्हाणवाडी आदिवासीवाडी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. | ८२३२०/- | ८२३/- | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.०० वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| १० | खर्डी बु अंतर्गत गटार बांधकाम करणे | १४२७३५/- | १४२७/- | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.०० वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| ११ | दाखणे न.पा.पु योजनेच्या विहिरीकडे जाणारा रस्ता करणे | १०७६७०/- | १०७६/- | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.०० वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| १२ | शिवराम बाजी उभारे सभागृह समोर पेव्हर ब्लॉक बसविणे | १७२४८३/- | १७२५/- | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.०० वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | १५ वा वित्त आयोग २०२४/२५ |
| १३ | १५%मागासवर्गीय खर्च व १०%म.बा.कल्याण खर्च करणे | याबाबत सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात | | १०० | ३ महिने | ०६/११/२०२५ | सायंकाळी ५.००वा पर्यंत | ग्रामपंचायत कार्यालय | ग्रामनिधी २०२५/२६ |

**अटी व शर्ती-** १) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आवश्यक असलेस फी भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल
२) अंतिम तारखेस दिनांक-०६/११/२०२५ रोजी सांय-५ नंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३) प्राप्त निविदा दिनांक ०७/११/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थितांच्या समक्ष मा. प्रशासक यांच्या हस्ते उघडण्यात येईल.
४) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता रद्द करणेचा अधिकार मा. प्रशासक यांना राखून ठेवला आहे.
५) प्रत्येक देयकातून आयकर व उप करांची कपात केली जाईल. तसेच सुरक्षा अनामत व शासन नियमाप्रमाणे इतर रक्कम कपात केली जाईल.
६) पंचायत समिती माणगाव कडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे प्रशासक यांचे मार्गदर्शनाखाली व देखरेखेखाली काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेला आहे.
७) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यापर्यंत देखभाल दुरुस्ती संबंधित ठेकेदाराने करावयाचे आहेत. व त्यानंतर सुरक्षा अनामत परत केली जाईल.

**श्रीम. अपेक्षा दिलीप लकेश्री**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत दाखणे**

**श्री. मधुकर प्रभू फड**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत दाखणे**

### महाराष्ट्र शासन
**अपर आयुक्त, आदिवासीविकास, ठाणे.**

सत्यमेव जयते

एम.टी.एन.एल. वागळे इस्टेट यांचे कार्यालयीन आवार, रोड नं. १६, टोयोटो शोरूम समोर, ठाणे. (प.) ४००६०४.
Email ID : atc.thane-mh@gov.in दुरध्वनी क्र. ०२२-२५८२३५२८, २५८००६३७, २५८३३८२२.

**ई-निविदा सूचना क्रं. १,२,३/२०२५**

अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचे अंतर्गत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार, डहाणू जि. पालघर, शहापूर जि. ठाणे, पेण जि. रायगड, घोडेगाव जि. पुणे, सोलापूर जि. सोलापूर या प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय आश्रमशाळा व अनुदानीत आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांकरीता विभागीय क्रिडा स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. तरी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये विभागीय स्तरीय क्रीडा स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांचे सोबत असणाऱ्या शिक्षकांसाठी व अतिथी मान्यवरांसाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्था, विद्यार्थ्यांकरीता स्पोर्ट किट व ईव्हेंन्ट मॅनेजमेंट करणे करिता दर मंजूरी करीता अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे हे पुरवठा करणारे मान्यता प्राप्त उत्पादक/पुरवठादार/ठोक विक्रेते इत्यादि यांचे कडून सदरच्या क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी दोन लिफाफा पद्धतीनुसार (टू-बिड) ई निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करुन जाहीर ऑनलाईन. निवीदा मागविण्यांत येत आहेत. निविदा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | वस्तूचे नांव | अंदाजित रक्कम रुपये (सर्व करांसह) | निविदा फॉर्मची किंमत परत न मिळणारी | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | विभागीय क्रीडा स्पर्धा करिता स्पर्धकांसाठी स्पोर्टस् शुज, सॉक्स, शर्ट, शॉर्ट पॅन्ट, ट्रॅकसुट, कॅप पुरवठा करणेबाबत दर मंजूर करणे | रु.७०.८० लाख | रक्कम रु.१८०००/- | रु.१ लाख ८० हजार मात्र |
| २ | विभागीय क्रिडा स्पर्धेच्या वेळी नाश्ता, चहा व भोजनासाठी इ. आवश्यक असणारे दर मंजूर करणे | रु.५३.९६ लाख | रु.१८०००/- | रु.१ लाख ८० हजार मात्र |
| ३ | विभागीय क्रीडा स्पर्धेकरीता आवश्यक साहित्याचे व कामाचे भाड्याचे दर मंजूर करणे | रू.२७.३१ लाख | रू. ५४००/- | रू. ९० हजार मात्र |

वरीलप्रमाणे दिनांक ३१.१०.२०२५ रोजी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा प्रसिद्ध करण्यात येत असून मान्यता प्राप्त उत्पादक/पुरवठादार/ठोक विक्रेते इत्यादि यांचे कडून सदरच्या क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी दोन लिफाफा पध्दतीनुसार (टू-बिडा ई निवीदा कार्यप्रणालीचा अवलंब करुन जाहीर ऑनलाईन निवीदा मागविण्यांत येत आहेत. सदरची निविदा दि.३१.१०.२०२५ ते दि.१४.११.२०२५ पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**सही/-**
**(गोपिचंद कदम, भा.प्र.से.)**
**अपर आयुक्त,**
**आदिवासी विकास, ठाणे**

### जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र. ५१६/२०२५

शगुफ्ता जावेद दाखवे
रा.वडवली ता.माणगाव जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
वडवली ग्रामपंचायत वडवली
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.जावेद युसूफ दाखवे यांचा जन्म/मृत्यू मौजे वडवली माणगांव ता.माणगांव जि.रायगड या ठिकाणी दि.३०/१२/१९७४ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.२५/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे जन्म/मृत्यू वडवली येथे दि.३०/१२/१९७४ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३(३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे जन्म/मृत्यू दि. ३०/१२/१९७४ रोजी वडवली ता.माणगांव जि.रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : २९/१०/२०२५

सही/-
**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

### ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता. माणगाव, जि. रायगड. जाहीर निविदा

नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि. ३०/१०/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत भाले यांचेकडील १५ वा वित्त आयोग/ग्रा.प.फंड अंतर्गत खालील कामाकरीता अधिकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फी | इसारा फी | निविदा /दरपत्रक स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा /दरपत्रक उघडणेचा दिनांक | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हौदाची आळी सामाजिक सभागृह येथे पाणीसुविधा करणे | १५ वा वित्त आयोग | २००००/- | २००/- | २००/- | ०६/११/२०२५ | ०७/११/२०२५ | ६ महिने |
| २ | व्यायामशाळेकरीता पाणीसुविधा करणे | १५ वा वित्त आयोग | १३९३८/- | २००/- | १३९/- | ०६/११/२०२५ | ०७/११/२०२५ | ६ महिने |
| ३ | ग्रामपंचायत क्षेत्रात स्वच्छता संदेश/घोषवाक्य भित्तीचित्रे, इ. रंगविणेकरीता प्रति चौरस फूट क्षेत्राकरीताचे दरपत्रक पुरविणे | ग्रा.पं. फंड | आवश्यकतेनुसार | - | - | ०६/११/२०२५ | ०७/११/२०२५ | ६ महिने |

**अटी व शर्ती :** १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. ०६/११/२०२५ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा. उपअभियंता (ग्रा.पा.पु./बांध) उपविभाग माणगाव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा. सरपंच ग्रा.पं. भाले यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगाव, जि. रायगड**

### पाली नगरपंचायत
**ता. सुधागड, जि. - रायगड. पिन - ४१०२०५**
ईमेल - palinagarpanchayat2021@gmail.com

जावक क्र.-नपंपा/पापु: ११५९ : २०२५-२०२६ — दिनांक :-२७/१०/२०२५

**जाहीर ऑफ लाईन निविदा सूचना**

पाली नगरपंचायत जि. रायगड यांस कडून खालील कामांसाठी राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गातील नोदविलेल्या अनुभवी व इच्छुक ठेकेदाराकडून ब-१ नमुन्यातील निविदा द्विनोंद लिफाफा पद्धतीने ऑफलाईन सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म फी | इसार रक्कम रु |
|---|---|---|---|---|
| १ | पाली नगरपंचायत हद्दीतील विक्रम स्टँड समोरील मोरवी बांधकाम करणे | रु.४,९९,९१८/- | ५००/- | ४९९९/- |

**कामाच्या अटी व शर्ती**

१. निविदा फॉर्म विक्री कार्यालयीन वेळेत दि.३१/१०/२०२५ ते १२/११/२०२५ पर्यंत सकाळी १०.३० ते ५.३० पर्यंत आवक जावक विभागात राहील.
२. I) निविदे सोबत लखोटा क्र. १ मध्ये तांत्रिक बोलीबाबतची पुढील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
I) महाराष्ट्र राज्य शासनाचा बांधकाम विभागाचा नोंदणीकृत प्रमाणपत्र २) इसारा रक्कमेचा राष्ट्रीयकत बँकेचा धनाकर्ष/धनादेश ३) पॅनकार्ड ४) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र ५) कामगार भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र ६) इनकम टॅक्स रिर्टन मागील ३ वर्षे ७) परिशिष्ट अ मधील प्रतिज्ञापत्र ८) कामाचे अनुभव प्रमाणपत्र.
II) निविदे सोबत लखोटा क्रं. २ मध्ये अर्थिक बोलीचा लिफाफा सादर करणे आवश्यक आहे.
३. निविदा फॉर्म व इसारा रक्कमेचा राष्ट्रीयकत बँकेचा धनाकर्ष दि. /१०/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.
४. निविदा शक्य झाल्यास त्यास दिवशी ४.३० वाजता अथवा कार्यालयाचाचे प्रशासकीय सोईप्रमाणे उघडणेत येतील.
५. सर्शत निविदा नाकारली जाईल कोणतीही एक निविदा स्विकारणेचा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा अधिकार नगरपंचायत राखुन ठेवला आहे.
६. कामासंबधी अतिरिक्त माहीती नगरपंचायत बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.
७. अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जादा दराची निविदा मंजूर केली जाणार नाहीत.

सही/-
**नगरअभियंता**
**पाली नगरपंचायत, पाली**

सही/-
**मुख्याधिकारी**
**पाली नगरपंचायत, पाली**

## निवडक



### सिडकोतर्फे भ्रष्टाचारविरोधात 'दक्षता जनजागृती' प्रभातफेरी

**पनवेल :** केंद्रीय दक्षता आयोगातर्फे भ्रष्टाचारविरोधी जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने सिडको महामंडळाध्ये दि. २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्ताने बुधवारी (दि.२९) दक्षता जनजागृती सप्ताहाविषयी नागरीकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी सिडकोतर्फे प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रभातफेरीत सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी, पोलीस उपमहानिरीक्षक तथा मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्यासह सिडकोचे विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी यांनी देखील मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ही प्रभातफेरी सिडको भवन ते बेलापूर सेक्टर ११ पर्यंत आयोजित करण्यात आली होती.

### पनवेल शहरातील कॉर्पोरेट जगातील काळं सत्य उघडकिस

**पनवेल :** पनवेल शहरातून कॉर्पोरेट जगतातील काळं सत्य उघडकीस आले आहे. विमा कंपनीत उच्च पदावर कार्यरत असलेल्या एका शाखा व्यवस्थापकाने आपल्या महिला सहकाऱ्याशी पाहुणचाराच्या बहाण्याने रचलेली घातक योजना अखेर उघड झाली आहे. या घटनेने पनवेल परिसरासह व्यावसायिक क्षेत्रात मोठी खळबळ माजली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव प्रदीप नामदेव नरळे (३४) असे असून तो अंधेरी येथील एका विमा कंपनीत ब्रँच मॅनेजर म्हणून काम करत होता. त्याच्यासोबत गुन्ह्यात पती रेणुका नरळे आणि भाऊ प्रविण नरळे हेही सहभागी असल्याचे तपासात समोर आले आहे. हे दोघे सध्या फरार असून पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रदीप नरळेची ओळख नागपूर शाखेत कार्यरत असलेल्या ३२ वर्षीय महिला सहकाऱ्याशी कंपनीच्या ऑनलाइन मीटिंगदरम्यान झाली होती. कामाच्या निमित्ताने वाढलेले संभाषण पुढे वैयक्तिक नात्यात बदलले. त्यानंतर २७ मार्च रोजी कामानिमित्त मुंबईत आलेल्या महिलेला नरळेने पनवेल येथील आपल्या घरी बोलावले. पाहुणचाराच्या बहाण्याने जेवणात गुंगी आणणारे औषध मिसळून ती शुद्ध हरपल्यावर तिच्यावर लैंगीक अत्याचार करण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे या संपूर्ण घटनेचे चित्रीकरण त्याची पत्नी रेणुका नरळे हिने केल्याचे पुरावे मिळाले आहेत. त्यानंतर या दाम्पत्याने व्हिडिओ दाखवून संबंधित महिलेला धमकावत तिच्याकडून लाखो रुपयांची खंडणी उकळली. त्रस्त झालेल्या महिलेने अखेर धैर्य एकवटून पोलिसांत तक्रार नोंदवली. तक्रार मिळताच पोलिसांनी सापळा रचून प्रदीप नरळे याला ताब्यात घेतले. त्याच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.



### सिडको भवनात व्याख्यानाचे आयोजन

**पनवेल :** सिडको भवन येथे दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त गुरुवारी (दि.३०) सिडकोचे माजी मुख्य अभियंता के.के. वरखेडकरयांचे 'कॉन्ट्रॅक्ट ड्राफ्टिंग : सिलेक्शन ऑफ इक्विटेबल कंडिशन्स अ‍ॅण्ड इनकॉर्पोरेशन ऑफ सीव्हीसी गाईडलाईन्स टू एन्श्युअर फेअरनेस विथ ट्रान्सपरन्सी', तर कायदेतज्ज्ञ सुशील गुप्ता यांचे 'डिस्प्युट रेझोल्युशन बाय वे ऑफ रिकन्साइलेशन अ‍ॅण्ड आरब्रिट्रेशन विथ ट्रान्सपरन्सी' या विषयांवर व्याख्यान पार पडले. यावेळी सिडकोच्या मुख्य अभियंत्या शीला करुणाकरन, दीपक हरताळकर, व्यवस्थापक विनू नायर, सिडको एम्प्लॉईज युनियन अध्यक्ष सुभाष पाटील यांसह सिडकोतील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वरखेडकर यांनी, बांधकाम क्षेत्रामध्ये असलेले करार मसुदा लेखनाचे महत्व विशद करून कराराचा मसुदा सुस्पष्ट असल्यावर करार करणाऱ्या पक्षांमध्ये विश्वास निर्माण होऊन, अधिक वाद निर्माण न होता प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करणे शक्य होते, असे प्रतिपादन केले. तसेच, गुप्ता यांनी वादांचे निराकरण करण्याकरिता उपलब्ध असलेल्या सलोखा (ॲमिकेबल), न्यायालयीन लढाई (लिटिगेशन), मध्यस्थी (मेडिएशन), समेट (कन्साइलेशन), वाटाघाटी (निगोसिएशन) आणि लोक अदालत या विविध मार्गांबद्दल सविस्तर माहिती दिली.

# अवकाळी पावसाने रायगडकरांचे अर्थकारण कोलमडले

- जिल्ह्यातील भात पिकाची माती
- पर्यटन स्थळांकडे पर्यटकांनी फिरवली पाठ



**। रायगड । प्रतिनिधी ।**

बंगालच्या उपसागरातील मोंथा चक्रीवादळाचा प्रभाव रायगड जिल्ह्यावर दिसत आहे. वादाळाने जिल्ह्यातील भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकरी वर्गावर संकटांचा डोंगर उभा राहिला आहे. तसेच, मासेमारी आणि जलवाहतूक देखील पूर्णतः बंद झाली आहे. त्याचा परिणाम पर्यटनावर झाल्याने रायगड जिल्ह्याची अर्थव्यवस्थाच अडचणीत आली आहे.

सध्या देशात मोंथा चक्रीवादळाचे संकट घोंगावत आहे. त्यामुळे बंगालच्या उपसागरासह अरबी समुद्रात देखील त्याचा प्रभाव दिसून येत आहे. परिणामी अवकाळी पावसाने प्रचंड प्रमाणात जोर धरला आहे. त्यामुळे राज्यासह जिल्ह्यातील तयार झालेल्या भातपीकाची अक्षरशः माती झाली आहे. मोठ्या कष्टाने वाढवलेल्या भात पिकाकडे पाहताना शेतकऱ्यांना रडू येत आहे. शेतकरी साचलेल्या पाण्यातून पीक जमा करुन घरात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच, खलाटीत सर्वत्र पाणीच पाणी झाल्याने कोणकोणत्या पिकाचे पंचनामे करायचे, असा प्रश्न पंचनाम्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांनाही पडू लागला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांवर आर्थिक संकटासह उपासमारीची वेळ ओढावली आहे. जिल्ह्यातील भातशेतीचे मोठे नुकसान झाल्यामुळे सरसकट पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

त्याचबरोबर चक्रीवादळाच्या प्रभावामुळे मुसळधार पावसाबरोबर, जोराचे वारे सुटत असल्याने मच्छिमारांना खोल समुद्रात मासेमारी करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ५ हजार ४१७ मासेमारी नौका २३ ऑक्टोबरपासून विविध बंदरांमध्ये नांगरलेल्या स्थितीत आहेत. या नौकांवरील लाखो कामगारांचा रोजगार बुडत आहे. त्यात मच्छिमारांचे करोडोंचे नुकसान होत आहे.

#### ७० टक्के शेतीचे नुकसान

कृषी विभागाने २०२५च्या खरीप हंगामासाठी ८१ हजार ३३५ हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. जेमतेम ७० हजार क्षेत्रावरच भात पिकाची लागवड करण्यात आली आहे. कृषी विभागाच्या २३ ऑक्टोबरपर्यंत झालेल्या पंचनाम्यांनुसार ६९१ गावातील ५ हजार ६४२ शेतकऱ्यांचे १ हजार ६९८ हेक्टर क्षेत्रावरील भातपीकाचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार नुकसान ७० टक्क्यांच्या आसपास आहे.

त्याचबरोबर वातावरणातील बदलामुळे जिल्ह्यातील पर्यटन व्यावसायिकांची देखील निराशा झाली आहे. दिवाळी हा पर्यटनाचा मोठा हंगाम मानला जातो. मुंबई, पुण्याचे लाखो पर्यटक जिल्ह्यातील पर्यटन स्थळांना भेट देत असतात. परंतु, दिवाळी संपताच पावसाने पर्यटकांची वाट अडवली. त्यातच जिल्ह्यातील जलवाहतूक बंद झाल्याने मुंबईवरून येणाऱ्या पर्यटकांना अलिबाग, मुरूड आणि श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन स्थळांना भेट देताना मोठ्या संकटांचा सामना करावा लागत आहे. तसेच, मुरूड तालुक्यातील जंजिरा व पद्मदुर्ग किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांना जाता आले नाही. त्यामुळे नोंदणीकृत हॉटेल्स, ट्रॅव्हल एजंट्स, गाईड्स यांची साखळी विस्कळित झाली आहे. त्यामुळे पुढेही अशीच परिस्थिती कायम राहिली तर ऐन हंगामात पर्यटक जिल्ह्यातील पर्यटन स्थळांकडे पाठ फिरवतील हे नक्की.

अशा नैसर्गिक संकटांमुळे शेतकऱ्यांसह मच्छिमार बांधव आणि पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या व्यवसायिकांवर उपासमारीची वेळ उद्भवणार आहे. परिणामी रायगड जिल्ह्याची अर्थव्यवस्थाच अडचणीत येत आहे.

# श्रीवर्धनमधील जेट्टीमुळे पाण्याच्या पातळीत वाढ

- दगडांच्या भरावामुळे खाडीचे तोंड बंद
- किनारपट्टीवरील पर्यटन नष्ट होण्याची भीती



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धनमधील जीवनाबंदर या ठिकाणी नवीन जेट्टीचे काम सुरू आहे. या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात भराव करून जेट्टी बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्याचप्रमाणे श्रीवर्धन दांडे परिसरात देखील नवीन जेट्टी विकसित करण्यात येत आहे. या जेट्टीकडे जाणाऱ्या मार्गासाठी दगडांचा मोठ्या प्रमाणात भराव करून खाडीचे तोंडच जवळजवळ बंद झाल्याने, श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील पाण्याची पातळी सातत्याने वाढत आहे. पाण्याची पातळी वाढल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी ओहोटीच्या वेळेस सुद्धा पाणी मागे जात नसल्याने येणाऱ्या पर्यटकांमधून प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. शासनाने विकास कामे जरूर करावीत, परंतु विकास कामे करत असताना त्यांचा योग्य अभ्यास होणे देखील गरजेचे आहे. विकास कामे करताना जर का श्रीवर्धन किनारपट्टीवरील पर्यटनच नष्ट होणार असेल तर श्रीवर्धन येथील पर्यटकांचा ओघ कमी झाल्याशिवाय राहणार नाही, अशी शंका नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे. सायंकाळच्या वेळेस समुद्राला भरती असताना खाडी जवळ फेरफटका मारला असता खाडीमधील अनेक भूभागात वाळू दिसत होती. पर्यायाने खाडीमध्ये भरतीचे पाणी जात नसल्यामुळे श्रीवर्धन किनारपट्टीवर पाण्याची पातळी वाढली आहे.

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे मार्गदर्शन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या सभागृहात मंगळवारी (दि.२८) जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विद्यमाने ज्येष्ठांना 'वरिष्ठ नागरिकांचे अधिकार' या विषयावर मार्गदर्शन व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. त्याचा लाभ अनेक ज्येष्ठ नागरिकांनी घेतला.

यावेळी प्राधिकरणाचे अध्यक्ष न्यायमूर्ती तेजस्विनी निराळे व ॲड. कामटे यांनी सभागृहास ज्येष्ठांच्या कायद्यानबाबत उपयुक्त माहिती दिली. त्यानंतर वरिष्ठ नागरिकांना सांभाळण्याची जबाबदारी पाल्यांची असते, परंतु, काही पाल्यांना वृद्ध व्यक्ती घरात असणे हे अडचणीचे वाटते. त्यांना आर्थिक सहाय्य करण्यास व पालनपोषण करण्यास जे पाल्य नकार देतात. त्यांच्यावर कार्यवाही करून फौजदारी प्रक्रिया सुरू करता येते. कायदेशीर रित्या त्यांना पोटगी देण्यास भाग पाडता येते. याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच, वृद्धांसाठी कल्याणकारी योजना व त्यासाठी असलेल्या कायद्यांची माहिती न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांनी दिली. यावेळी जेष्ठ नागरिक संस्थेच्या उपाध्यक्ष चारुशीला कोरडे, सचिव नंदकुमार तळकर, खजिनदार प्रणिता वर्तक, द्वारकानाथ नाईक, आर.के. घरत, दिलीप शिंदे, मेघना कुलकर्णी, ज्योती पाटील, हेमंत राऊत, मनोहर सुर्वे, व शरद कोरडे, अजय पाटील व नितल म्हात्रे उपस्थित होत्या.

## पनवेल महापालिकेतर्फे लोकशाही दिन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी ३ नोव्हेंबर रोजी मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली पनवेल महापालिका मुख्यालयात लोकशाही दिन घेण्यात येणार आहे. नागरिकांच्या तक्रारी व अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे, असे आवाहन पनवेल मनपातर्फे करण्यात आले आहे.

## निवडणुकीचे काम समन्वयाने करावे

### जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे निर्देश

**। रायगड । प्रतिनिधी ।**

नजिकच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम निवडणूक आयोगाकडून अधिकृतपणे जाहीर होईल. या पार्श्वभूमीवर संबंधित सर्व शासकीय यंत्रणांनी आतापासूनच कामाला लागावे, आपापसात समन्वय राखून सर्वांनी एकदिलाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संभाव्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी पोलीस यंत्रणांसह विविध शासकीय यंत्रणांची दूरदृश्यप्रणालीद्वारे पूर्वतयारी आढावा बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके, जिल्ह्यातील व नवी मुंबई वरिष्ठ पोलीस निरिक्षक, प्रांताधिकारी, तहसिलदार उपस्थित होते. या आढावा बैठकित जिल्हाधिकारी जावळे यांनी, निवडणुकीच्या आवश्यकतेप्रमाणे अधिकारी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या दृष्टीने सर्व विभागांनी मनुष्यबळाचा डाटाबेस तयार करावा. सर्व शासकीय यंत्रणांनी आतापासूनच आगामी निवडणुकीच्या दृष्टीने तयारीला लागावे. संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी मतदान केंद्र मतदारांसाठी सोयीस्कर असेल, त्यांच्यासाठी त्या ठिकाणी आवश्यक सर्व सोयीसुविधा व्यवस्थित असतील, अपंग मतदारांसाठीची व्यवस्था अत्यंत चोख असेल, याची वैयक्तिक खात्री करावी. सर्व मतदान केंद्र स्वतः तपासावीत. त्याचप्रमाणे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक सर्व कार्यवाही आणि कारवाया तात्काळ कराव्यात. नियमितपणे एकमेकांच्या संपर्कात राहावे, अशा सुचना दिल्या.

## रेल्वे जंक्शनसाठी आमरण उपोषण

**। महाड । प्रतिनिधी ।**




महाड शहराला ऐतिहासिक आणि औद्योगिक महत्त्व असतानाही रेल्वे जंक्शन नसल्याने होणारी गैरसोय दूर करण्यासाठी राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहराध्यक्ष पराग वडके यांनी बुधवारी (दि.२९) येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आमरण उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला होता. तसेच, मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात वडके यांनी महाडच्या रेल्वे जंक्शनच्या मागणीवर प्रकाश टाकला आहे.

महाड हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याची राजधानी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रह केलेले चवदार तळे याच शहरात असल्याने ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. महाडला जर रेल्वे जंक्शन मिळाले तर येथील पर्यटनाला चालना मिळेल, औद्योगिक वसाहतीतील मालवाहतूक सुलभ होईल, मुंबईत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवास सोपा होईल आणि महाडसह पंचक्रोशीतील जनतेला मुंबईकडे ये-जा करणे अधिक सुलभ होईल, असे त्यांनी बोलताना सांगितले. तसेच, दरवर्षी पावसाळ्यात सावित्री नदीच्या पुराने महाडमध्ये होणारे नुकसान लक्षात घेऊन, वडके यांनी कोकण रेल्वेच्या पुलामुळे पाणी अडकून राहत असल्याचे निदर्शनास आणले. त्यावर उपाय म्हणून हा पूल हलवून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत रेल्वे पटरी तयार करून महाड शहर व एमआयडीसी दरम्यान रेल्वे जंक्शन उभारण्याची मागणी त्यांनी केली आहे. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष रविंद्र चव्हाण, तालुकाध्यक्ष संदीप सकपाळ आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## सुतारवाडी परिसरामध्ये पावसाचा धुमाकूळ

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

यंदा मे महिन्यापासूनच पावसाने हजेरी लावली होती. आता ऑक्टोबर महिना संपला तरी पाऊस परतीचा प्रवास करत नसल्यामुळे बळीराजा समोर मोठे संकट उभे राहिले आहे. दरम्यान, सुतारवाडी आणि परिसरामध्ये काही प्रमाणावर भात कापणी झाली. तर, काही ठिकाणी अद्यापही भात शेतातच आहेत. अशा ठिकाणी पावसामुळे शेतात पाणी साचून राहिले आहे. तसेच, भात कापून ठेवलेल्या ठिकाणी देखील पावसाचे पाणी शिरले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतला आहे. त्यामुळे बळीराजा समोर मोठे संकट उभे राहिले आहे.

## हरवलेली वृद्ध महिला नातेवाईकांच्या ताब्यात

**। पनवेल। प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील कोप्रोली गावातील जिल्हा परिषद शाळेजवळ एक ८० वर्षी वृद्ध महिला सापडली होती. पनवेल तालुका पोलिसांनी त्या वृद्ध महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या ताब्यात देण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, वंचाबाई केशव सानप (८०) असे या वृद्ध महिलेचे नाव आहे. हि महिला पनवेल तालुक्यातील कोप्रोली गावातील जिल्हा परिषद शाळे जवळ स्थानिकांना सापडली होती. स्थानिकांनी तिची चौकशी केली असता या वृद्ध महिलेला आपला पत्ता नीट सांगता येत नव्हता. त्यामुळे स्थानिकांनी त्यांना पनवेल तालुका पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी या महिलेच्या हरविल्याची तक्रार दाखल आहे का, याची चौकशी करण्यात आली. त्यानंतर गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गीजे यांच्या मदतीने त्या वृद्ध महिलेला तिची सून अलका सूर्यभान सानप यांचा शोध घेऊन त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सतरावे पुण्यस्मरण



कै.सौ.चांगुणाबाई श्रीधर पाटील
स्वर्गवास :३१ ऑक्टोबर २००८
काळ्याकुट आकाशात, विजेसारखी चमकलीस
सृष्टी प्रकाशमान करून अंधारात हरवलीस
कोरड्या शुष्क जीवनात लक्ष्मीसारखी आलीस
भरभरून वैभव दिलंस, पण सुखाच्या क्षणी निघून गेलीस
तुझ्या पवित्र पाऊलखुणांनी वैभवाची प्राप्ती झाली
सुखद सहवासाच्या काळात मात्र आम्हाला सोडून गेलीस
पती: श्रीधर हरी पाटील, मुलगे: मेघनाथ, मंगेश, सुना : मेघना अमृता, नातसुन : अंकिता, मुली : सुनंदा, प्रभावती, सुनीता, शैला, सुचिता, सुलभा, सुगंधा, नातवंडे: प्रणाली, प्रतिक, विहान, रोहित, दिनेश, रितेश, अपूर्वा, पियुष, स्वरूप, मानस. पणतू : अर्श
मु.हेमनगर, ता.अलिबाग, जि.रायगड.

**केंद्रीय मत्स्यव्यवसाय सचिवांनी घेतला आढावा | पायाभूत सुविधांचा विस्तार, बाजारपेठ जोडणीवर भर**

# मच्छिमारांना समूह विकासाचे कवच

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मत्स्यव्यवसाय विभागाचे केंद्रीय सचिव डॉ. अभिलक्ष लिखी यांनी जिल्हा नियोजन सभागृह येथे रायगड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी क्लस्टरला भेट दिली. तसेच, त्याच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि सहकारी हितधारकांशी थेट संवाद साधला. हा क्लस्टर एकात्मिक मत्स्यव्यवसाय मूल्य-साखळी विकासासाठीचे मॉडेल म्हणून विकसित केले जात आहे. प्रत्यक्ष तळाच्या स्तरावरील आव्हानांचे मूल्यमापन करणे आणि सहकार नेतृत्वाखालील दृष्टिकोनातून मत्स्यव्यवसाय आधारित उपजीविका मजबूत करण्यासाठी संधी विचारात घेणे हा या भेटीचा उद्देश होता.



या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे आणि महाराष्ट्राचे मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे यांच्यासह रायगड, मुरुड, करंजा, उरण, श्रीवर्धन, रोहा, पेण आणि इतर प्रदेशातील मच्छीमार सहकारी संस्थांच्या मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या भेटीदरम्यान केंद्रीय सचीव डॉ. अभिलक्ष लिखी यांनी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांशी झालेल्या संवादात सागरी व गोड्या पाण्यातील आणि खाऱ्या पाण्यातील विभागांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या हितधारकांचा सक्रिय सहभाग दिसून आला. यावेळी त्यांनी रायगडमध्ये मासेमारी जेट्टी, आईस प्लांट, शीतगृह आणि ड्रेजिंग सुविधांची आवश्यकता यासह प्रमुख आव्हानांचा ठळक उल्लेख केला. सहभागींनी आरोग्य शिबीर आणि स्वच्छता सुविधांसारख्या महिला केंद्रित हस्तक्षेपांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच, सर्वोत्तम पद्धतींमधून शिकण्यासाठी आणि मच्छीमारांसाठी कर्ज पुरवठा सुलभ करण्यासाठी आंध्र प्रदेशसारख्या राज्यांना प्रत्यक्ष भेट देण्याची सूचना देखील केली. यावेळी वित्तीय संस्थांनी सहकारी प्रयत्नांना बळकटी देण्यासाठी निरंतर पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. तसेच, 'सहकार से समृद्धी' आणि आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनाला अनुरूप एक लवचिक, समावेशक आणि आत्मनिर्भर मत्स्यव्यवसाय क्षेत्र निर्माण करण्यासाठी पीएमएम एसवाय टप्पा २ मध्ये स्थानिकांच्या सूचना एकत्रित करण्यावर चर्चेचा भर देण्यात आला होता.

#### मत्स्यव्यवसाय समूहांना बळकटीसाठी प्रयत्न

निवडण्यात आलेल्या मत्स्यव्यवसाय समूहांना बळकट करण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभाग अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, नाबार्ड आणि एमएसएमई एकत्र काम करत आहेत. या सहकार्याचे उद्दिष्ट पायाभूत सुविधांचा विस्तार, आर्थिक मदत पुरवणे, मूल्यवर्धनाला प्रोत्साहन देणे आणि कुशल कार्यबल तयार करून उद्योजकतेला चालना देणे, तसेच गुंतवणूक आकर्षित करणे आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रात शाश्वत वाढीसाठी एक मजबूत स्टार्ट-अप परिसंस्था निर्माण करणे हा आहे.

# बिल्डरांचे सरकार

पुण्यातील एका वादग्रस्त जमीन व्यवहारामुळे देवेंद्र फडणवीस यांचा व त्यांच्या सरकारचा खरा चेहरा समोर आला आहे. हे सरकार बिल्डर, धनदांडगे, गुंड इत्यादींचीच पाठराखण करीत असल्याचे अनेकदा समोर आले होते. मुंबईत धारावी विकासाचे काम अदानीला देण्याचा सर्व व्यवहार संशयास्पद आहे. मुलुंडपासून तिकडे बोरीवलीपर्यंत अनेक जमिनी त्यासाठी अदानीला दिल्या जात आहेत. लोढा बिल्डरवर सतत मेहेरनजर चालू असतेच. आता पुण्यातील एकेक भानगडी समोर येऊ लागल्या आहेत. सध्या, लोकांच्या विरोधामुळे संबंधित बिल्डरनेच या व्यवहारातून माघार घेतली असली तरी काही दिवसांनंतर मागच्या दाराने ही भानगड पूर्णत्वाला जाण्याची पुरेपूर शक्यता आहे. मॉडेल कॉलनी ही पुण्यातील अत्यंत श्रीमंती वसाहत आहे. फर्ग्युसन रोड व सेनापती बापट रोड यांच्या परिसरातील या वसाहतीत अनेक नामांकित व्यावसायिक, राजकारणी इत्यादी राहतात. किर्लोस्कर किंवा शरद पवार यांचे बंगले इथून हाकेच्या अंतरावर आहेत. या साडेतीन एकरच्या परिसरातील जैन बोर्डिंग ट्रस्टच्या मालकीच्या इमारतींचे पुनर्विकास करण्याचा हा प्रकल्प होता. सध्या क्रिकेटमधील आयपीएल आणि बिल्डिंग धंद्यातील पुनर्विकास ही पैशांची दोन मोठी कुरणे आहेत. त्यातही मॉडेल कॉलनीसारखी मोक्याची वसाहत असेल तर त्यामधील विकासातून हजारो कोटी रुपये कमावता येऊ शकतात. जैन बोर्डिंग ही सुमारे ७० वर्षे जुनी संस्था असून तेथे पुण्यात शिकायला येणाऱ्या जैन समाजातील विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल व कँटिन आहे. हे कँटिन फारच प्रसिद्ध असून तेथे बाहेरचे विद्यार्थीही जेवायला येत असतात. जैन समाजाला पैशांची ददात नाही. त्यामुळे इतकी वर्षे सर्व सुरळीत चालू होते. पण जैन ट्रस्टमधील काही लोकांना बहुदा पैशांची हाव सुटली. त्यांनी ही जागा खासगी बिल्डरला विकण्याचे ठरवले. वास्तविक ट्रस्टला जागेची अशी विक्री करता येत नाही. पण ट्रस्टकडे पैसे नसतील व तो दिवाळ्यात निघालेला असेल तर अपवादात्मक परिस्थितीत धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेऊन असा व्यवहार करता येतो. त्यानुसार या ट्रस्टने अर्ज केला. पण त्याला ज्या विजेच्या वेगाने संमती मिळाली ते आश्चर्यकारक होतेच पण नंतरचे व्यवहारही भ्रष्टाचाराच्या सावलीतले होते.

## मोहोळांना हाकला

देवेंद्र फडणवीस आणि पुण्यातले त्यांचे उजवे हात केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचा या भानगडींशी विविध प्रकारे संबंध जोडला गेला आहे. ट्रस्टने धर्मादाय आयोगाकडे अर्ज केला तेव्हा तेथील आयुक्त हे देवेंद्रांचे नातेवाईक होते असा आरोप आहे. फडणवीसांनी त्यांचा खुलासा वा इन्कार केलेला नाही. हॉस्टेलच्या इमारतींचा पुनर्विकास करायचा तर मुळात जमीन बिल्डरला विकण्याची गरज नव्हती. पण ट्रस्ट आर्थिकदृष्ट्या आजारी असल्याचे सोंग आणण्यात आले. जमीन गोखले बिल्डरला २३० कोटी रुपयांना विकण्यात आली. वास्तविक पुण्यातील मोक्याच्या साडेतीन एकरच्या जागेची किंमत चारशे कोटी रुपये वगैरे असू शकते असे म्हणतात. मोहोळ हे या गोखले बिल्डरचे भागीदार होते. त्यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात तसा उल्लेख होता. नंतर बहुदा केंद्रीय मंत्री होण्याच्या आसपास त्यांनी निदान कागदावरून या भागीदारीतून अंग काढून घेतले. तरीही पूर्वी त्यांची भागीदारी होती अशाच बिल्डरने नेमका हा व्यवहार करावा व तो इतक्या झटपट मार्गी लागावा हा योगायोग असू शकत नाही. ही जमीन घेण्यासाठी गोखले यांना बुलडाणा अर्बन व वीरेश्वर सहकारी बँकेने अक्षरशः अर्ज मिळताक्षणी ७० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले हाही अद्भुत योगायोग होता. कहर म्हणजे मोहोळ हे पूर्वी पुण्याचे महापौर होते व तरीही त्यांची गोखले यांच्या अनेक प्रकल्पात उघड भागीदारी होती. त्यांच्या जाहिरातीतही ते झळकले होते. पण हा वाद पुढे येताच गोखले यांच्याशी आपला काहीही संबंध नाही असे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मोहोळ यांचा हा व्यवहार भ्रष्ट असून त्यांना ताबडतोब केंद्रीय मंत्रिपदावरून काढायला हवे. पण नरेंद्र मोदी तसे करणार नाहीत. विरोधकांच्या आरोपांपुढे आपण झुकत नाही हे त्यांना दाखवायचे असते हे पूर्वी अनेकदा दिसले आहे. उत्तर प्रदेशात शेतकऱ्यांच्या अंगावर गाडी घालून मारणाऱ्या मुलाच्या बापालाही नरेंद्र मोदी यांनी अभय दिले होते व केंद्रीय गृहराज्यमंत्रिपदी ठेवले होते. मोहोळ यांच्याबाबतही हेच होईल.

## भक्त मंडळी चिडीचूप

मोदी, फडणवीस आणि भाजपची तमाम नेतेमंडळी स्वच्छपणाचा कितीही आव आणत असली तरी अंतिमतः अशा भ्रष्ट व्यवहारांना पाठीशी घालतात हे वेळोवेळी दिसले आहे. पुण्यातील प्रकरण जैन समाजाशी संबंधित होते. जैन हा पैसेवाला समाज आहे. भाजपचा पाठीराखा आहे. त्यातच मॉडेल कॉलनीच्या जागेमध्ये जैनांचे एक महावीर देऊळही होते. पण विक्री व्यवहाराच्या कागदपत्रांमध्ये त्याचा उल्लेखच नव्हता. त्यामुळे लोकांच्या भावनांचा प्रश्न आला. पुण्यात मोर्चा निघाला. येत्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला जैनांना दुखावणे परवडणारे नाही. त्यामुळे मग बिल्डरला माघार घेण्यास सांगण्यात आले. पण मुळात ट्रस्टने जमीन विकताना काय भानगडी केल्या व मोहोळ यांचा त्याच्याशी कसा संबंध होता याची चौकशी होण्याची गरज होती. चौकशीची ही मागणी सोईस्करपणे टाळण्यात आली आहे. ही चौकशी झाली असती तर मोहोळ यांच्याही वरच्या नेत्यांशी याचा संबंध आहे हे उघड झाले असते. कारण, नाही म्हटले तरी हा शेकडो कोटींचा व्यवहार होता. त्यात मोहोळ एकटेच सहभागी असतील हे संभवत नाही. आता मोहोळ यांच्या इतर कथित प्रकरणांची चर्चा सुरू झाली आहे. पुण्यातील पुनर्विकासाच्या हरेक प्रकल्पावर संशय निर्माण झाला आहे. पर्वती टेकडीवरच्या झोपड्यांच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत उलटसुलट बातम्या येऊ लागल्या आहेतच. लोकमान्यनगर नावाच्या म्हाडाच्या दुसऱ्या मोठ्या वसाहतीमधील विकासाला हेमंत रासने हे भाजपच्या आमदाराने कसा खोडा घातला आहे हे समोर आले आहे. भाजपला मिळणारा अफाट पैसा कुठून येतो याचे रहस्य अशा बातम्यांमध्ये दडलेले आहे. मुंबईच्या पाठोपाठ पुणे व नंतर क्रमाक्रमाने नाशिक, नागपूर इत्यादी ठिकाणचे जागांचे व्यवहार आता शेकडो कोटींचे झाले आहेत. भाजपला या शहरांवर कबजा करायचा आहे तो शहरांच्या विकासासाठी नव्हे तर या व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी. या सर्व ठिकाणच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुकाही देवेंद्र व भाजपच्या इच्छेनुसार होत असतात. ही शहरे म्हणजे भाजप व मोदींच्या भक्तांचे बालेकिल्ले आहेत. एरवी हे लोक लव्ह जिहाद, जमीन जिहाद वगैरे खोट्या मुद्द्यांवरून मोर्चे काढतात व मुस्लिमांविरुध्द वातावरण तापवतात. पण यांचेच बिल्डर व मंत्री जेव्हा अशा भानगडी करतात तेव्हा या भक्त मंडळींच्या वळवळणाऱ्या जिभांना कुलुप लागते. यांची तोंडे तेव्हा उचकटत नाहीत. तेव्हा हे डोळ्यावर कातडी ओढून घेतात. असा हा सर्व वरपासून खालपर्यंत भ्रष्ट दांभिकांचा दरबार आहे.

विचार

# भारतासाठी नवी चिंता

*'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारत आणि पाकिस्तानच्या दिशा बदलल्या. पाकिस्तानने चीनबरोबरचे संबध कायम ठेवताना अमेरिका आणि तुर्कस्तानशी संबंध वाढवले आहेत. याउलट, भारताचे अमेरिकेशी संबंध बिघडले असून, चीन, रशिया आणि अफगाणिस्तानशी वाढले आहेत. अशात पाकिस्तानमध्ये अमेरिका पासनी नावाचे बंदर विकसित करत असून, भावी काळात भारत-इराण व्यापारासह अन्य बाबींवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.*



**प्रा. जयसिंग यादव**

पाकिस्तानने ग्वादर जिल्ह्यात ग्वादर बंदरापासून शंभर किलोमीटर अंतरावर पासनी बंदर विकसित करण्याबाबत दिलेल्या प्रस्तावाचा उद्देश अमेरिकेला या प्रदेशात आपले धोरणात्मक स्थान पुढे नेण्याची संधी प्रदान करतो. हे बंदर अमेरिकेला अरबी समुद्र आणि मध्य आशियातील संवेदनशील भागात आपला प्रभाव वाढवण्याची संधी प्रदान करेल. अमेरिकन गुंतवणूकदारांनी पासनीमध्ये टर्मिनल विकसित केल्याने पाकिस्तानच्या खनिज संसाधनांमध्ये, विशेषतः तांबे आणि अँटिमोनीसारख्या महत्त्वाच्या खनिजांमध्ये वाढ होईल. बॅटरी, अग्निरोधक साहित्य आणि क्षेपणास्त्र निर्मितीमध्ये ही खनिजे महत्त्वाची भूमिका बजावतात. या प्रकल्पाची किंमत अंदाजे १.२ अब्ज डॉलर असेल आणि हा पाकिस्तान आणि अमेरिकेतील संयुक्त उपक्रम असेल. पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती संकटात असताना आणि परकीय गुंतवणूक कमी होत असताना, हा प्रस्ताव काहीसा सकारात्मक मानला जाऊ शकतो. पाकिस्तानच्या या पावलाचा चीन आणि भारतावरही विपरीत परिणाम होईल. पाकिस्तानच्या या पावलाचा चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह'अंतर्गत ग्वादर बंदरावर लक्षणीय परिणाम होईल. ग्वादरच्या निधी आणि संचालनात चीन सक्रियपणे सहभागी आहे आणि पासनी बंदर प्रकल्पाशी त्याची जवळीक एक जटिल राजकीय समीकरण निर्माण करते. अमेरिकेने पासनीमध्ये गुंतवणूक करणे हे चीनच्या विस्तारवादी धोरणांना थेट विरोध करणारे धोरणात्मक पाऊल म्हणून पाहिले जाईल. शिवाय, भारतासाठी हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, कारण आपण चाबहार बंदराद्वारे इराण आणि मध्य आशियाशी आपले संबंध मजबूत करत आहे.

पासनी आणि चाबहारची जवळीक भारतासाठी एक धोरणात्मक चिंतेची बाब असू शकते. सध्या हा उपक्रम अधिकृत धोरण नाही, तर दक्षिण आशियाला प्रोत्साहन देण्यासाठी पाकिस्तानी अधिकाऱ्यांकडून राबवण्यात येत असलेला एक व्यावसायिक विचार आहे. पाकिस्तानमधील वाढत्या भू-राजकीय अशांततेमध्ये आपली भूमिका बळकट करण्यासाठी हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावावर काही अमेरिकन अधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे. तथापि, 'व्हाईट हाऊस'मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी किंवा ट्रम्प प्रशासनाने या प्रस्तावावर अधिकृतपणे भाष्य केलेले नाही. अहवालात असेही म्हटले आहे, की ही योजना ट्रम्प प्रशासनाशी चांगले संबंध राखण्यासाठी पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अनेक कल्पनांपैकी एक आहे. पाकिस्तान या पावलाद्वारे अमेरिकेशी आपले संबंध आणखी मजबूत करू इच्छित आहे. अलिकडे पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात चांगले संबंध निर्माण झाले आहेत. मे महिन्यात पाकिस्तान आणि भारत यांच्यातील युद्धबंदीचे श्रेय ट्रम्प यांनी घेतले, तेव्हा हा दावा भारताने फेटाळून लावला. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी ट्रम्प यांच्या भूमिकेबद्दल सार्वजनिकपणे आभार मानले आणि त्यांना नोबेल शांतता पुरस्कारासाठीही नामांकित केले. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर अमेरिका-पाकिस्तान संबंध पूर्णपणे बदलले आहेत.

मुनीर यांनी अमेरिकेला दुर्मिळ खनिजे देण्याच्या बदल्यात पासनी येथे बंदर विकसित करण्याची चर्चा केली. गेल्या महिन्यात शाहबाज शरीफ आणि मुनीर यांच्या ट्रम्प यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर पाकिस्तानने अमेरिकेला हा प्रस्ताव दिला. मुनीर यांच्या सल्लागारांनी अरबी समुद्रात बंदर विकसित करून चालवण्याचा प्रस्ताव अमेरिकन अधिकाऱ्यांना दिला. प्रस्तावित योजनेत अरबी समुद्रकाठी असलेल्या पासनी शहरात टर्मिनल बांधणे आणि चालवणे समाविष्ट आहे, जेणेकरून अमेरिकन गुंतवणूकदारांना पाकिस्तानच्या महत्त्वाच्या खनिजांच्या खाणीत सहज प्रवेश मिळेल. पासनी हे अफगाणिस्तान आणि इराणच्या सीमेवर असलेल्या बलुचिस्तान प्रांतातील ग्वादर जिल्ह्यात स्थित एक बंदर शहर आहे. या बैठकीत पाकिस्तानने कृषी, तंत्रज्ञान, खाणकाम आणि ऊर्जा क्षेत्रात अमेरिकेला गुंतवणुकीची विनंती केली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रस्तावाची माहिती अमेरिकन अधिकाऱ्यांना आगाऊ देण्यात आली होती आणि नंतर मुनीर यांना सादर करण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे या योजनेत स्पष्टपणे म्हटले आहे, की हे बंदर अमेरिकेच्या लष्करी उद्देशांसाठी वापरले जाणार नाही, तर पश्चिम पाकिस्तानमधील खनिजांनी समृद्ध प्रांतांना जोडणाऱ्या रेल्वे कॉरिडॉरच्या विकासात गुंतवणूक सुरक्षित करण्यासाठी वापरले जाईल. मे महिन्यात भारताने केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तान खूप घाबरला आहे. तो भारताला रोखण्यासाठी अमेरिकेला पाकिस्तानमध्ये सक्रिय करू इच्छितो. मे महिन्यात भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षाच्या काही काळापूर्वी, ट्रम्प कुटुंबाच्या मालकीच्या एका कंपनीने पाकिस्तानसोबत क्रिप्टोकरन्सीबाबत करार केला होता. शरीफ यांच्या व्हाईट हाऊसच्या भेटीदरम्यान पाकिस्तान आणि अमेरिकेत काही व्यापार करारही झाले होते. जून २०२४ पर्यंत, अमेरिका आणि पाकिस्तानमधील एकूण वस्तू आणि सेवा व्यापार १०.१ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी तो आतापर्यंत ६.३ टक्के वाढला आहे. पाकिस्तानमधून अमेरिकेला एकूण कापड आणि सेवा निर्यात ५.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती आणि अमेरिकेतून पाकिस्तानला निर्यात २.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती. दोन्ही देशांमधील व्यापार तूट तीन अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात ५.९ टक्के वाढ आहे. शीतयुद्धाच्या काळात पाकिस्तान हा अमेरिकेचा एक महत्त्वाचा मित्र मानला जात होता; परंतु ९/११ नंतर दहशतवादविरोधी पाकिस्तानच्या दुटप्पी दृष्टिकोनामुळे संबंध दुरावले. तथापि, 'ऑपरेशन सिंदूर' नंतर अमेरिका पुन्हा पाकिस्तानकडे झुकली आहे. प्रादेशिक स्थैर्य, खनिज संसाधनांमध्ये प्रवेश आणि चीनच्या वाढत्या प्रभावाचे संतुलन ही त्यामागील कारणे आहेत. पाकिस्तानने अमेरिकेला बलुचिस्तानमधील पासनी येथे १.२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त खर्चाचे नागरी बंदर बांधण्याची आणि चालवण्याची ऑफर दिली आहे. हे बंदर चीनने बांधलेल्या ग्वादर बंदरापासून फक्त शंभर किलोमीटर अंतरावर आहे आणि संयुक्तपणे विकसित केलेल्या भारत-इराण चाबहार बंदराजवळ आहे.

हा प्रस्ताव आकर्षक बनवण्यासाठी, पाकिस्तानने त्याच्या खनिज संपत्तीमध्ये, विशेषतः दुर्मिळ पृथ्वी खनिजांमध्ये प्रवेश देण्याचे संकेत दिले आहेत. ते संरक्षण आणि स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानासाठी महत्त्वाचे आहेत. यामुळे पाकिस्तानला अमेरिकेकडून गुंतवणूक आणि राजनैतिक पाठिंबा मिळण्याची अपेक्षा आहे. पासनीमधील उपस्थितीमुळे अमेरिकेची अफगाणिस्तान आणि इराणवर देखरेख ठेवण्याची क्षमता पुनर्संचयित होऊ शकते. २०२१ मध्ये अमेरिकेने अफगाणिस्तानमधून माघार घेतल्यानंतर ही देखरेख कमी झाली होती. पाकिस्तानची अमेरिकेसोबतची संरक्षण, अर्थव्यवस्था आणि राजनैतिक क्षेत्रातील युती अभूतपूर्वपणे मजबूत झाली आहे. या वर्षी तुर्कस्तानचे अध्यक्ष एर्दोगान यांच्या इस्लामाबाद भेटीदरम्यान पाक-तुर्कीदरम्यान मानवरहित हवाई वाहने आणि रडार प्रणालींच्या संयुक्त उत्पादनासह २४ करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी कराची इंडस्ट्रियल पार्कमधील एक हजार एकर जमीन तुर्कीचे अध्यक्ष एर्दोगान यांना मोफत देण्याची घोषणा केली. तेथे एक निर्यात प्रक्रिया क्षेत्र (ईपीझेड) स्थापन केले जाईल. ते कर सवलती, सुलभ रसद आणि मध्य आशिया आणि आखाती देशांना थेट शिपिंग देईल. हे केवळ आर्थिक पाऊल नाही, तर एक राजनैतिक संकेतही होता. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान तुर्कस्तानने पाकिस्तानला उघड पाठिंबा दिला होता. चीनने ग्वादर आणि इतर प्रकल्पांमध्ये आधीच अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. अमेरिकेने पासनीमध्ये उपस्थित असणे चीनच्या धोरणात्मक उद्देशांना आव्हान ठरेल. त्यामुळे चीन आसपासच्या भागात उपस्थिती वाढवू शकतो. त्यामुळे अरबी समुद्रात तणाव आणखी वाढू शकतो. या हालचाली भारतासाठी थेट धोरणात्मक आव्हान आहेत. पासनी बंदर भारताच्या चाबहार टर्मिनलपासून जेमतेम तीनशे किलोमीटर अंतरावर आहे. अमेरिकेला तेथे प्रवेश मिळाल्यास चाबहार (भारत-इराण), ग्वादर (चीन-पाकिस्तान) आणि पासनी (अमेरिका-पाकिस्तान) या धोरणात्मक नोड्समुळे एक त्रिकोण तयार होईल. त्यामुळे भारताची कोंडी होईल. अमेरिका-पाकिस्तान ड्रोन सहकार्य भारताच्या पश्चिम सीमेवर नवीन गुप्तचर क्षमता प्रदान करू शकते. कराचीमध्ये तुर्कस्तानची वाढती आर्थिक उपस्थिती भारताच्या विरोधात आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर तुर्कस्तान-पाकिस्तान युतीला बळकटी देऊ शकते. पाकिस्तानचे धोरण निश्चितच धाडसी आहे; परंतु हा मूलतः 'भूगोल विकून अर्थव्यवस्था वाचवण्याचा' प्रयत्न आहे.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# लोकशाही मूल्ये कमजोर होताहेत

**सुयोग आंग्रे**

सध्या तेच तरुण चर्चेत आहेत, ज्यांनी नोकरीच्या आयुष्यात प्रवेश केला आहे किंवा करत आहे. यामध्ये मिलिनियल्स आणि जनरेशन जी सारख्या श्रेणींचा समावेश आहे. त्यांनी विद्यापीठांमध्ये लोकशाहीची व्याख्या शिकून घेतली आणि तिची तत्त्वे आणि मूल्ये पुस्तकांतून वाचली. ते सैद्धांतिक आणि व्यावहारिक लोकशाहीतील फरक पाहू शकतात, फरकाचे विश्लेषण करू शकतात आणि समधानाच्या पर्यायांचा विचार करू शकतात. या पिढीने जे पाहिले, ऐकले आणि समजले, विद्वानांकडून काय शिकले किंवा पुस्तकांतून वाचले, आणि लोकशाहीचे व्यावहारिक स्वरूप यातील प्रचंड तफावत त्यांना संभ्रमात टाकत आहे.यामुळेच तर बेरोजगारीचा भामासुर फोफावला असून रोजगार मिळविण्यासाठीदेशातील तरुण प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसत आहे.

त्यामुळे चिंता निर्माण होते, वाढते आणि अनेक प्रसंगी त्याचे आक्रमकतेत रूपांतर होते. श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळमधील घटनांचे विश्लेषण याच संदर्भात केले जात आहे. दुसऱ्या वर्गात अशा लोकांचा समावेश होतो जे ब्रिटिश साम्राज्याचे प्रजा म्हणून वसाहतवादी भारतात जन्मले होते. ते स्वतंत्र भारताचे नागरिक झाले. त्यांनी देशाची फाळणी आणि लोकसंख्या ४० कोटींवरून १४० कोटींपर्यंत वाढलेली पाहिली आणि त्याच्याशी संबंधित इतर बदलांचाही त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. स्वातंत्र्य चळवळीच्या सुगंधाने परिचित झालेले हे लोक आपली वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरले खरे पण त्याचा फायदा त्यांच्या वारसांना झाला आंही किंबहुना त्यामध्ये देखील शर्यत वाढली आहे. ज्या वातावरणात देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करणारे अनेक लोक पुढे आले आणि त्यांनी प्राणांची बाजी लावली. त्या वातावरणात त्यांच्या वारसाणाच्या अपेक्षा आणि आशा वाढत होत्या. त्या पिढीला लोकशाहीच्या सैद्धांतिक लोकशाहीची ओळख झाली, सत्तेवर आलेल्या लोकांना त्याप्रमाणे आयुष्य जगताना पाहिलं आणि आज आपण त्याचा सातत्याने विपर्यास होताना पाहतो आहोत. त्यांच्यापुढे किंवा त्या तरुणांपुढे ज्यांना त्यांचे भविष्य जगायचे आहे, त्यांचे ध्येय निश्चित करायचे आहे आणि ते साध्य करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पण तरुणाच्या पदरी निराशेची झालर पडलेली पाहावयास मिळते. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात ज्या देशांनी लोकशाहीचा अंगीकार केला होता, त्यापैकी भारतात ती सर्वात यशस्वीपणे प्रस्थापित झाली आहे. भारतात प्राचीन परंपरा आणि 'परिहत' या सार्वत्रिक समजामुळे पद्धतशीरपणे लोकशाही राबवली गेली आणि चालू राहिली, पण गांधीजींनी आणि त्यांच्या पिढीतील लोकांनी शिकवलेली त्याग, तपश्चर्या आणि लोकसेवेची मूल्ये लोप पावत आहेत, ही मोठी आश्चर्याची बाब आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी सत्तेत आलेले हक्क आणि सुविधा मिळवून दिल्याने ते मतदारांना विसरले आणि संपत्ती जमा करण्याच्या नादात गढून गेले.

पोलीस न्यायालये आणि आरोग्य सेवांची उपलब्धता सर्वसामान्यांसाठी अत्यंत त्रासदायक आहे. शेवटच्या रांगेत उभ्या असलेल्या व्यक्तीसाठी गेल्या काही वर्षांत अर्थपूर्ण प्रयत्न केले जात आहेत, जेणेकरून त्याचे जीवन सुधारावे आणि तो सन्मानाने आणि मानवी सन्मानाने जगू शकेल, परंतु समस्या अशी आहे की वरपासून खालपर्यंतचे बहुतांश सरकारी कर्मचारी नैतिकतेच्या मूल्यांपासून दुरावलेले असतील, तर कागदावर दाखविणारे उत्तम प्रयत्नही व्यावहारिकतेत जवळपास शून्यच ठरतात. शेवटी, भारतासारख्या देशात जिथे 'सर्वभूतेहिते रता' (सर्व प्राण्यांच्या कल्याणासाठी) हे मानवतेचे मूलभूत तत्त्वज्ञान स्वीकारले गेले आहे, तिथे नैतिकता मोठ्या प्रमाणावर नष्ट होण्याच्या पातळीवर कशी पोहोचली आहे? लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका जिंकून सत्तेत स्थान मिळवणे, पुढील पाच वर्षे प्रत्येक मार्गाने संपत्ती जमा करणे आणि लोकसेवेऐवजी पुढची निवडणूक जिंकणे असा होतो का? निवडक लोकप्रतिनिधींनी स्वत:साठी सुविधांमध्ये सातत्याने वाढ केली आहे. या देशात स्वातंत्र्यानंतरही राजेंद्र प्रसाद, लाल बहादूर शास्त्री, कर्पूरी ठाकूर, गुलजारी लाल नंदा, एपीजे अब्दुल कलाम असे अनेक लोक होते, जे सत्तेत राहिले, पण जनसेवा हेच आपल्या जीवनाचे ध्येय बनले, हे बहुधा बहुतेकजण विसरले आहेत. स्वत:चे किंवा कुटुंबाचे सुख, संपत्ती, नातेवाईक यांच्या प्रगतीसाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. गेल्या दहा वर्षांत भारताची जागतिक प्रतिष्ठा आदरणीय पातळीवर पोहोचली आहे, पण नैतिकता आणि मूल्यांच्या ऱ्हासाची प्रक्रिया थांबलेली नाही. भ्रष्ट नेते आणि नोकरशहांची प्रकरणे थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत.असे काही लोक आहेत जे सतत परदेशात जाऊन भारतावर अनाठायी टीका करतात आणि देशाच्या निवडून आलेल्या पंतप्रधानांना हटवण्यासाठी पाकिस्तानची मदत घेतात. देशातील विचारवंत, अभ्यासक आणि राष्ट्र समर्पित तरुणांनी सखोल चर्चा करून लोकशाहीची मूलभूत तत्त्वे पुनर्स्थापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

लोकसंसद

## सणाचा आनंद की निष्काळजीपणाची शिक्षा?



दिवाळी म्हटली की आनंद, प्रकाश, उत्साह यांची आठवण येते. पण गेल्या काही वर्षांत या प्रकाशोत्सवाला आगींच्या दुर्घटनांचे गालबोट लागत आहे. मुंबईसह राज्यभरात दरवर्षी दिवाळीच्या काळात लागणाऱ्या आगींनी कित्येकांचे संसार जळून खाक झाले आहेत, तर काही निरपराध आपल्या जीवाला मुकले आहेत. यंदाही मुंबईत ५० हून अधिक आगीच्या घटना घडल्या. या आगींची कारणं नवीन नाहीत फटाक्यांचा अतिरेकी वापर, शॉर्ट सर्किट, अरुंद जागा, वायुविजनाचा अभाव आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे सुरक्षेकडे केलेलं सर्रास दुर्लक्ष. फायर ऑडिट ही केवळ औपचारिकता ठरली आहे, तर फटाक्यांवरील बंदी फक्त आदेशपत्रापुरती मर्यादित राहते. परिणामी निष्काळजीपणाचा दंड भरावा लागतो तो निरपराध नागरिकांना ज्यांचा या बेपर्वाईशी काहीही संबंध नसतो. विशेष म्हणजे, अशा दुर्घटना केवळ दिवाळीपुरत्याच मर्यादित राहिलेल्या नाहीत. वर्षभरातही रुग्णालये, व्यावसायिक संकुले, उंच इमारती आणि झोपडपट्ट्यांमध्ये लागणाऱ्या आगींनी असंख्य जीव घेतले आहेत. कुठे विजेच्या तारा ठिसूळ, कुठे सुरक्षा यंत्रणा अपुरी, तर कुठे प्रशासनाची डोळेझाक प्रत्येक वेळी तीच कथा, तोच परिणाम. प्रत्येक घटनेनंतर चौकशा, मदतीची आश्वासने आणि सहानुभूतीचे शब्द मिळतात; पण ठोस बदल मात्र होत नाही. आगीच्या घटनांमधील पद्धतशीर बेपर्वाईवर कोणीच बोट ठेवत नाही. ही बेपर्वाई थांबायलाच हवी. फायर ऑडिट सक्तीचे, बंधनकारक आणि पारदर्शक व्हायला हवं. अग्निशमन यंत्रणेला अधिक साधनसंपन्न करणे आणि नागरिकांनी स्वतः सतर्क राहणे हे तितकेच आवश्यक आहे.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# इंदिरा गांधींच्या हत्येनंतर नेतृत्वाची पोकळी

इंदिरा गांधींचा जन्म कश्मीरी पंडित कुटूंबात १९ नोव्हेंबर १९१७ ला अलाहाबाद येथे झाला त्यांचे वडिल जवाहरलाल नेहरू मोठे राजकारणी होते. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्याकरता इंग्रजांसोबत राजनितीक स्तरावर युध्द केले. त्यानंतर त्या आपल्या राज्यसंघाचे प्रधानमंत्री आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणुन नियुक्त झाल्या इंदिरा ही जवाहरलाल नेहरूंची एकमेव कन्या त्या आपल्या आई कमला नेहरूंच्या सान्निध्यात आनंद भवन येथे लहानाच्या मोठ्या झाल्या. भारताच्या जडणघडणीला माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यापासून वेगळे करता येणे अशक्य आहे. आपल्या कार्यकाळात त्यांनी अनेक आव्हानात्मक, तसेच भारताचे भविष्य घडवणारे मोठे आणि महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यांनी घेतलेल्या काही निर्णयांचे आजही काही लोक तोंडभरून कौतुक करतात; तर काही लोक आणीबाणीसारख्या निर्णयाची आठवण करीत इंदिरा गांधींवर टीका करतात. मात्र, आपल्या हयातीत त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत देशाचा विचार केला. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांची सकाळीच गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. या घातपातामुळे हरहुन्नरी व प्रचंड कार्यक्षमता असलेल्या महिला नेत्याला भारत मुकला. इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर देशाच्या पंतप्रधानपदाची जबाबदारी त्यांचे पुत्र राजीव गांधी यांच्यावर सोपवण्यात आली. विशेष म्हणजे एकीकडे इंदिरा यांच्या हत्येमुळे संपूर्ण देश हादरलेला असताना, दुसरीकडे देशाला राजीव गांधी यांच्या रूपात नवे खंबीर नेतृत्व देण्यावर विचार केला जात होता. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना आपल्या रोजच्या दिनचर्येनुसार त्या ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी उठल्या होत्या. दिवसभर ठरलेली कामे करण्यासाठी त्या सकाळी साडेआठ वाजेपर्यंत तयार झाल्या. सकाळीच पीटर उस्तिनाव्ह हे पत्रकार त्यांची मुलाखत घेणार होते. मात्र, ठरलेली ही मुलाखत सकाळी ९ वाजेपर्यंत पुढे ढकलण्यात आली होती. ही मुलाखत घेणारे पथक १, अकबर रोड येथे थांबल्याचे इंदिरा गांधी यांना सांगण्यात आले होते. त्यानंतर भोजन दालनातून त्या चालत बाहेर निघाल्या होत्या. या दालनातून बाहेर निघाल्यानंतर दोन्ही बाजूंनी झाडे असलेल्या रस्त्याने त्या चालत होत्या. १, अकबर रोड येथील कार्यालयाच्या दरवाजाजवळ पोहोचल्यानंतर सबइन्स्पेक्टर बियांत सिंग हा दरवाजा उघडण्यासाठी पुढे सरसावला. तो अभिवादन करण्यासाठी आपला हात उंचावतो आहे, असे इंदिरा गांधी यांना वाटले होते. मात्र काही समजायच्या आत बियांत सिंग याने इंदिरा गांधी यांच्यावर तीन फुटांच्या अंतरावरून गोळ्या झाडल्या. त्याच्या हातात पिस्तूल होते. नऊ वर्षांपासून तो इंदिरा गांधी यांच्या सुरक्षा दलात होता. त्यानंतर काही क्षणांतच कॉन्स्टेबल सतवंत सिंग पुढे आला. त्यानेदेखील आपल्या स्टेनगनमधून इंदिरा गांधी यांच्यावर २५ गोळ्या झाडल्या. इंदिरा गांधी यांच्यावर हल्ला झाला, तेव्हा सकाळचे ९ वाजून १६ मिनिटे झाली होती. ही घटना घडली तेव्हा इंदिरा गांधी यांचे पुत्र राजीव गांधी पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर होते. याच काळात राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग हे परदेशात होते. मात्र, इंदिरा गांधी यांच्यावरील हल्ल्याचे वृत्त समजताच ग्यानी झैलसिंग, तसेच राजीव गांधी तत्काळ दिल्लीला रवाना झाले होते. इंदिरा गांधी यांचे प्राण वाचवण्यासाठी डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले; मात्र त्यात ते अपयशी ठरले. इंदिरा गांधींची हत्या झाल्याचे समजताच देशभरात हाहाकार माजेल म्हणून त्यांच्या मृत्यूचे वृत्त दुपारी रोखून ठेवण्यात आले होते. तोपर्यंत या घटनेची माहिती होताच इंदिरा गांधी यांचे सहकारी तसेच राजीव गांधी, राष्ट्रपती दिल्लीत पोहोचले. त्यानंतर ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी उशिरा राजीव गांधी यांनी देशाचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.

# फणसपाडा गॅस्ट्रोच्या विळख्यात

## • विहिरीचे पाणी दूषित; चिमुकलीचा मृत्यू, ३३ जणांना झाली लागण

**| ठाणे | प्रतिनिधी |**

कसारा परिसरातील फणसपाडा गाव गॅस्ट्रोच्या विळख्यात सापडले आहे. या साथीच्या रोगाने एका चार वर्षीय चिमुकलीचा बळी घेतला आहे. गावाला पाणीपुरवठा करणारी विहीर दूषित झाली आहे, नळालाही अशुद्ध पाणी येत आहे. त्यामुळे गावातील सुमारे ३३ ग्रामस्थांना गॅस्ट्रोची लागण झाली आहे. अत्यवस्थ असलेल्या दोघांना शहापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अन्य रुग्णांवर कसारा आणि खडर्डी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



फणसपाडा परिसरातील ग्रामस्थांना गेल्या दोन दिवसांपासून उलटी अतिसाराचा त्रास होत असल्याने ते खासगी रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, कसारा, खर्डी ग्रामीण रुग्णालय येथे उपचार घेत आहेत. उपचार सुरू असताना वेदिका भस्मा (४) या मुलीचा मृत्यू झाला. तिला गॅस्ट्रोची लागण झाल्याचे उघड झाल्यानंतर परिसरात एकच घबराट पसरली, तर आरोग्य यंत्रणेची एकच पळापळ उडाली. या भागातील अत्यवस्थ असलेल्या दोन रुग्णांना शहापूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सुमारे सहाहून अधिक रुग्णांवर खर्डी येथील रुग्णालयात उपचार सुरू असून २० हून अधिक रुग्णांना वैद्यकीय कॅम्प फणसपाडा येथे दाखल करण्यात आले आहे. वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रिया म्हात्रे, डॉ. आशू शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य पथक या भागात काम करत आहे.

> "दोन दिवसांपासून गावात सर्व्हे करीत आहोत. आरोग्य अधिकाऱ्यांनीही येथे भेट देऊन पाहणी केली आहे. एक गॅस्ट्रो संशयित रुग्ण दगावला आहे. इतर रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. तालुका आरोग्य विभाग यावर योग्य त्या उपाययोजना करत असून आमचे एक पथक पाड्यात कार्यरत आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी घाबरून जाऊ नये.
> – डॉ. भाग्यश्री सोनपिंपळे, तालुका आरोग्य अधिकारी, शहापूर"

अनेक वर्षांपासून या पाड्यात पिण्याच्या शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी जलजीवन योजनेचे काम हाती घेतले होते. मात्र, अद्याप त्या कामाचा श्रीगणेशा न झाल्याने ग्रामस्थांना विहिरीच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे.

पाऊस, अस्वच्छता, उताराच्या मार्गाने वाहत जाणारे नाल्याचे पाणी हे विहिरीत जात असल्यामुळे विहिरीतील पाणी दूषित झाले आहे. त्यातूनच ही साथ पसरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या पाड्यातील लोकांना विहिरीशिवाय दुसरा पर्याय नसल्याने विहिरीतील पाणी जेवणासाठी, अंघोळीसाठी व पिण्यासाठी वापरले जात आहे.

पाणी योजनेच्या नळाना पाच दिवसांनी अशुद्ध पाणी येत असल्यामुळे या पाण्याचा ग्रामस्थ वापर करत नाहीत. अशुद्ध पाण्याच्या पुरवठ्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

---

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**३१ ऑक्टोबर**

१) श्री.विजया नारायण पाटील
अलिबाग, ३१-१०-१९३५

## पार्वती कांबळे यांचे निधन

**खांब :** रोहा तालुक्यातील खांब येथील रहिवासी पार्वती शंकर कांबळे यांचे शुक्रवारी (दि.२४) वयाच्या सुमारे ९० व्या वर्षी राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या राजेंद्र कांबळे यांच्या आई व सचिन व संदीप



कांबळे यांच्या आजी होत. पार्वती कांबळे या सुस्वभावी व प्रेमळ वृत्तीच्या होत्या. त्यांनी आपली मुले व नातवंडे यांना चांगले शिक्षित करून सुसंस्कृत केले. त्यांच्या पश्चात फार मोठा गोतावळा असून त्यांचे जलदान व शोकसभा रविवार दि.२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा. राहत्या घरी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## संजय भोईर यांना मातृशोक

**शिहू :** पेण पंचायत समितीचे माजी सभापती संजय धाया भोईर यांच्या मातोश्री नर्मदा धाया भोईर यांचे मंगळवारी (दि.२८) वयाच्या ७७ व्या वर्षी निधन झाले आहे. त्या प्रेमळ मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या.



त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच विविध क्षेत्रातील मान्यवरानी त्यांचे अंतिम दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार दि.०६ नोव्हेंबर रोजी पाली उद्धर येथे होणार आहे. तर उत्तरकार्य रविवार दि.०९ नोव्हेंबर रोजी राहत्या घरी जांभूळटेप मानी (नवीन वसाहत) येथे होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

---

# जुहू चौपाटी येथे स्वच्छता मोहीम

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबईला नैसर्गिकरीत्या लाभलेल्या सागरी किनाऱ्यांचे संवर्धन व्हावे म्हणून ४०० हून अधिक युवक, नागरिक आणि मुलांनी शुक्रवारी (दि.३०) सकाळी जुहू चौपाटी येथे स्वच्छता मोहीम राबवली. यावेळी तब्बल १९४६ किलो प्लास्टिक कचरा गोळा केला. हा कचरा पुनर्प्रक्रिया करून सार्वजनिक सोयींसाठी वापरला जाणार आहे.

‘जल्लोषः क्लीन कोस्ट्स, रिस्टोअर द शोर’ ही मोहीम प्रोजेक्ट मुंबई, युनिसेफ इंडिया आणि युवाहच्या ग्रीन रायझिंग उपक्रमाच्या माध्यमातून राबवली गेली. बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शासनाचे राज्य हवामान कृती कक्ष, माझी वसुंधरा,



एनएसएस, नाईन इज माईन आणि महाराष्ट्र यूथ फॉर क्लायमेट ॲक्शन या संस्थांचाही मोहीमेला पाठिंबा होता. ही मोहीम फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या मुंबई क्लायमेट वीकसाठीचा आरंभिक टप्पा आहे.

यावेळी मुंबईतील शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी, युवाह इंडियाचे प्रमुख जॉर्जिया व्हॅरिस्को, युनिसेफ मुंबईचे वॉश-सीसीईएस तज्ज्ञ युसूफ कबीर, माझी वसुंधराचे मिशन डायरेक्टर सुधाकर बोबडे, अभिनेत्री अनुरिता झा आदी उपस्थित होते.

---

# रामपूर एसटी निवारा शेडची दयनीय अवस्था

## • जीव मुठीत घेऊन प्रवाशांचा वावर

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

चिपळूण-गुहागर महामार्गावर रामपूर निवाराशेडची अवस्था दयनीय झाली आहे. गेल्या दोन वर्षापासून मोडकळीस आलेल्या निवाराशेडच्या छताचे सिमेंट पत्रे तुटून पडले आहेत. शेडच्या दर्शनीय भागात असलेल्या दगडी खांब ढासळून पडण्याच्या अवस्थेत आहेत. इमारतीचे बांधकाम जीर्ण व वाईट अवस्थेत आहेत. शिल्लक राहिलेल्या छतावर गवत रुजलेले आहे. खिडकी देखील मोडकळीस आलेली आहे. तात्काळ शेडची दुरुस्ती करावी, असे निवेदन कोकण प्रवासी महासंघ यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ रत्नागिरी यांना दिले आहे.

या निवेदनात असे नमूद केले आहे की, रामपूर निवारा शेड येथे प्रतिदिन चारशे ते पाचशे एसटी प्रवासी प्रवास करत असतात. आता पाऊस सुरू आहे. तसेच कडाक्याचे ऊनही आहे. त्यामुळे नाईलाजाणे प्रवाशांना आपला जीव मुठीत घेऊन निवारा शेडमध्ये थांबावे लागत आहे. या निवारा शेड येथून अनेक गावाला जोडणारे एसटी ये-जा करीत असतात. त्यामुळे विद्यार्थी, वयोवृद्ध, अपंग या निवारा शेडचा वापर करतात. गेल्या दोन वर्षापासून या गोष्टीकडे कोकण प्रवासी महासंघ विभाग नियंत्रक रत्नागिरी व बांधकाम विभाग रत्नागिरी यांना निवेदनाद्वारे परिस्थितीची जाणीव करून देत आहेत. रामपूर निवारा शेड हे मृत्यूचा सापळा बनला आहे. तरी तात्काळ या निवेदनाचा विचार करावा अन्यथा नाइलाजाने प्रवाशांना रस्त्यावर उतरावे लागेल, असेही या निवेदन नमूद केले आहे.

या निवेदनावर महासचिव संस्थापक वसंत भोसले, अध्यक्ष गणेश चव्हाण, उपाध्यक्ष दीपक शिरकर, कार्याध्यक्ष अनिल कुमार जोशी, खजिनदार अविनाश चव्हाण, चिपळूण संपर्क दिलीप चव्हाण, गुहागर संपर्क दत्ताराम जाधव, सल्लागार मनोहर साळवी, सत्यवान महापुस्कर यांनी स्वाक्षरी केले आहे.

---

# फेरीवाल्यांची पदपथांवरील अतिक्रमणे कायम

**| पालघर | प्रतिनिधी |**

दिवाळीनिमित्त बोईसरमधील दुकानदार, विक्रेते आणि फेरीवाल्यांनी नागरिकांना चालण्यासाठी बांधलेल्या पदपथांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करून आपली दुकाने थाटली होती. दिवाळीचा सण संपून आठवडा उलटला तरी देखील पदपथांवरील अतिक्रमणे कायम आहे. दिवाळीनिमित्त निरनिराळ्या वस्तूंच्या विक्रीसाठी आपली दुकाने थाटून खास मंडप उभारले आहेत. विक्रेत्यांनी पदपथांवर केलेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांवर भर रस्त्यातून वाहनांच्या गर्दीतून वाट काढत इच्छित स्थळ गाठण्याची वेळ आली आहे. दुकानांसोबतच पदपथांवर दुचाकींची देखील बेकायदेशीर पार्किंग केली जात आहे. मुख्य रस्त्यांवरून वाहनांच्या गर्दीतून नागरिकांना नाईलाजाने वाट काढावी लागत असल्याने बोईसर तारापूर, बोईसर पालघर आणि ओसवाल एम्पायर परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत असून पदपथांवर घुसखोरी







केलेल्या फेरीवाल्यांवर कारवाईची नागरिकांकडून मागणी होत आहे.

---

# निवडक





## प्रकाश पाटील पुरस्काराने सन्मानित

**अलिबाग :** राज्यस्तरीय महाराष्ट्र कलारत्न पुरस्कार २०२५ ने अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील प्रकाश पाटील यांना सन्मानित करण्यात आले आहे. समाजाच्या प्रगतीसाठी आणि सक्षमीकरणासाठी कला, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील अथक कार्याची आणि त्यातून निर्माण झालेल्या सकारात्मक बदलाची दखल घेऊन कला, खेळाडू, शौर्य आणि सामाजिक आदर्श कार्यकर्त्यांना सन्मानित करण्याच्या उद्देशाने शिव प्रतिष्ठान पुणे संस्थेमार्फत हा सोहळा आयोजित केला जातो. या संस्थेमार्फत यंदाचा राज्यस्तरीय महाराष्ट्र पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथे दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी ज्ञानेश्वर माऊलींची पवित्र पुण्यभूमी आळंदी देवाची येथील समृद्धी मंगल कार्यालय येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी व्यासपीठावर डॉ. हेमंत वसेकर (पशुसंवर्धन आयुक्त), . सुवर्णा कुऱ्हाडे, मदन रेनगडे पाटील (संस्थापक अध्यक्ष) यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांच्याबरोबरच खारपाडा (पेण, रायगड) येथील देवदत्त घरत यांना त्यांच्या क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल सिनेतारका प्रतीक्षा जाधव आणि सुप्रसिद्ध गिर्यारोहक अन्वी घाडगे यांच्या हस्ते कलारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## नवी मुंबईत रक्ताचा तुटवडा

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगर पालिकेच्या रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा झाला असून रक्तदान करण्याचे आवाहन वैद्यकीय समाजसेवक करीत आहेत. ओ पॉझिटिव्हसारखे दुर्मिळ रक्त पूर्ण संपले असून सध्या रक्तासाठी रुग्णाच्या नातेवाईकांना भटकावे लागत आहे. नवी मुंबई महानगर पालिका वाशी से १० येथील प्रथम संदर्भ रुग्णालयात रक्ताचा तूटवडा आहे. दिवाळीची सलग सुट्टी असल्याकारणाने, कॉलेज बंद असल्यामुळे रक्ताची कमतरता भासत आहे. त्यात सुट्ट्या असल्याने रक्तदान शिबीर आयोजित केले जात जात नाहीत. नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयात थॅलोसेमिया, अपघात, प्रसूती अशा अनेक कारणांनी रक्त रोज लागते. रुग्णालयात विविध शास्त्रक्रिये दरम्यान ही अचानक रक्ताची गरज भासत असल्याने अगोदर रक्त तयार ठेवले जाते. मात्र अशा शस्त्रक्रिया करताना रक्त पुरवठाबाबत तांत्रिक अडचणी येत आहेत. यासाठी तरी सर्व नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, संस्था, संघटना, राजकिय पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी स्वतः नवी मुंबई मनपा प्रथम संदर्भ रुग्णालय वाशी येथील रक्तपेढीत येवून रक्तदान करा, इतरांना रक्तदान करण्याबाबत प्रोत्साहित करा आणि अमूल्य जीव वाचवा, असे आवाहन नवी मुंबई मनपा प्रथम संदर्भ रुग्णालयाच्या वतीने वैद्यकीय समाजसेविक करत आहेत.

## पालघरमध्ये मराठीकरण परिषदेचे आयोजन

**पालघर :** राज्यात पहिलीपासून त्रिभाषा धोरण अभ्यासासाठी शासनाने डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखाली समिती नेमली आहे. मात्र त्रिभाषा धोरणाविरुद्धचा लढा तीव्र करण्याचा इशारा पालघरच्या मराठी वाचवू समितीने दिला आहे. हिंदीला प्राधान्य देऊन मातृभाषा आणि भाषिक संस्कृती नष्ट करण्याचे कटकारस्थान असल्याचा आरोप करत न्यावर आवाज उठवण्यासाठी समितीने पालघरमध्ये शनिवारी १ नोव्हेंबर रोजी मराठीकरण परिषदेचे आयोजन केले आहे. नरेंद्र जाधव यांची समिती त्रिभाषा धोरणाच्या अनुषंगाने केवळ प्रश्नावलीच्या आधारे जनमानसांचा अंदाज घेत आहे. हे धोरणाला धरून नाही. केवळ प्रश्नावलीच्या आधारे हे धोरण कसे ठरवले जाऊ शकते, असा सवाल समितीमार्फत उपस्थित करण्यात आला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये पहिलीपासून तिसऱ्या भाषेच्या सक्तीचा कुठेही उल्लेख नाही आणि तशी शिफारसही नाही. राज्यात एकीकडे मराठी सक्ती पूर्णत्वास नसताना हिंदी विषयाची सक्ती करणे म्हणजे लहान मुलांचे शैक्षणिक हित, महाराष्ट्राची भाषिक-सांस्कृतिक ओळख पुसून टाकण्याचा हा प्रकार सुरू आहे. त्यामुळे या प्रकाराला कडाडून विरोध करण्याच्या दृष्टिकोनातून मराठीकरण परिषद महत्त्वपूर्ण ठरणार आहे. चुकीच्या पद्धतीने राबवण्यात येणाऱ्या धोरणाला आमचा विरोध असून शेवटपर्यंत भाषा वाचवण्यासाठी लढत राहणार, असा ठाम निर्धार समितीने केला आहे.

## भातशेतीसह नाचणी पिकाचेही नुकसान

**रत्नागिरी :** दापोली तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची गुंठ्यांतील शेती त्यात कुणी भाताची लावणी केली होती; तर कुणी नाचणी,



वरी पिकाची लावणी केली होती. यावर्षीचा खरीप हंगाम सुरू होण्याआधीच यावेळी ११ मे पासूनच मोसमी पावसाला सुरुवात झाली. सुरुवातीच्या काळात सुरू झालेल्या पावसाने सगळीकडे पाणीच पाणी केल्याने अनेकांच्या भात नाचणी पिकांच्या पेरण्या रखडल्या होत्या. त्याला हार न मानता शेतकऱ्यांनी डोंगर उतारावर नाचणीची पेरणी करून रोप तयार केले. शेतकऱ्यांनी केलेल्या अतोनात मेहनतीमुळे शेती देखील चांगलीच तरारली होती. भात पिकासह नाचणी पीक परिपक्व झाल्याने ते कापण्यायोग्य झालेले असतानाच लहरी हवामानाचा प्रकोप झाला आणि निसर्गचक्र बदलून पावसाची जोरदार बरसात झाली. त्यात कापण्याजोगे तयार झालेली भातशेती पुर्णतः भातशेतीच्या चोंढयातच आडवी झाली. भिजलेल्या भाताचा पेंढा गुरे तोंडात घेत नाहीत. त्यामुळे गुरांच्या वैरणीचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे.

## ‘कृषी समृद्धी योजनेचा लाभ घ्यावा’

**रत्नागिरी :** शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी महत्वाकांक्षी कृषी समृद्धी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत शेतकऱ्यांना सिंचन सुविधा, फलोत्पादान तसेच यांत्रिकीकरणांसंबंधी अनुदान दिले जाणार आहे. या योजनेचा लाभ घ्या, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी अभिजित शेलार यांनी केले आहे. कृषी समृद्धी योजनेत प्रथम अर्ज करणाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. यासाठीचे अर्ज वेबसाईटवरून महाडीबीटी पोर्टलवर करावयाचे आहेत. या योजनेसाठी अर्ज करण्याकरिता ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी व गावातील सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा. सिंचन सुविधांमधून शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक मोटारपंप, डिझेल/पेट्रोल इंजिन, पाईपसंच पुरवठा, ठिबक सिंचन व तुषार सिंचनाकरिता अनुदान देण्यात येणार आहे. सिंचन संलग्न योजनेमधून ठिबक व तुषार सिंचनाकरिता २० गुंठे ते ५ हेक्टरपर्यंत लाभ घेता येईल. या अंतर्गत लहान व सीमांत शेतकरी, इतर शेतकरी व अनुसूचित जाती व जमातीमधील शेतकरी यांच्यासाठी मिळणाऱ्या अनुदानाची मर्यादा वेगवेगळी आहे. फलोत्पादनमध्ये हरितगृह, शेडनेट, मल्चिंग पेपर, वीडमॅट, पॅकहाऊस, फळप्रक्रिया केंद्र, आंबा पुनरूज्जीवन, रोपवाटिका उभारणी व औषधी, मसाला, फूलशेती क्षेत्रविस्तार याकरिता अनुदान मिळणार आहे.

---

पान १ वरून

## छोटमला सक्तमजुरी

मिळालेल्या माहितीनुसार, बहिरोळे येथील रुपाली थळे या चोंढी येथील व्हिटेवा कॉम्प्युटर क्लासमध्ये ११ सप्टेंबर २०१२ रोजी सायंकाळी ६० मुलांचे वर्ग घेत होत्या. त्यांच्याकडे काम करणारा भूषण साबळे याला चहासाठी काही वस्तू आणण्यासाठी पाठविले होते. भूषणसोबत शाहबाज खानही गेला होता. ते दोघे बराच वेळ परत आले नाही. त्यामुळे त्यांना बाहेर पाहण्यासाठी थळे या गेल्या होत्या. त्यावेळी चोंढी नाक्यावर भूषण साबळे व शाहबाज खान यांना अतिष सुर्वे, सज्जाद मुल्ला, विक्रम साळुंखे व विक्रांत कुरतडकर ही मंडळी शिवीगाळी करुन धक्काबुक्की व मारहाण करीत होती. याबाबत मध्यस्थी करुन भूषण, शाहबाज व त्या चौघांना क्लासच्या मागे असलेल्या हॉलमध्ये नेले. त्यांच्यामधील वाद मिटवून पुन्हा क्लासमध्ये आले.

दिलीप भोईर उर्फ छोटम व त्यांचे सुमारे २५ ते ३० साथीदार हे काही हत्यारांसहीत क्लासमध्ये घुसले. ते भूषण व शहाबाजला शिवीगाळी व धक्काबुक्की करु लागले. त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांनी थळे यांनादेखील शिवीगाळी करुन धक्काबुक्की केली. तरीदेखील त्यांना पुन्हा समजावून क्लासच्या बाहेर जाण्यास सांगितले. दिलीप भोईर, राहुल दिलीप भोईर, विकम साळुंके, विक्रांत कुडतरकर उर्फ विकी, विशाल साळुंके, सज्जाद मुल्ला यांनी क्लासचे बॅनर फाडून तोडफोड केली. दिलीप भोईर यांनी त्यांच्या हातातील तलवारीने रुपाली थळे यांना मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी हाताने अडविण्याचा प्रयत्न केला. परंतु, थळे यांच्या उजव्या हाताच्या करंगळीस दुखापत झाल्याने रक्त आले. भूषण व शहाबाज यांनी थळे यांना त्यांच्या धक्काबुक्कीतून सोडविण्याचा प्रयत्न केला. दिलीप भोईर व त्यांच्या साथीदारांनी भूषण, शहाबाज व थळे यांना बाहेर खेचून रस्त्यावर आणून मारहाण केली. त्यावेळी रुपाली थळे यांचे पती विजय थळे, त्यांचे मित्र अविनाश म्हात्रे व शिवाजी ईटकर त्याठिकाणी आले. त्यांनी या मारहाणीतून रुपाली थळेंसह अन्य मंडळींना सोडविण्याचा प्रयत्न केला. दिलीप भोईर यांनी विजय थळे यांना खाली पाडून त्यांच्या डोक्यावर तलवारीने वार करून त्यांना गंभीर जखमी केले. राहुल भोईर यांनी लोखंडी शिगेने त्यांच्या पाठीवर एक झोड घातली. विक्रम साळुंके यांनी रुपाली थळे यांच्या उजव्या हातावर शिगेचा फटका मारला. विकी कुडतरकर याने स्टम्पने पाठीत झोड घातली. विशाल साळुंके याने उजव्या मांडीवर लोखंडी शिगेने झोड घातली. मकरंद भोईर याने एका लाकडी दांडक्याने कमरेवर झोड घातली. दरम्यान, सोडविण्यास आलेल्या रुपाली थळे यांच्या नणंद मनिषा मनोहर घरत यांनादेखील धक्काबुक्की, शिवीगाळी व मारहाण केली. त्यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण कोणीतरी खेचून नेले आहे.याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी अलिबाग येथील न्यायालयात त्यांच्याविरोधात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. चोंढी नाक्यावर घातक शस्त्राने मारहाण केल्या प्रकरणाचा निकाल अखेर तेरा वर्षांनंतर लागला. न्यायालयाने दिलीप भोईर यांच्यासह २१ जणांना गुरुवारी सायंकाळी शिक्षा सुनावली आहे. त्यामध्ये शिंदे गटातील दिलीप उर्फ छोटम विठ्ठल भोईर, विक्रम वामन साळुंखे, विक्रांत विश्वनाथ कुडतरकर, मकरंद रवींद्र भोईर, विकेश वसंत ठक्कर, भरत अभिमान्य खळगे, गणेश रमेश म्हात्रे, संतोष वामन साळुंखे, सज्जाद शगीर मुल्ला, गणेश बळीराम भोईर, विवेक विश्वनाथ कुडतरकर, शिशिर शंकर म्हात्रे, हेमंत अनंत केळकर, जयवंत शामराव साळुंखे, विरेश रमेश खेडेकर, प्रभाकर रामचंद्र गवाणकर, प्रसाद दत्ता शिवदे, अशोक शांताराम थळे, मनोज जगन्नाथ थळे, राजेंद्र काशिनाथ ठाकूर, विजय राजाराम ठाकूर यांचा समावेश आहे.

**न्यायालयाच्या परिसरात समर्थकांची गर्दी**

चोंढी नाक्यावरील घातक शस्त्राने मारहाण प्रकरणाची सुनावणी अलिबागमधील न्यालयात होणार होती. त्यामुळे या निकालाकडे अलिबागसह संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले होते. दिलीप भोईर यांच्या समर्थकांनी अलिबागमधील न्यायालयाच्या परिसरात दुपारपासून रात्री उशिरापर्यंत गर्दी केली होती. यावेळी पोलिसांचा बंदोबस्तदेखील होता. विशेष सरकारी अभियोक्ता ॲड. प्रसाद पाटील यांनी केलेले युक्तीवाद, तपासलेले साक्षी पुरावे, पोलिसांचा तपास आदी पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने दिलीप भोईर यांच्यासह २१ जणांना दोषी ठरवत शिक्षा सुनावली. रात्री सव्वादहा वाजतच्या दरम्यान सर्व आरोपींना वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले.

## कारचे सनरुफ ठरले जीवघेणे

तोडून हा दगड आतमध्ये घुसला आणि आतमध्ये बसलेल्या महिलेच्या डोक्यात आदळला. स्नेहल गुजराती (४३) असे या या महिलेचे नाव असून, त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवार, दि.३० ऑक्टोबर रोजी सकाळी घडली. या अपघाताबाबत अधिक वृत्त असे की, पुण्याहून गोरेगाव तालुका माणगावकडे एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी गुजराती कुटुंब फोक्स वॅगन कारने येत होती. त्यांची गाडी ताम्हिणी घाटात माणगावजवळील कोंडेथर गावच्या हद्दीत आली असता डोंगरातून एक भला मोठा दगड कारवर पडून तो दगड कारच्या आत जाऊन स्नेहल गोविंदास गुजराती, (४३) रा. पिंपरी चिंचवड, पुणे यांच्या अंगावर पडला. या अपघातामध्ये त्यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर त्यांचे पार्थीव माणगाव उपजिल्हा रुग्णालय येथे आणण्यात आले. या घटनेची माहिती समजताच माणगाव पोलीस घटनास्थळी व उपजिल्हा रुग्णालयात तातडीने दाखल झाले. तसेच माणगाव शहरातील गुजराती कुटुंबीय, यांचे नातेवाईक व मित्रपरिवार यांनी उपजिल्हा रुग्णायात धाव घेऊन या अपघाताबाबत हळहळ व दुःख व्यक्त केले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून, अधिक तपास माणगाव पोलीस करीत आहेत.

## सुरक्षारक्षक वेतनाविना

कंपनीकडून एकूण ४८ लाख रुपयांहून अधिक वसुली होणे बाकी आहे. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी पनवेल तहसीलदार यांना पत्र देऊन वसुलीची कार्यवाही करावी, असे आदेश दिले. त्यानंतर पनवेलच्या तहसीलदारांनी कंपनीला नोटीस बजावली. दुसरी नोटीस देण्यास दिरंगाई करीत असल्याचा आरोप सुरक्षा रक्षकांनी केला आहे. याबाबत गुरुवारी (दि.२९) सुरक्षा रक्षक मंडळातील विलास मोरे व अन्य मंडळींनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

> गेल्या दोन दिवसांपूर्वी पनवेल शहर तहसीलदार म्हणून पदभार स्वीकारला आहे. सुरक्षा रक्षक मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत माहिती घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल.
> **– मीनल भामरे, तहसीलदार, पनवेल (शहर)**

## सीफूडच्या कंपनीविरोधात ग्रामस्थ आक्रमक

त्यामुळे येता-जाता नागरिकांना दुर्गंधीचा त्रास कायमच होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

वेलवली येथील ग्रामस्थांनी शुक्रवारी सीफूडच्या कंपनीत जाऊन तेथील संस्था चालकाला घेराव घातला. दुर्गंधीबाबत जाब विचारण्याबरोबरच या कंपनीत स्थानाकांना प्राधान्याने घेण्याबाबत विचारणा केली. कंपनीतील मासळीचा काहीच त्रास होत नाही. साहेब बाहेर गेले आहेत, असे कारण सांगून तेथील संस्था चालकाने ग्रामस्थांचे बोलणे टाळण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप निर्माण झाला. त्यामुळे या प्रकल्पाविरोधात आगामी काळात तीव्र भूमिका घेतली जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला. सीफूड कंपनीतील सांडपाण्यामुळे परिसरातील भातशेती धोक्यात आली असून, मानवी आरोग्यदेखील संकटात आले आहे. वेगवेगळे आजार उद्‌भवण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली. यावेळी सचिन म्हात्रे, धीरज म्हात्रे, विलास ठाकूर, जयवंत थळे, अनंत म्हात्रे, नरेंद्र पाटील, शत्रुघ्न ठाकूर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

> पुष्पाई सीफूड कंपनी वेलवली परिसरात आहे. मासळी स्वच्छ करून त्यावर प्रक्रिया केली जाते. त्यानंतर पॅकिंग करून देश-विदेशात मासळी पाठविण्याचे काम कंपनीमार्फत केले जात आहे. कंपनीतील टाकाऊ वाया जाऊ नये, यासाठी कंपनीच्या तीन एकर जागेत बाग तयार करण्यात आली आहे. दुर्गंधी पसरू नये, यासाठी नियोजन केले आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही.
> **– मंदार गाळींदे, मालक पुष्पाई सी फूड कंपनी**

## राणीची बाग ६ नोव्हेंबरला बंद

पर्यटक याठिकाणी भेट देत असतात. दरम्यान, ही बाग साप्ताहिक सुट्टीनिमित्त दर बुधवारी बंद असते. मात्र, महानगरपालिकेने यापूर्वी मंजूर केलेल्या एका ठरावानुसार बुधवारी सार्वजनिक सुट्टी आल्यास त्यादिवशी उद्यान व प्राणीसंग्रहालय जनतेसाठी खुले राहते, तर त्याच्या दुसऱ्या दिवशी बंद ठेवण्यात येते. त्यामुळे या ठरावानुसार बुधवार, ५ नोव्हेंबर रोजी वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालय जनतेसाठी खुले राहणार आहे, असे महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## पोकलनमधील डिझेलचोरी

बायपास येथील चिल्डकॉन कंपनीच्या साईडवर चिल्डकॉन कंपनी अधिकारी शैलश दादासो तोरणे, रा. रेवदंडा यांचे संमतीशिवाय स्वतःच्या फायद्यासाठी पोकलेनच्या डिझेल टँकमधून पाईपच्या सहाय्याने १०० लीटर अंदाजे ९१०० रूपये किमतीचे प्रतिलीटर ९१ रूपयांच्या डिझेलची चोरी केली, अशी तक्रार रेवदंडा पोलीस ठाण्यात शैलश दादासो तोरणे यांनी केली.

याबाबतची तक्रार रेवदंडा पोलिस ठाणे पोलीस नाईक सुग्रीव गव्हाणे यांनी दाखल केली असून, रेवदंडा पोलीस ठाण्याचे इन्चार्ज श्रीकांत किरविले यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## आरोपी रोहित आर्यचा एन्काऊंटर

त्यामुळे हे प्रकरण मिटू शकलं नाही, अशी माहिती पोलिसांनी घटनास्थळावर माध्यमांना दिली आरोपीच्या मृत्यूपूर्वी दिली होती. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही मुले मागील दहा दिवसांपासून सुरू असलेल्या एका शूटिंग ऑडिशनसाठी बोलावण्यात आली होती. सुटका केलेल्यांमध्ये १७ मुलं, एक महिला आणि एका ज्येष्ठ नागरिकाचा समावेश असून, सर्वांना तपासणीसाठी सेव्हन हिल्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे..माथेफिरुच्या कृत्याचा तपास पोलीस उपायुक्त दत्ता किशन नलावडे यांनी सांगितले की, दुपारी १.४५ वाजता या घटनेची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलीस पथके घटनास्थळी दाखल झाली. आत अडकलेल्या मुलांचा बचाव करण्यात आला. एकूण १७ मुले आत अडकलेली होती, ज्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. आरोपीने त्यांना ओलीस ठेवण्यामागचे कारण व त्याच्या मागण्या काय होत्या याबाबत पोलीस तपास करत आहेत.

# निवडक

## विनामूल्य बाल संस्कार वर्ग

**अलिबाग :** आगरी समाज संस्था, अलिबाग यांच्या सौजन्याने व मनशक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा (शाखा अलिबाग) यांच्या वतीने विनामूल्य बाल संस्कार वर्ग रविवार, (दि.२) नोव्हेंबर २०२५ पासून सुरू होत आहे. हा वर्ग दर रविवारी सकाळी ९.०० ते १०.३० या वेळेत गावदेवी मंदिर, रामनाथ तळ्याजवळ, अलिबाग येथे आयोजित करण्यात येणार आहे. या वर्गामध्ये ५ ते १२ वयोगटातील बालकांना सहभागी होता येईल. या वर्गाद्वारे मुलांमध्ये संस्कार, चारित्र्य विकास, मूल्य शिक्षण आणि व्यक्तिमत्व विकास घडविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या वर्गाचे मार्गदर्शन सुप्रिया प्रभाकर ठाकूर (९६५७२३४४८२) या करतील. आगरी समाज संस्था अलिबाग ही समाजोपयोगी कार्यात अग्रेसर संस्था असून, संस्थेच्या माध्यमातून विवाहमिलन वधू-वर परिचय केंद्र, करिअर मार्गदर्शन, वृक्षारोपण व संवर्धन, पुस्तक पेढी, नोकरीविषयक सूचना मंच, तसेच प्रस्तावित आगरी समाज भवन या उपक्रमांसह विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्य राबवले जात आहे. बालसंस्कार वर्ग हे त्याच समाजसेवेच्या परंपरेतील आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त मुलांनी ह्या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष निलेश पाटील (९५२७३०८१३३) यांनी केले आहे.

## पायीवारी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**खांब :** रोहे तालुक्यातील संभे ते आळंदी ताम्हिणी घाट मार्गे पायीवारी दिंडी सोहळ्याचे आयोजन शुक्रवार (दि.७) ते सोमवार (दि.१७) नोव्हेंबर या कालावधीत करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. गुरूवर्य अलिबागकर महाराज यांच्या कृपात्राखाली व गुरूवर्य गोपाळबाबा वाजे यांचे आशिर्वादाने नारायण दहिंबेकर व नारायण महाबळे यांच्या संकल्पनेतून सदर पायीवारी दिंडी सोहळा गेल्या २५ वर्षाची यशस्वी परंपरा चालू आहे. तर दिंडीचे उगमस्थान भैरीनाथ मंदिर मु. संभे-कोलाड हे असून येथून भाविक भक्त व भगिनींच्या उपस्थितीत सदर दिंडीचे आळंदीकडे प्रस्थान होणार आहे. अकरा दिवसांचे दिंडी सोहळ्यात दररोज अखंड हरिनाम नामस्मरण, हरिपाठ, भजन, प्रवचन व किर्तनसेवा आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम नित्यनेमाने संपन्न होणार असल्याचे व दिंडी सोहळ्याचे यशस्वीतेसाठी तुकाराम बांदल, अनंत सानप, पांडुरंग सानप, गणेश नलावडे, जितेंद्र दहिंबेकर, दत्ता तेलंगे आदी पदाधिकारी मंडळीसह सर्व सदस्य व श्री. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सत्संग वारकरी सेवा मंडळ संभे, ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच वीर हनुमान क्रीडा मंडळ संभे मेहनत घेत असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.



## ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापन दिन

**उरण :** उरण तालुक्यातील सोनारी येथे मंगळवार (दि.२८) ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ नागरिक संघाचा नववा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी दा. चां. कडू, प्रा. एल. बी. पाटील, रमाकांत म्हात्रे, डॉ. अविनाश तांडेल, शांताराम लेंढे, सुजाता कडू, अजय म्हात्रे, रोहिदास. मो. पाटील, सुभाष. बा. कडू, एन. आर. कडू, प्रभाकर काळा कडू, के. के. कडू, केशव तांडेल, केशव. आ. कडू, रामकृष्ण तांडेल, हरिश्चंद्र कडू, भरत रसाळ, हरी तांडेल, प्रभाकर गो. तांडेल आदीसह गावातील अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश कडू यांनी केले तर आभार के. के. कडू मानले.

## बालग्राममध्ये चित्रकला स्पर्धा

**पनवेल :** दिवाळी सणाच्या औचित्याने इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे खांदा कॉलनी येथील बालग्राम अनाथालय येथे दिवाळी फराळ वाटप व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून अनाथालयातील मुलांसोबत दिवाळीचा आनंद उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मुलांना पारंपरिक दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. फराळ स्वीकारताना मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदी हास्य हेच दिवाळीचे खरे सौंदर्य ठरले. तसेच, मुलांच्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला वाव देण्यासाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत मुलांनी विविध रंगांच्या माध्यमातून दिवाळीचे तेजस्वी चित्रण करत सणाचा आनंद अधिक खुलवला. या उपक्रमातून मुलांच्या मनात आनंद, आपुलकी आणि सणाचा उत्साह जागवण्यात यश आले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- अलिबागमध्ये दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क- ७९७२९३३७०, ९८२२४६१७६१
- For share market bolt operations fresh or experienced, graduate or post graduate candidates required for office in Alibag.For interview Contact- 9923750549
- ऑफिस कामाकरीता अनुभवी अकाऊंटंट महिला/मुलगी पाहिजे. अनुभव २ ते ३ वर्षे शैक्षणिक पात्रता बी.कॉम टायपिंग व बेसिक कॉम्प्युटर पगार रू.१०,०००/- ते १२,०००/- संपर्क : मु.पो.झिराड, ता.अलिबाग जि.रायगड मोबा नं. ८९८३०९३३५३/८००७४८२२९८
- ''जन्नावार हॉस्पीटल'' अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509
- कामासाठी माणसे पाहिजेत. अलिबाग परिसरातील गरजूनी वयोगट २८ ते ४० १) मोटारसायकल डिलिव्हरी अलिबाग ते पेण अलिबाग ते मुरुड. २) मोबाईल विक्रीसाठी सेल्समन स्वत:ची बाईक लायसन्स गरजेचा. ३) व लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर ४) पार्ट किंवा फुल टाईम, ५) फोरव्हीलरमध्ये मदत करणारा. मो. ८८८८२२०२२१
- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# बळीराजाच्या डोळ्यात अश्रूंचा पूर



■ सततच्या पावसाने शेतकरी हवालदिल

■ वादळीमुळे शेती पाण्याखाली

**। कापोली । प्रतिनिधी ।**

सतत पडणाऱ्या पावसाने भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. शक्यतो ऑगस्ट महिन्यानंतर पाऊस कमी कमी होत जातो. परंतु सप्टेंबर अखेरीसही पावसाचा जोर कायम असल्याने रायगड जिल्ह्या म्हणजेच भाताचे कोठार असा लौकिक असलेल्या जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे.

शेतकऱ्यांना शेती करून फळ खायची वेळ आली अन अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हातचा घास हिरावून घेतला आहे. बळीराजाच्याला काय करावे सुचेनासे झाले आहे. अशी अवस्था कोकणातील शेतकऱ्यांची झाली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील बहुतांश भागात नुकसान झालेले आज निदर्शनास येत आहे. रितसर पंचनामे होऊन गुंठावारी नुकसान भरपाई मिळावी असा मागणी आता जोर धरू लागली आहे. कारण कोकणातील बहुतांश शेतकऱ्यांची एकरी जमीन नाही अणि शासन तुटपुंजी एकरी वारी नुकसान भरपाई मंजूर करते. हा प्रकार शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ लावल्यासारखे आहे.

शेतकऱ्यांच्या वर्षाच्या मेहनतीवर पावसाने पाणी फेरले असून कष्ट करून लावलेली काळ्या मातीतील भाताची रोपे अक्षरशः कोलमडून पडली असून, पिके पाण्याखाली गेली आहेत.

सततच्या पावसाने झालेले नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न सुरू असताना पुन्हा आलेल्या पावसाने शेतकरी हवालदिल झाला आहे.

तालुक्यातील भातशेती ही फक्त उत्पन्नाचे साधन नसून घरगुती धान्य आणि शेतीची परंपरा जपण्यासाठी घेतली जाते, मात्र हेक्टरी लागणारा खर्च आणि मिळणारे उत्पादनाचा ताळमेळ नसताना नैसर्गिक आपत्तीने सर्व गणित कोलमडून टाकले आहे. कष्टातून मळा फुलवू पाहणारा शेतकरी राजा आर्थिक संकटात सापडला असून, कर्जफेड करणे कठीण झाले आहे. वर्षाची अरेसरी म्हणून लावलेली पिके नष्ट झाल्यामुळे उत्पन्नाचे स्रोत बंद झाले आहेत.

### बळीराजाच्या पोटात भीतीचा गोळा

पाण्यावर तरंगत असलेले तण पाहून गळून पडलेले व मनाने खचलेल्या शेतकऱ्यांची अवस्था पाहिली तर मन हेलावून जात आहे.वाढत्या महागाईच्या काळात न परवडणारी शेती त्यातच कामाची वाढती मजुरी गाठीशी नसतानाही दरवर्षी असा निसर्ग कोप होत असण्याने बर्याच लोकांनी शेती करणे सोडून दिले आहे. वडिलोपार्जित शेती अजूनही काही गावातील लोकांनी राखून ठेवली आहे.ओसाड जाऊ नये म्हणून नाईलाजास्तव महागाईच्या झळा व निसर्गाने दिलेल्या कळा सहन करत जमिन ओसाड ठेवत नाहीत.

शेतकरी चिंतेत सापडल्यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे, मात्र पंचनाम्यानंतर प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात कधी येईल असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

रायगड जिल्हा भाताचा कोठार म्हणून ओळखला जातो. गेल्या काही वर्षातील औद्योगिकीकरणामुळे शेत-जमिनींची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. काही ठिकाणी शिल्लक राहिलेली शेती प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. या परिस्थितीत शेतकरी विविध जातीच्या भाताची लागवड करण्याचे प्रयोग करीत असतात. अशानेच वादळी पावसामुळे शिवारातील भाताचे पीक अक्षरशः आडवे झाले आहे. तालुक्यातील परिस्थिती अतिशय गंभीर असून, शासनाने आर्थिक मदत, कर्जमाफी, आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज आहे. ओला दुष्काळ जाहीर करून मदतीची प्रक्रिया अधिक गतिमान करावी, अशी मागणी संपूर्ण तालुक्यातील होत आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी तातडीने कार्यवाही केली नाही, तर आगामी काळात उपजीविकेवर बिकट संकट ओढवण्याची परिस्थिती निर्माण होईल. शेतकरी निराश होणार नाही ह्याची काळजी घेऊन शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

> शेती कशी करावी आणि का करावी हाच प्रश्न आमच्यापुढे पडला आहे. नोकरी सांभाळून वडिलोपार्जित शेती करुन शेती जपण्यासाठी आमचे प्रयत्न आहेत. पण,आता काही वर्षांपासून पाऊल निसर्ग चक्रच बदल्याने पिक हातातोंडाशी आल्यावरही पडत आहे. मग वर्षाची मेहनत फळाला कशी येणार?
>
> –अनंत खेडेकर
> शेतकरी (वेळास)

> प्रत्यक्ष बांधावर जाऊन पंचनामे व्हावे व ज्या शेतकऱ्याने आधीच शेत कापले आहे व मळणी दरम्यान सुद्धा नुकसान झाले आहे अशा शेतकऱ्याची सुद्धा नाव नुकसान भरपाईमध्ये समाविष्ट करण्यात यावे
>
> – धवल तवसाळकर
> सामाजिक कार्यकर्ता

# माणगावमध्ये शेतीचे अतोनात नुकसान

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

वादळी वाऱ्यासह आलेल्या मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे जगणे अक्षरशः उद्ध्वस्त केले आहे. सहा महिन्यांपासून चाललेल्या अखंड पावसाने आणि चार वेळा आलेल्या महापुराने आधीच थकलेल्या बळीराजाला आता या नव्या पावसाच्या फटक्याने गुडघे टेकायला भाग पाडले आहे.



उभ्या पिकांना झोडपून काढणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. रायगडसह माणगाव, रोहा, महाड आणि आसपासच्या भागात भात, भाजीपाला, फळबागा, कडधान्ये सगळंच पाण्याखाली गेले आहे. शेतात उभ्या भाताच्या रोपांना पुन्हा कोंब आले आहेत, जमिनीत पाणी साचून सर्वत्र चिखलच चिखल झाले आहे. पिके कुजून गेली आहेत, तर जनावरांसाठीचा चारा, पेंढाही भिजून निकामी झाला आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतीच्या जागा पाण्याने वाहून गेल्या असून जमिनीसुद्धा नापीक झाली आहे.

इतकं काही भोगूनही आम्ही पुन्हा शेती केली. पण आता काहीच शिल्लक नाही, असे अश्रू ढाळत सांगणाऱ्या माणगाव तालुक्यातील एका शेतकऱ्याचे शब्द कानात रेंगाळतात. शेतकरी हवालदिल आहेत. एकीकडे पिकांचे नुकसान, तर दुसरीकडे कर्जाचे हप्ते, घरच्यांची जबाबदारी, जनावरांना चाराच नाही. या सगळ्यात त्यांचा विश्वास ढळत आहे. या भीषण परिस्थितीची दखल घेत खा. सुनील तटकरे यांनी कृषीमंत्री दत्ता भरणे यांच्यासोबत बैठक घेतली. या बैठकीत जिल्ह्यातील नुकसानीचा आढावा घेऊन तातडीने पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मात्र, शेतकऱ्यांच्या मनात मात्र एक भीती घर करून बसली आहे की, याआधीही पंचनामे झाले, पण पैशांचा थेंबही हातात आला नाही, असे ते सांगतात. त्यामुळे यावेळी खरोखरच मदत मिळेल की नाही, याबद्दल शंका व्यक्त होत आहे. पिक गेलं, पण माणूस तरी वाचू द्या अशी म्हणण्याची वेळ त्यावर आली आहे.



## उरण पोलिसांकडून जनजागृती

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात पूर्व विभागात सारडे व पिरकोन गावात उरण पोलिसांच्या वतीने नागरिकांत जनजागृती करण्यासाठी गावातील महत्वाच्या ठिकाणी पोस्टर लावण्यात आले. तर काही ठिकाणी कॉर्नर बैठकाही घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये गावातील ग्रामस्थांना व महिलांसह तरुणाईला विविध प्रकारची प्रलोभने आणि गुन्ह्यांपासून सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले.

उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हनिफ मुलाणी, सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीन खाडे यांच्या पोलीस पथकाने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे महत्व तसेच दिवसा व रात्री घरफोडी, चैन स्नॅचिंग, बतावणी, सोने चांदी उजळून देतो, असे विविध प्रकारचे स्ट्रीट क्राईम समावेश आहे. ग्रामस्थांमध्ये कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडण्याची जनजागृती करण्यात आली.

## निर्मला पाटील यांचे निधन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



अलिबाग तालुक्यातील जांभुळपाडा येथील रहिवासी भजन सम्राट बाळाराम पाटील यांच्या पत्नी व संगित शिक्षक मनोहर पाटील यांच्या आई निर्मल पाटील यांचे सोमवार (दि.२७) ऑक्टोबर रोजी वयाच्या ७९ व्या वर्षी राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर मंगळवार (दि.२९) जांभुळपाडा येथे अत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकिय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

निर्मला पाटील या सुस्वभावी व प्रेमळ वृत्तीच्या होत्या. त्यांनी आपली मुले व नातवंडे यांना चांगले शिक्षित करून सुसंस्कृत केले होते. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुना, पुतणे, नातवंडे व पाटील कुटुंबाचा फार मोठा गोतावळा आहे. त्यांचे दशक्रिया (दि.५) नोव्हेंबर रोजी तर उत्तरकार्य (दि.७) नोव्हेंबर रोजी राहत्या घरी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## मोहोपाड्यातून तरूण बेपत्ता

**रसायनी :** मोहोपाडा येथील नितीन रघुनाथ पंडीत (वय ४०, रा. नविन पोसरी, मोहोपाडा, ता खालापूर हा घरातून जेवण पार्सल आणण्याकरीता गेला होता तो अध्यापही घरी परत आला नाही. त्याची पत्नी ज्योती पंडीत यांनी रसायनी पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार दाखल केली आहे. रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा पानपट्टे अधिक तपास करीत आहेत.

## खोपटे-कोप्रोली रस्त्याची दुरुस्ती सुरु

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



उरणकरांच्या वाहतुकीसाठी महत्वपूर्ण असलेल्या खड्डेमय खोपटे कोप्रोली मार्गाच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. हा मार्ग उरणकरांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. हा रस्ता दुरुस्तीच्या प्रतिक्षेत होता. लेखी निवेदने, आंदोलने असा संघर्ष करत या मार्गाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. सुमारे अकराशे मीटर लांबीचा मार्ग आहे. या मार्गाच्या दुरुस्ती पुढील तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. आता या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने येथील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे. येथील नागरिक, प्रवासी आणि वाहतूकदार यांच्याकडून संताप व्यक्त केला जात होता. तर उरण सामाजिक संस्थेने आंदोलनाचा इशारा दिला होता. याची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त अभियंता नरेश पवार यांच्यासह स्थानिकांनी या रस्त्याची पाहणी केली. त्यानुसार या मार्गाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

> खोपटे कोप्रोली मार्गाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली असून यासाठी तीन महिने लागणार असून, एक किलोमीटरचा मार्ग दुरुस्त करण्यात येणार आहे.
>
> – नरेश पवार
> अतिरिक्त अभियंता
> सार्वजनिक बांधकाम विभाग

## वनजमीन आदिवासींच्या नावे करण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील आदिवासी वस्तीच्या आजूबाजूला असलेली वन जमीन आदिवासी लोकांना वापरण्यास देण्यात यावी अशी मागणी करणारे निवेदन कर्जत तालुका आदिवासी संघटनेचे वतीने देण्यात आले. आदिवासी जमात पूर्वी वन क्षेत्राला लगत वास्तव्य करून होती. त्यानंतर वन कायदा आला आणि आदिवासी लोकांचा वावर, वापर आणि वहिवाट असलेल्या जमिनी या वन जमिनी झाल्या. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील आदिवासी च्या ताबेकब्जात पूर्वजा पासून वनजमीनी तसेच दळीजमीनी वर हक्क सांगून आहेत. वनजमीनी आणि दळीजमीनी वर घेण्यात येत असलेली पीके यांची नोंद शासनाने घ्यावी अशी मागणी कर्जत तालुका आदिवासी संघटनेचे वतीने रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. आजपर्यंत २००६ वन हक्क कायदा अंतर्गत वन जमीनी, दळी जमीनी, गावठाण राहती घरे खालील जमीन आदिवासी च्या नावे झाल्या नाहीत.त्यामुळे आदिवासी समाज सातबारा उतारा मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत. यासाठी आदिवासी संघटनेचे कर्जत तालुका अध्यक्ष परशुराम दरवडा यांच्या उपस्थितीत रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

## सायबर सुरक्षा बाबत जनजागृती

**पनवेल :** सायबर सुरक्षा सप्ताह अनुशंगाने खांदेश्वर पोलीस ठाणे मार्फत पोलीस ठाणे हद्दतील विविध शाळा, महाविद्यालय व धार्मिक सामाजिक कार्यक्रमात सायबर सुरक्षाबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थितांना शाळेतील विद्यार्थ्यांना सोशल मिडीया वापराबाबत तसेच ऑन लाईन गेमिंगबाबत होणाऱ्या फसवणुकी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक ओपन करू नका, तसेच अनोळखी व्यक्तीस ओटीपी शेअर करू नका तसेच घाबरून न जाता पोलीस ठाण्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले.

पक्षी प्रेमींना, निरीक्षक, अभ्यासकांना पर्वणी | मे ते सप्टेंबर हा सुगरण पक्ष्यांचा विणीचा हंगाम

# शेत शिवारात सुगरण पक्ष्यांची घरटी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शेत शिवारात सुगरण पक्षांनी मोठया प्रमाणात घरटी बांधली असून पक्षी प्रेमींसाठी ही एक मोठी पर्वणी ठरत आहे. जैवविविधतेने नटलेल्या रायगड मध्ये पावसाळा सुरू झाल्यानंतर सर्वत्र विविध प्रकारच्या वनस्पती, गवत, फुलझाडे उगवली आहेत. शेतांमध्ये भात शेती बहरत आहे. ही भातशेती तयार होत असतानाच अनेक पक्षी शेतांच्या खाजनात माळरानांवर दिसून येत आहेत. यातच लक्ष वेधून घेणारा इवल्याशा आकाराचा असणारा सुगरण पक्षी घरटी बांधण्याच्या कामात व्यस्त झाला असून झाडांवर, फांद्यांमधून अनेक घरटी दिसू लागली आहेत.



सुगरणीचे घरटे पर्यावरणप्रेमी, छायाचित्रकार, पक्षी निरीक्षक, अभ्यासकांना खुणावत आहेत. रायगडमध्ये तयार झालेल्या भात शेतीच्या खाजणाजवळ सुगरण पक्षांनी आपल्या वसाहती उभारल्या असून एका एका झाडांवर पाच ते दहा घरटी टांगलेली दिसत आहेत. उत्तम कारागिरीचा नमुना म्हणून प्रसिद्ध असलेल्या सुगरण पक्षाची घरटी भातशेती परिसरात मुबलक प्रमाणात दिसत आहेत. विशिष्ठ प्रकारचे गवत व भाताच्या पातीपासून तयार केलेली ही घरटी सुगरण नर पक्षाने बांधली आहेत. बाभळी व काटेरी झाडांवर ही घरटी मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. विशिष्ट प्रकारचा घरट्याचा आकार, त्याची रचना व कौशल्य पूर्ण केलेले विणकाम यामुळे सुगरणीचे घरटे अतिशय सुंदर दिसते. मे ते सप्टेंबर हा सुगरण पक्षांचा विणीचा हंगाम असतो. नराने बांधलेल्या घरट्यात मादी आपली अंडी उबवून प्रजननाचे काम पूर्ण करते.

शेतीच्या प्रदेशात थव्याने हा पक्षी राहतो. भातपीक किटक व धान्य खातो. घरट्याला खालच्या बाजूने प्रवेशद्वार असते. खालून निमुळते, लांब बोगदा असलेले घरटे वर गोलाकार असते.

सुगरण पक्षाच्या तीन जाती असून पट्टेरी सुगरण, काळ्या छातीची सुगरण व बाया सुगरण भारत व शेजारील देशात हा पक्षी आढळतो. पक्षाचा आकार चिमणी सारखा असून मातकट काळा रंग असतो. बया, विवर म्हणजेच सुगरण पक्षी ओळखले जातात त्यांच्या विणकाम करून तयार केलेल्या घरट्यांमुळे, या पक्षांचा वीणीचा हंगाम मुख्यतः पावसाळी असतो. हे पक्षी थव्याने राहतात व नारळाच्या झाडांवर संघटीत घरटी बांधतात. भारताचे पहिले पक्षीशास्त्रज्ञ डॉ. सलिम अली यांनी किहीम येथे सुगरण पक्षांच्या विणीच्या हंगामाबद्दल अभ्यास केला होता. भातशेती बहरत आहे. काही पक्षांचा विणीचा हंगाम याच काळात सुरु होतो. विणीच्या हंगामा करिता सुगरण पक्षी घरटी बांधतात. हा पक्षी थव्याने राहतो. सुयोग्य व अनुकूल परिसर असल्याने मोठया प्रमाणात सुगरण पक्षाची घरटी दिसत आहेत. जैव विविधता व वन्य पक्षांसाठी व अभ्यासकांसाठी ही चांगली बाब आहे.

> सुगरण पक्षाचा मे ते सप्टेंबर विणीचा हंगाम असतो, विणीच्या हंगामात नराचा रंग पिवळा होतो, एरव्ही नर व मादी दिसायला सारखी असतात, विणीच्या हंगामात नर तीन चार खोपे विणतो. त्या सर्व खोप्या मधील एक खोपा मादी पसंद करते व नंतर दोघे मिळून खोपा पूर्ण करतात, मादी दोन ते चार अंडी देते ,अंडी उबवण्यापासून ते पिल्ले मोठे होण्यापर्यंत सर्व देखभाल मादी करते.
>
> – राम मुंढे,पशू पक्षी निरीक्षक.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल रोहिदास राजाराम धुळे व इतर यांनी खालील मिळकतीचे मालक तुजमीन मुजाहिद खोत व इतर यांच्याकडून खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीखताने घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

**मौजे अंत्राट तर्फे नीड ता. कर्जत जि.रायगड**

| गट क्र. व उपविभाग | क्षेत्र चौ. मी. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २८/१५ | ०-१६-०० | ०-२० |
| २८/१६ | ०-११-०० | ०-१० |
| २८/१४/अ | ०-८४-०० | ०-६५ |
| २८/१७ | ०-२५-०० | ०-२० |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, विकसनकरार, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि.३१/१०/२०२५

**ॲड. श्रीकृष्ण पालू डुकरे**
पत्ता-तुलसी सेंटर पॉइंट ऑफिस
नं. ४२, पहिला मजला, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो.९३२६२३९२५९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या भातशेती मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ३४ | ०-५९-२० पो.ख.०-०३-८० एकुण ०-६३-०० | ८.३१ | मधुसुदन एकनाथ पाटील |
| २) खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ४२ | ०-४१-४० पो.ख.०-०२-६० एकुण ०-४४-०० | ६.९३ | श्री.शंकर लक्ष्मण गावंड वगैरे १० |
| ३) खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड. | ६२ | ०-११-९० पो.ख.०-००-२० एकुण ०-१२-१० | १.१२ | सुनिल दत्तू पाटील वगैरे |
| ४) खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ६३ | ०-३९-०० पो.ख. ०-०३-५० एकुण ०-४२-५० | ४.६९ | १) बळवंत अनंत पाटील २) यशवंत अनंत पाटील |
| ५) खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ६६ | ०-२६-५० पो.ख.०-००-८० एकुण ०-२७-३० | ४.०० | १) बळवंत अनंत पाटील २) यशवंत अनंत पाटील ३) अनुसया अनंत पाटील |
| ६) खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड. | ६९ | ०-५५-४० पो.ख.०-०१-६० एकुण ०-५७-०० | ८.३१ | सुनिल दत्तु पाटील वगैरे |
| ७) खारपेढांबे ता.अलिबाग, जि. रायगड. | ७३ | ०-४१-४० पो.ख ०-०१-८० एकुण ०-४३-२० | ३.९४ | १) अशोक रामभाऊ पाटील २) इंदुमती तुकाराम पाटील ३) स्मिता सुरेश पाटील |
| ८) खारपेढांबे ता.अलिबाग, जि.रायगड. | ७६ | ०-३३-७० पो.ख.०-०२-०० एकुण ०-३५-७० | ३.९४ | १) जयश्री भानुनंदन ठाकूर २) संदेश भानुनंदन ठाकूर ३) महेश भानुनंदन ठाकूर |
| ९) खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ८२ | ०-४८-८० पो.ख.०-००-५० एकुण ०-४९-३० | ५.०० | तुळसाबाई बाळाराम मोकल वगैरे १० |

सदरहू भातशेती मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ३०/१०/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतींचे विद्यमान मालक यांच्यामध्ये बोलणी करण्यात आलेली आहेत. मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व क्रमांक उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|
| काळोशी, ता.अलिबाग, | २/१ | ०-०४-१८ पो.ख.०-००-२० एकुण क्षेत्र०-०४-३८ | ०.१८ | |
| काळोशी, ता.अलिबाग, | २/२ | ०-०४-४८ पो.ख.०-००-५० एकुण क्षेत्र०-०४-९८ | ०.२१ | |
| काळोशी, ता.अलिबाग, | ३/१ | ०-११-८८ पो.ख.०-०१-५० एकुण क्षेत्र०-१३-३८ | २.६८ | |
| काळोशी, ता.अलिबाग, | ३/२ | ०-०७-२२ पो.ख.०-०९-०० एकुण क्षेत्र०-०८-२२ | १.६३ | फिरदोस होमी मसानी, फरिदा फिरदोस मसानी, |
| काळोशी, ता.अलिबाग, | ३/३ | ०-०६-४६ पो.ख.०-००-८० एकुण क्षेत्र०-०७-२६ | १.४६ | |
| काळोशी, ता.अलिबाग, | ३/५ | ०-०५-२६ पो.ख.०-००-८० एकुण क्षेत्र०-०६-०६ | १.२० | |
| काळोशी, ता.अलिबाग, | ३/८ | ०-१६-८० | ३.४५ | |
| काळोशी, ता.अलिबाग, | ६/२ | ०-०३-५८ पो.ख.०-००-८० एकुण क्षेत्र०-०४-३८ | ०.७२ | |
| काळोशी, ता.अलिबाग, | ३/४ | ०-३५-३६ पो.ख.०-०४-३० एकुण क्षेत्र०-३९-६६ | ८.०४ | अख्तर अदामजी पीरभोय |
| काळोशी, ता.अलिबाग, | ६/४ | ०-१८-५४ पो.ख.०-०३-०० एकुण क्षेत्र ०-२१-५४ | ३.७० | |

संदर्भित मिळकती पुर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ३१/१०/२०२५

**ॲड. किशोर म.हजारे**
बी.कॉम.एल.एल.बी.
००१, वैद्यबाग को. ऑप
हौ.सो.कामत आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे वायशेत, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत व घर मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अभय अनंत ठाकूर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**:: मिळकतीचे वर्णन ::**

| मौजे | भुमापन क्र | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वायशेत | १०/७/अ | ०-९९-८० | २.००/- |

सदर मिळकतीपैकी श्री. अभय अनंत ठाकूर यांचे अविभक्त हिश्श्याची मिळकत व त्यामध्ये बांधण्यात आलेली गट ग्रामपंचायत थळ मालमत्ता क्रमांक ५१७, क्षेत्रफळ ३१.२३ चौमी, ही घर मिळकत

सदरहू वर्णन केलेली जमीन व घर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतींत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ३१/१०/२०२५

सही /-
**ॲड. अनिकेत एच. गुरव**
पत्ता : श्रीबाग नं.२, अलिबाग, जि.रायगड
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी,
शिवाजी चौक, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र. २२९/२०२५

लक्ष्मी तुकाराम सावंत
रा. नाणोरे, ता. माणगाव — अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मुख्याधिकारी, ग्रामपंचायत मुख्याधिकारी
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.संतोष दत्ताराम सावंत यांचा जन्म/मृत्यू मौजे नाणोरे ता.माणगांव जि.रायगड या ठिकाणी दि.१०/०९/२०२२ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१८/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू नाणोरे येथे दि.१०/०९/२०२२ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३(३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. १०/०९/२०२२ रोजी नाणोरे ता.माणगांव जि.रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : २९/१०/२०२५

सही/-
**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती नंदिनी नंदकुमार पाटील रा. मराठी शाळे जवळ, वढाव बुद्रुक, बामणगाव, ता. अलिबाग, जि. रायगड २) श्रीमती प्रिया प्रितम पाटील रा. नवेदर बेली, पो. कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र.व उपविभाग नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चिंचोटी ता.अलिबाग | ५७/३ | ०-११-१० पो.ख ०-००-५० ०-११-६० | २-०६ |
| | ५७/४ | ०-१०-४० पो.ख ०-०१-२० ०-११-६० | २-०७ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. ३०-१०-२०२५.

**ॲड. आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे तळवली, ता. मुरुड, जि. रायगड येथील गट नंबर १ क्षेत्र ०-२१-०० हे. आर, आकार २ रुपये ४४ पैसे, ही भातशेती मिळकत, मिळकतीचे विद्यमान कबजेदार श्री रविंद्र पांडूरंग मेस्त्री उर्फ सुतार व मिळकतीचे इतर सहमालक यांचे खुद्द मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची असून सदर मिळकत आमचे आशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व सदर मिळकतींचे सह कबजेदारांतर्फे रविंद्र पांडूरंग मेस्त्री उर्फ सुतार यांच्यात झालेला आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबा कबजा हक्कनोंद दफ्तरी असलेले विद्यमान कबजेदार यांचाच आहे असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्न वस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार "खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट" यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कबजा मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांचाच आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. ३०/११/२०२५

**ॲड. श्रध्दा प्रदिप वैद्य**
'नागेश्वरभुवन', गणपती आळी,
मु.पो. नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

नि. ०७/ड
अर्जदारतर्फे ॲड.डी.एन.पाटील

## जाहीर नोटीस

**मुरुड येथिल मे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.चौ.अर्ज क्र.२५/२०२५

१) श्रीमती करिश्मा अक्षयकुमार जयसवाल,
वय २८ वर्षे, धंदा - गृहिणी,
२) दृष्टी अक्षयकुमार जयसवाल, — अर्जदार
वय ०५ महिने, धंदा - काही नाही
नं. १ व २ राहणार,
द्वारा दयाशंकर रामप्रसाद जयसवाल
मु. पो. मजगाव,
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड ४०२४०१.
नं.१ स्वत: करीता व नं. २ तर्फे
अ.पा.क.आई

**विरुद्ध**

कोणीही नाही — सामनेवाला

**अर्ज :- वारस दाखला मिळणेकरीता**

BOMBAY REGULATION VIII OF 1827 नुसार

आम्ही अर्जदार मे. कोर्टात नम्रपूर्वक विनंती अर्ज करतो की,

१) अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ यांचे वडील कै. अक्षय कुमार किसनलाल जयसवाल यांचा दिनांक १३/०७/२०२५ रोजी मौजे बारशिव गावच्या हद्दीत मोटार सायकल अपघात होवून मृत्यू झाला असून त्यांचे अंत्यविधी व अंतिम संस्कार हे मौजे मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथे त्यांचे वडील किसन लाल रामआधार जयसवाल, यांनी केले.

कै. अक्षय कुमार किसनलाल जयसवाल यांचे पश्चात त्यांना अर्जदार क्र. १ व २ हेच कायदेशीर वारस आहेत अर्जदाराचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत.

२)अर्जदार नं. १ व २ यांस त्यांचे शासकीय कामाकरीता व इतर खाजगी कामाकरीता अर्जदार हे कै. अक्षय कुमार किसनलाल जयसवाल यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतच्या वारस दाखल्याची आवश्यकता आहे.

३) कै. अक्षयकुमार किसनलाल जयसवाल हे मयत झाले असून अर्जदार नं. १ व २ यांस त्यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे अर्जदार यांचे नावे वारस दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी सदर अर्ज मे कोर्टात दाखल केला आहे.

तरी या बाबत कोणचीही हरकत असल्यास त्याने सदर हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या में न्यायालयात समक्ष हजर राहून लेखी स्वरुपात दाखल करावी. जर मुदतीत तशी कोणतीही हरकत आली नाही तर सदरचा दाखला अर्जदार यांस देण्यांत येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २९/१०/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी प्रसिद्ध केली.

सही/-
**दिवाणी न्यायालय क स्तर**
**क. लिपीक**

सही/-
**दिवाणी न्यायालय क स्तर**
**सहाय्यक अधिक्षक**

**अलिबाग नगर परिषद ता.अलिबाग जि.रायगड**

**जाहिर निविदा सन २०२५-२६**

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचे बांधकाम विभागा कडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन विविध कामाकरिता जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

टिप:- वरील निविदेमध्ये (०२) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहीती व निविदा फॉर्म साठी नगरपरिषद कार्यालयातील बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) संपर्क साधावा.

दिनांक : ३१/१०/२०२५

स्वा/-
मुख्याधिकारी
**अलिबाग नगरपरिषद जि.रायगड**

## अलिबाग नगरपरिषद

**ई-निविदा सूचना सन २०२५-२६**

अलिबाग नगरपरिषद घनकचरा संकलन व व्यवस्थापन अंतर्गत अलिबाग नगरपरिषद क्षेत्रातील दैनंदिन घरोघरी जाऊन कचरा संकलन आणि वर्गीकरण करणे आणि वाहनाने डेपोमध्ये घनकचरा जमा करणे आणि शहरातील रस्ते सफाई करणे व कचरा विलगीकरण करणे, कंपोस्टिंग प्लांटचे ऑपरेशन आणि देखभाल करणे इ सर्व स्वच्छता विषयक अनुषांगिक कामे करणेकामी ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई-निविदा सुचना शासनाच्या : https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ३१.१०.२०२५ पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेंत येईल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

## पनवेल महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**दरपत्रक**

जा.क्र.पमपा/बांधकाम/४४२५/प्र.क्र.१२/४०९७/२०२५ दिनांक : ३०/१०/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात तिसऱ्या मजल्यावरील सभागृह येथे Digital Screen बसविणे. | ३१/१०/२०२५ ते ०६/११/२०२५. (७ दिवस) |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. ३१/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वतः च्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmbandhkamdept01@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस विशेष करुन मौजे कर्जत नगरपरिषद हद्दीतील, ता. कर्जत, जि. रायगड. येथील लोकांस आमचे अशिल यांनी दिलेल्या तोंडी माहितीवरुन व दाखविलेल्या लेखी कागदपत्र व अधिकारावरून या जाहिर नोटीसने कळविण्यात येते ते खालीलप्रमाणे :

आमचे अशिल यांनी मौजे कर्जत नगरपरिषद हद्दीतील सिटी सर्व्हे नं. १७४/२६-३० मिथिला कॉम्पलेक्समध्ये ए विंग, तळमजला गाळा नं. १० क्षेत्र १५६ स्के. फुट कारपेट ऐरीयाची मालकी हक्क व त्यातील असणाऱ्या तदगंभुत वस्तुसह व सर्व हक्कासह हि मिळकत श्री संकेत दिपक जाधव व स्वरा-ली संकेत जाधव यांच्या मालकीची असून सदरील मिळकत या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना करारनाम्याने विकण्याचे निश्चित केले आहे. सदरील मिळकतीच्या विद्यमान मालकांनी सदरील मिळकत निर्वेध व निंजोखमीची असल्याचा व सदरील मिळकत आमचे अशिलांना विकण्याचा हक्क व अधिकार विद्यमान मालकांना असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांबरोबर सदर विद्यमान मालक खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

सबब या जाहिर नोटीसने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदरील मिळकतीवर कोणाचा खरेदी, विक्री, तारण, गहाण, लीज लीन, दान, पोटगी, कोर्टजप्ती, बक्षीस, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासहित आमच्याशी खालील पत्त्यावर संपर्क साधुन त्याबाबत खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरील मिळकतीवर वरील नमुद विद्यमान मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही, कसलाही हक्क वा अन्यथा सदरील हितसंबंध नाही अथवा असल्यास तो त्यांनी जाणीव पुर्वक सोडुन दिलेला आहे. असे समजुन आमचे अशिल खरेदीचा पुढील व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर कोणाची, कसलीही तक्रार याबाबत चालणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी. यासाठी ही जाहिर नोटीस दिली असे.

दिनांक : २८/१०/२०२५
ठिकाण : मोहोपाडा

सही/-
M. M. MALKAR
B.A.L.L.B.
Advocate Highcourt
श्रीस्मरण बंगला प्लॉट नं.८.
गणेशनगर नविन वसाहत रिस,
पो.मोहोपाडा, ता. खालापूर,
जि.रायगड. ४१० २२२.
मो.नं. ९९७०१११६२०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे वरसोली ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्याकडून माझ्या अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| वरसोली ता.अलिबाग जि.रायगड | २७७/३१/२ | ०-११-०० |
| वरसोली ता.अलिबाग जि. रायगड | २७७/३१/४ | ०-११-०० |
| वरसोली ता.अलिबाग जि. रायगड | २७७/३१/६/अ | ०-१५-०० |
| वरसोली ता.अलिबाग जि.रायगड | २७७/३१/६/ब | ०-१५-०० |
| वरसोली ता.अलिबाग जि.रायगड | २७७/३१/९ | ०-२८-०० |

तरी वरील संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, बक्षीस, लीज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांना हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात हरकत घ्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क, हितसंबंध नाही. अगर असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक - ३१/१०/२०२५

**ॲड. आशिष संदीप रानडे**
रा. रानडे निवास तात्या रानडे मार्ग
शिवलकर नाका अलिबाग-रायगड
मो.नंबर - ९२७०२९४५४५

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.११०४/२०२५

श्रीम. प्रमिला नथु करले उर्फ
अर्चना हरिश्चंद्र पिंचावडे — वादी
रा. पडघवली पो. परळी
ता. सुधागड, जि. रायगड

**विरूद्ध**

ग्रामपंचायत अधिकारी-ग्रामपंचायत परळी — प्रतिवादी
ता.सुधागड, जि.रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे**

**जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्रीम.प्रमिला नथु करले रा. पडघवली ता. सुधागड, जि. रायगड यांनी यांचा स्वतःचा जन्म दि. २२/१०/१९७१ रोजी मौजे-पडघवली ता.सुधागड, जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर प्रमिला नथु करले यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- २९/१०/२०२५

सही /-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून, आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री.सुरेश अमरसि राठोड | ५२/३ | ०.२४.०० | ०.१६ |

**वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.**

त्याअर्थी विद्यमान मालकाव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. सुरेश अमरसि राठोड यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत, असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल व सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक : ३०/१०/२०२५

सही/-
**ॲडव्होकेट, मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता -शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्
मुद्रे (बुद्रुक), ता.कर्जत, जि.रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे - पुलाचीवाडी, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमिन मिळकत त्या मिळकतीच्या मालक श्रीमती-मिनाक्षी तुकाराम चाटे यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे

| सर्वे. नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| २५ | ७/९ | ०.४०.०० | ०.२३ |

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हीनोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि: ३१/१०/२०२५

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ताः नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड,४१०२०१
मो.नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटिंग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



### पालीला अवैध पार्किंचा विळखा

**सुधागड-पाली** : पाली शहरातील हटाळेश्वर चौक ते गांधी चौक हा मुख्य मार्ग नगरपंचायतीने पार्किंगसाठी अधिकृतपणे खुला केला आहे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे याठिकाणी वाहने लावू नये, असे फलक लावण्यात आले असताना देखील वाहने अवैधरित्या लावली जात आहेत. या वाहन चालकांना पोलीस प्रशासनाची भितीच राहिली नसल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. तसेच, बाजारपेठेत दररोज हजारो नागरिक खरेदीसाठी येत असताना आयडीसी बँकेसमोर, हटाळेश्वर चौकात आणि एकता पथ खालच्या मोहोल्याकडे जाणाऱ्या अरुंद रस्त्यावर दुचाकी व चारचाकी वाहनांची सर्रास पार्किंग होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याबात अनेक वेळा तक्रारी, अर्ज आणि निवेदन देऊनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. या संदर्भात ॲड. नोएल चिंचोलकर आणि अन्वर परबलकर यांनी स्पष्ट इशारा दिला की, आगामी पंधरा दिवसांत जर या मार्गावरील अवैध पार्किंगवर कारवाई झाली नाही तर एकतापथ व खालच्या मोहोल्यातील नागरिक पाली नगरपंचायतसमोर उपोषणाला बसावे लागेल. दरम्यान, या भागातील नागरिकांनी प्रशासनाकडे पुन्हा एकदा विनंती केली आहे की, वाहन पार्किंगसाठी स्वतंत्र जागा निश्चित करावी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस व नगरपंचायत संयुक्तपणे पावले उचलावीत.



### कर्जत शहर बचाव समितीचे निवेदन

**कर्जत** : कर्जत शहर बचाव समितीद्वारे कर्जत नगर परिषद प्रशासन आणि पोलीस ठाण्याला निवेदन देऊन सर्वसामान्य नागरिकांना होणारा त्रास प्रशासनाच्या निदर्शनास आणण्यात आला आहे. तसेच, यावर प्रशासनाने त्वरित तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवदेनात सांगण्यात आले की, आम्ही डिसेंबर २०२४ मध्ये केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन कर्जत पोलिसांनी मुख्य बाजारपेठेत वन वे रूट सूरू केला, त्यामुळे बाजारातील वाहनांची वर्दळ बऱ्यापैकी कमी झाली. परंतु, एक बाब आमच्या लक्षात आली आहे की, याठिकाणी जोपर्यंत पोलीस उभे असतात तो पर्यंतच वन वे रूट अंमलात असतो. पोलीस गेले की जैसे थे परिस्थीती असते. तसेच, मुख्य बाजारपेठेत बेकायदेशीररीत्या रिक्षा लावल्या जातात, त्याामुळे देखील प्रचंड वाहतुक कोंडी होते. तसेच शनिवार-रविवार चारफाटा, श्रीराम पुल व छ. संभाजी महाराज चौक येथे वाहतुक कोंडीची गंभीर सम्स्या उद्भवते. त्यामुळे सर्वसमान्य नागरीकांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये यासाठी शहरात वाहतुक पोलीस कर्मचाऱ्यांची दिवसभर नेमणूक करावी. तसेच, सातत्याने नियम मोडणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करावी, इत्यादी समस्या निवेदनाद्वारे मांडण्यात आल्या आहेत.



### गाव समितीची सर्वसाधारण सभा

**वाघ्रण** : अलिबाग तालुक्यातील भुवनेश्वर मंदीर ट्रस्ट चिंचवली-नारंगी १८ गाव समितीची सर्वसाधारण विशेष सभा गुरुवारी (दि.३०) संपन्न झाली. या सभेच्या अध्यक्ष स्थानी मानकुळे-नारंगीचा टेप गावचे सामाजिक कार्यकर्ते सत्यविजय पाटील यांची निवड करण्यात आली. या सभेचे प्रास्ताविक करताना १८ गाव समिती अध्यक्ष दिपक पाटील यांनी मागील कालावधीत समितीने केलेल्या कामांवर प्रकाश टाकताना कार्यकारिणीच्या सहकार्यामुळे मंदीर परीसर आणि मंदिरात आवश्यक कामे केल्याचे नमूद केले. तर, भविष्यात अजून कामे करण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगीतले. यावेळी व्यासपीठावर उपाध्यक्ष कमळाकर पाटील, सचिव नरेंद्रकुमार पाटील, खजिनदार दयानंद म्हात्रे यांच्या सह १८ गावातील पंच उपस्थित होते. यावेळी मंदीर ट्रस्ट कार्यक्षेत्रातील उपस्थीत सरपंच, ग्रामस्थ मंडळ, सदस्य व अनेक उपस्थितांसमोर मंदीरासाठी वर्षभरात ज्यांनी सढळ हस्ते मदत करणाऱ्या दानशुरांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर सचिवांनी ट्रस्टचा वर्षभराचा अहवाल सादर केला. या अहवालावर नारंगी आणि हाशिवरेमधून उपस्थितांनी प्रश्न विचारले. त्यांची उत्तरे सभेचे अध्यक्ष, ट्रस्टचे अध्यक्ष, पदाधिकारी व काही संचालकांनी दिली.

### पनवेल परिसरात अनोळखी मृतदेह

**पनवेल** : परिसरात एक ५० वर्षीय अनोळखी मृतदेह आढळला आहे. पनवेल शहर पोलीस या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे. या व्यक्तीच्या उजव्या हाताच्या तळहातावर तसेच कोपराजवळ जखम झालेली असून डाव्या पायाला पांढऱ्या रंगाचा डाग आहे. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### राहत्या घरातून मोबाईलची चोरी

**पनवेल** : नवीन पनवेल परिसरात राहत्याा घरातून अज्ञात चोरट्याने ४ महागड्या मोबाईची चोरी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नवीन पनवेल सेक्टर १५ येथे राहणारे ऋषी खरात यांच्या घरातील एकूण चार मोबाईल चोरीला गेले असून त्यांची किंमत ५५ हजार रुपये इतकी होती. याबाबतची तक्रार ऋषी खरात यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात केली आहे.

# खाडीवरील पुलाचे बांधकाम तात्काळ थांबवा

## राज्य मच्छिमार संघाच्या माजी अध्यक्षांची मागणी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

स्थानिक मच्छिमारांना विश्वासात न घेता, राजपूरी खाडीजवळ पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. या पुलाच्या बांधकामामुळे स्थानिक मच्छिमारांवर उपासमारीची वेळ येण्याची भिती आहे. त्यामुळे अटल सेतूच्या धर्तीवर स्थानिक मच्छिमारांना मोबदला देण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ मुंबईचे माजी अध्यक्ष विजय गिदी यांनी केली आहे. अन्यथा शेकडो मच्छिमारांच्या सहाय्याने सागरी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देखील त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



राजपूरी खाडीमध्ये अनेक पिढ्यांपासून उपजिविकेचे साधन आहे. या खाडीमध्ये स्थानिक मच्छिमार मासेमारी करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. २००४ मध्ये राजपूरी खाडीमधील दिघी बंदरामध्ये दिघी पोर्टची निर्मिती झाली. त्यामुळे मच्छिमार क्षेत्र कमी झाले. त्याचा मच्छिमारांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम झाला आहे. मागील वर्षी १३ ऑक्टोबर रोजी मुरूड तालुक्यातील टोकेखार ते म्हसळा तालुक्यातील तुरूंबाडीच्या दरम्यान प्रवासी मार्गाच्या पुलाचे भूमीपूजन मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले होते. या पुलाचे भूमीपूजन स्थानिकांना विश्वासात न घेता करण्यात आले आहे. मुरूड तालुक्यातील राजपूरी, एकदरा खांबे, श्रीवर्धन तालुक्यातील दिघी कुडगाव, म्हसळा तालुक्यातील तुरूंबाडी, मेंदडी, खरसई, खारगांव, पाबरे व तळा तालुक्यातील रहाटाड, मांदाड, वाशी (हवेली) या परिसतरा हजारो कोळी समाज राहत असून मासेमारी हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. या व्यवसायातून त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालविला जात आहे. परंतु, या खाडीवर पुल तयार झाल्यास या मच्छिमारांच्या उदरनिर्वाहाचे साधन कायमचे नष्ट होणार आहे. त्यामुळे गरीब मच्छिमारांवर उपासमारीची वेळ येण्याची भिती आहे. त्यामुळे हजारो कुटूंब उद्ध्वस्त होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे मच्छिमारांच्या भविष्याचा विचार करून अटल सेतूप्रमाणे तेथील स्थानिक मच्छिमारांना देण्यात आलेलेला मोबदला येथील मच्छिमारांना देण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ मुंबई माजी अध्यक्ष तथा श्री महालक्ष्मी मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी राजपूरीचे चेअरमन विजय गिदी यांनी केली आहे. तसेच, मोबदल्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. ही कार्यवाही न झाल्यास, पुलाच्या बांधकामास एकही दगड लावून देणार नाही. त्याचबरोबर सागरी आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

राजपुरी खाडीवरील होणारे सर्वे व पुलाचे बांधकाम न थांबविल्यास आंदोलनाच्या माध्यमातून हे काम थांबविण्यात येईल याला सर्वस्व प्रशासन जबाबदार राहील असेही ते म्हणाले.

# चक्रीवादळाच्या इशाऱ्यामुळे मासेमारी ठप्प

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या चक्रीवादळाच्या इशाऱ्यामुळे रायगड जिल्ह्यातील खोल समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सुमारे ३ हजार बोटी समुद्रकिनाऱ्यावर परत आल्या आहेत. उर्वरित बोटींच्या सुरक्षित परतीसाठीही प्रशासन आणि बंदर विभाग सतत संपर्कात आहेत. चक्रीवादळाचा इशारा मिळताच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क झाली असून मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, स्थानिक ग्रामपंचायती, सागरी सुरक्षा पथक आणि पोलीस दल

सुमारे ३ हजार बोटी किनाऱ्यावर



(छायाचित्र : समीर मालोदे)

यांना सज्ज राहण्याचे आदेश देखील देण्यात आले आहेत.

यावर्षी पावसाळा लवकर सुरू झाल्याने मच्छीमार बांधवांना मासेमारी लवकरच बंद करावी लागली होती. त्यानंतरही अनेकदा वादळामुळे खोल समुद्रातील मासेमारी ठप्प होती. त्यामुळे मच्छीमार बांधवांचा हंगाम वाया गेला असून, ते आर्थिक संकटात सापडले आहेत. गेले काही दिवस खोल समुद्रातील मासेमारी बंद झाल्याने मच्छीमार बांधवांनी आपल्या बोटी किनाऱ्याला लावल्या आहेत. त्यामुळे ताजी मासळी बाजारातून गायब झाली असून खवय्ये व पर्यटकांचे वांदे झाले आहेत.

> “सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. सर्व बोटींची नोंद घेण्यात आली असून, मच्छीमारांना सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगण्यात आले आहे. हवामान विभागाच्या पुढील सूचना लक्षात घेऊनच पुढील निर्णय घेतला जाईल.”
>
> – सागर पाठक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी

# ग्रामसेवकांच्या पाठीवर कौतुकाची थाप

**। उरण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्यावतीने अलिबाग येथे नुकताच आदर्श ग्रामसेवक पुरस्कार सोहळा पार पडला. या सोहळ्यात जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये उल्लेखनिय कामगिरी केलेल्या ग्रामसेवकांचा मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामध्ये ग्रामसेवक रूपम गावंड (पोलादपूर), अनुरूद्र पाटील (विंधणे), रवि गावंड (वशेणी), समिक्षा ठाकूर (पाणजे), विद्या भाटकर (डोंगरी), पवित्र कडू (घारापुरी), सुरेश मोहिते (पनवेल), किरण केणी (नागाव), अनिता म्हात्रे (पागोटे) व स्वाती म्हात्रे (कळंबुसरे) यांना त्यांच्या ग्रामपंचायतीतील उत्कृष्ट कामगिरीमुळे आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच, चिर्लेचे ग्रामसेवक वैभव घरत यांना त्यांच्या शाहिरी कलेच्या प्रित्यर्थ ‘रायगड रत्न’ हा पुरस्कार देण्यात आला आहे. या सर्व ग्रामसेवकांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडली असल्याने त्या सर्वांचे गटविकास अधिकारी, पंचायत समितीमधील अधिकारी, सरपंच, उपसरपंच, सदस्य, मित्र मंडळी, गावकरी आणि कुटूंबियांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# उरण पोलीस प्रशासनातर्फे जनजागृती

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात अनेक ठिकाणी आर्थिक फसवणूकिचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत आहेत. तसेच, इतर वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर भविष्यात होणाऱ्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी व समाजात जनजागृती करण्यासाठी उरण पोलीस प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. दरम्यान, उरण पोलीस ठाण्यातर्फे विविध उपक्रम राबवून जनजागृती करण्यात येत आहे. त्यांनी मंगळवारी (दि.२८) सराडे आणि पिरकोन या गावामध्ये कॉर्नर मिटिंग घेऊन विविध विषयांवर जनजागृती केली. यावेळी जनतेच्या सहभागातून सीसीटीव्ही बसविणे, दिवसा व रात्रौपाळी घरफोडी, चेन स्नॅचिंग, बतावणी, वेगवेगळ्या प्रकारचे स्ट्रीट क्राईम अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांपासून सतर्क राहणे, सायबर, ऑनलाईन, गेमिंग, क्रिप्टो करंसी, सेक्सटोर्शन व इन्व्हेस्टमेंट सारख्या फ्रॉडपासून सावध राहावे, अशा सुचना केल्या. तसेच, गावच्या दर्शनी भागात, वरदळीच्या ठिकाणी, ग्रामपंचायत कार्यालयात विविध विषयासंदर्भात पोस्टर चिटकावण्यात आलेले आहेत, अशी माहिती देण्यात आली.

# चुकून जमा झालेली रक्कम केली परत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

पुणे येथील एका व्यक्तीने आपल्या भाच्याला महाविद्यालयीन फी भरण्यासाठी गुगल पे वरून पैसे पाठवले होते. ते पैसे चुकीने दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्यात जमा झाले होते. दरम्यान, पैसे चुकीच्या खात्यावर जमा झाल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांच्या माध्यमातून संबंधित महिलेने ती रक्कम परत केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथील बालकृष्ण पयाली यांनी त्यांचा भाचा मुद्रिका त्रिपाठी याला महाविद्यालयीन फी भरण्यासाठीची ८० हजार रुपयांची रक्कम त्यांच्या वडीलांच्या गुगल पेवर पाठवली. परंतु, संबंधित रक्कम पाठवताना पयाली यांच्याकडून मोबाईल क्रमांकांतील एक क्रमांक चुकला आणि ती रक्कम त्रिपाठी यांना न जाता अन्य बँक खात्यात पोहचली. दरम्यान, त्रिपाठी यांना पैसे पोहचले नसल्याची खात्री पटल्यावर बालकृष्ण पयाली यांनी त्या बँक खात्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी हे बँक खाते हे कर्जत तालुक्यातील एका महिलेच्या नावे असल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी कर्जत पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि त्या बँक खात्याची खात्री केली असता ते बँक खाते डिकसल येथील नलिनी कर्डीकर-गायकवाड यांचे असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर नेरळ पोलिसांच्या मदतीने पयाली संबंधित महिलेच्या घरी पोहोचले. त्यावेळी नलिनी कर्डीकर-गायकवाड यांनी देखील आपल्याला दुसऱ्याच्या अकाउंट मधून पैसे आले होते आणि त्यामुळे ते पैसे खर्च केले नव्हते, अशी माहिती दिली. त्यांनी लगेचच आपल्या खात्यात आलेली ८० हजार रुपयांची रक्कम बालकृष्ण पयाली यांच्या बँक खात्यात वर्ग केली.

# रोह्यातील मुलांची रायगड वारी

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील वाशी ग्रामपंचायत हद्दीतील शिव समर्थ महादेववाडी येथील पाच ते बारा वयोगटातील चिमुकल्या मुलांनी दिवाळी सुट्टीचा अर्थच बदलून टाकला आहे. त्यांनी रायगड वारी करून तरूणांसमोर एक आदर्श ठेवला आहे.

खेळायच्या, धमाल करण्याच्या वयात या मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती स्वतःच्या कल्पकतेतून साकारली होती. या उपक्रमाला तालुक्यासह परिसरातून भरभरून प्रतिसाद आणि कौतुक मिळाले. एवढ्यावरच न थांबता या मुलांनी आता प्रत्यक्ष रायगड किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. प्रवासादरम्यान मुलांनी संपूर्ण गड-किल्ल्याची माहिती घेतली आणि



अनेक ऐतिहासिक ठिकाणांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यांनी महा दरवाज्याचे बारकाईने निरीक्षण केले, हत्ती तलाव व बजरंगबली मंदिराचे दर्शन घेतले. त्यानंतर शिरकाई देवी मंदिर, ऐतिहासिक बाजारपेठ, स्मारक, मेणा दरवाजा, महाराजांच्या आठ राण्याचे महाल, महाराजांची समाधी, जगदीश्वर मंदिर, टकमक टोक, राजवाडा, गंगा सागर, लोखंडाची तोफ आणि थंड पाण्याचा झरा, दारु कोठार अशी अनेक ठिकाणे प्रत्यक्ष पाहिली आणि अनुभवली.

## नवनियुक्त शिक्षकांचे प्रशिक्षण सुरू

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

नवनियुक्त शिक्षकांचे जिल्हा स्तरीय प्रशिक्षण पेण एज्युकेशन सोसायटीच्या म.ना. नेने कन्या विद्यालय येथे २५ ते ३१ऑक्टोबरपर्यंत सुरु आहे. या प्रशिक्षणासाठी ८८ शिक्षक प्रशिक्षणार्थी उपस्थित आहेत. हे प्रशिक्षण पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. तसेच, तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून संजय पाटील, जितेंद्र म्हात्रे, करुणा म्हात्रे यांनी शिक्षकांना येणाऱ्या प्रत्येक अडचणीचे मार्गदर्शन केले. भविष्यात अध्यापन कसे करावे, विद्यार्थ्यांचे मनोरंजन करून त्यांचा पाया भक्कम कसा करावा, तसेच विविध विषयांवर सविस्तर माहिती दिली.




# शेतकऱ्यांना कडधान्य बियाणे वाटप

**। खांब । प्रतिनिधी ।**

दीपक फाऊंडेशन व दीपक नायट्राईट यांच्या ‘ग्राम जल संचय’ या प्रतिष्ठित प्रकल्पांतर्गत रोहा तालुक्यातील २० शेतकऱ्यांना कडधान्ये लागवडीसाठी उच्च प्रतीचे बियाणे वाटपाचा कार्यक्रम नुकताच संपन्न करण्यात आला. या उपक्रमांतर्गत तालुक्यातील लांढर वाशी, गावठाण, तलवली, यशवंतखार, बोरघर, करजविरा, पिंगळसई, महादेवाडी, वावे, चिले, सोनगाव, धामणसई, तळघर, तळवळी इत्यादी गावातील शेतकऱ्यांना वाल, चवळी, हरभरा प्रत्येकी १ किलो तसेच मूग व मटकी प्रत्येकी अर्धा किलो अशा प्रमाणात बियाणे देण्यात आले. यावेळी एकूण २५० शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे.हायब्रीड दर्जाच्या या नवीन बियाण्यांमुळे उत्पादनक्षमता वाढून शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## अधिनियमात सुधारणा करण्याची मंजूरी | जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ

# राखीव जागांवरील उमेदवारांना दिलासा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यात पुढच्या काही महिन्यांत होणाऱ्या सार्वत्रिक किंवा पोटनिवडणुकीत राखीव जागांवर उमेदवारी दाखल करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी ६ महिन्यांची मुदत मिळणार आहे. त्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्यास मंगळवारी (दि.२८) राज्य मंत्रिमडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे राखीव जागांवरील इच्छुक उमेदवारांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

जात प्रमाणपत्राची पडताळणी वेळ खाणारी प्रक्रिया आहे. तसेच, जात पडताळणी समित्यांना अध्यक्ष नसल्याने सामाजिक न्याय विभागाकडे हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत. जात वैधता प्रमाणपत्राशिवाय उमेदवारी अर्ज सादर करणे अशक्य आहे. त्याचा फटका राखीव जागांवरील उमेदवारांना बसू शकतो. म्हणून शासनाने ६ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी विद्यमान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दोन्ही अधिनियमामध्ये तशी तरतूद करण्याबाबत अध्यादेश राज्यपाल यांच्या मान्यतेने लवकरच काढण्यात येणार आहेत.



राज्यात प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जात पडताळणी समिती स्थापन आहे. मात्र, महसुल विभागाचे अधिकारी उपलब्ध नाहीत. जात पडताळणी समितीवर काम करण्यास अधिकारी इच्छुक नाहीत. परिणामी, अनेक जात पडताळणी समितींवर अध्यक्ष नाहीत. त्यामुळे मार्चपर्यंत राज्यात तब्बल ४७ हजार जातपडताळणीची प्रकरणे प्रलंबित होती. त्याम ध्ये बहुतांश विद्यार्थी आणि शासकीय नोकरीचे उमेदवार यांच्या प्रकरणांचा समावेश आहे. राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येईल. तर ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतूदीत सुधारणा करण्यात येईल. त्यासाठी नगरविकास विभाग आणि ग्रामविकास विभाग कामाला लागले आहेत.

### उमेदवारांचा सुटकेचा नि:श्वास

**राज्यात २८ हजार ५६३ एकुण स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास वर्ग या प्रवर्गासाठी राखीव मतदारसंघात निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. राखीव जागांवरील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास राज्य निवडणूक आयोगाने मुदतवाढ नाकारली होती. त्यामुळे शासन आता कायद्यात बदल करणार आहे.**




## राशीभविष्य

- **मेष** : घाईने कोणतेही निर्णय घेऊ नयेत. उत्साहवर्धक घटना घडतील. आप्त भेटल्याने समाधान लाभेल.
- **वृषभ** : कौटुंबिक जीवनात शुभघटना घडतील. संततीच्या विद्याभ्यासाकडे लक्ष द्यावं. प्रकृती सांभाळावी.
- **मिथुन** : कामाची दगदग वाढणार आहे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. मित्रांचं चांगलं सहकार्य लाभेल.
- **कर्क** : नव्या कामांना गती मिळेल. भावंडांशी सामंजस्यानं रहावं. संसर्गजन्य आजारापासून सावध रहावं.
- **सिंह** : नव्या वाहनांची खरेदी करू शकाल. गृहसौख्य लाभेल. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल.
- **कन्या** : व्यवसायात अडचणी राहतील. मार्गही निघत जाईल. फार दगदग करू नका. स्वमताग्रह टाळावा.
- **तूळ** : यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. व्यवसायात बदल लाभदायक ठरतील. बाकी चिंता नको.
- **वृश्चिक** : शक्यतो प्रवास टाळावा. बोलण्यातून गैरसमज संभवतात. नोकरीत ताण–तणाव वाढीस लागतील.
- **धनु** : नव्या ओळखींपासून लाभ होईल. कर्ज प्रकरणात महत्त्वाचा दिलासा मिळेल. कौटुंबिक सौख्य लाभेल.
- **मकर** : उपजत कला–गुणांचा विकास होईल. नव्या योजना मार्गी लागतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **कुंभ** : अपेक्षित ध्येयपूर्तीचं समाधान लाभेल. प्रक्रिया उद्योगात उत्कर्ष होईल. अनावश्यक ताण टाळावा.
- **मीन** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे होतील. सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घ्याल. प्रियजनांचा सहवास लाभेल.

स्टाईल स्टेटमेंट

## दुपट्टा ड्रेपिंगची हटके स्टाईल

विविध समारंभांमध्ये तसंच लग्नसोहळ्यांमध्ये विविध प्रकारचे पेहराव घातले जातात. अनेकींचं साडीला प्राधान्य असलं तरी सलवार–कमीझ, लहंगा चोली असे प्रकारही घातले जातात. हे पेहराव त्याच्या दुपट्ट्यामुळे खुलून दिसतात. अनेकदा तर प्लेन ड्रेसवर भरजरी, नक्षीकाम केलेला दुपट्टा घेतला जातो. अत्यंत आकर्षक आणि सुंदर नक्षीकाम केलेले महागडे दुपट्टे बाजारात मिळतात. हे दुपट्टे साध्या वाटणाऱ्या ड्रेसचा लूक खुलवतात. हा दुपट्टा तुम्ही वेगवेगळ्या पद्धतींनी ड्रेप करू शकता. यामुळे तुमचं व्यक्तिमत्त्व तर छान दिसतं शिवाय ड्रेसचं सौंदर्यही उठून दिसतं. दुपट्टा ड्रेपिंगच्या विविध स्टाईल्सविषयी...

✻ वर्कवाला दुपट्टा असेल तर तो एका बाजूने कॅरी करता येईल. नक्षीकाम केलेल्या ड्रेसवर एका बाजूने दुपट्टा घेतला तर अधिक खुलून दिसेल. अनारकली पॅटर्नच्या ड्रेसवर एका बाजूने दुपट्टा घ्यायला हवा. **(क्रमशः)**

दिनविशेष

## ३१ ऑक्टोबर

१८९५ : क्रिकेटपटू सी. के. नायडू यांचा जन्म.
१९७५ : ख्यातनाम संगीतकार सचिन देव बर्मन यांचं निधन.
१९८४ : पंतप्रधान इंदिरा गांधी यांची अंगरक्षकांकडून गोळ्या झाडून हत्या.
१९८६ : बालसाहित्यिका आनंदीबाई शिर्के यांचं निधन.
१९९९ : ज्येष्ठ चित्रकार डॉ. भय्यासाहेब ओंकार यांचं निधन.
२००५ : पंजाबी लेखिका आणि कवयित्री अमृता प्रीतम यांचं निधन.

सफर देशांची

## पिरॅमिड्सचा देश

कैरो ही इजिप्तची राजधानी. इथले लोक अरबी भाषा बोलतात. इजिप्शियन पाउंड हे इथलं चलन आहे. इजिप्तच्या दक्षिण भागात छोट्या छोट्या टेकड्या आणि वाळवंट, तर उत्तर इजिप्तमध्ये नाईल नदीच्या आसपासचा भाग खोऱ्यांनी सजला आहे. इजिप्तमध्ये कोल्हे, मगरी, कोब्रा आहेत. जुन्या काळात इथे गेंडे, हत्ती, बिबटे, चित्ते असे प्राणी होते. पण त्यांची खूप शिकार झाली. जवळपास ८००० हजार वर्षांपूर्वी नाईल नदीच्या किनारी शिकारी आणि मच्छीमार राहायला आले. इसवीसन पूर्व ३००० मध्ये इथे मानवी जीवन सुरू झालं. इसवीसन पूर्व ३१०० मध्ये इजिप्तच्या वरच्या आणि खालच्या भागातले राजे एका शक्तीशाली राजाच्या राज्याखाली एकवटले. त्यांनी इजिप्तमध्ये पिरॅमिड्स, देवळं आणि इतर वास्तू बांधल्या. काही काळ इजिप्तवर रोमन लोकांचं राज्य होतं. त्यानंतर मुस्लीम आक्रमकांनी इजिप्तचा ताबा घेतला. त्यांच्या राज्यात कैरो राजधानी म्हणून उदयाला आली. पिरॅमिड्स हे इथलं प्रमुख आकर्षण आहे. पिरॅमिड्स म्हणजे प्राचीन काळातले राजे आणि त्यांच्या कुटुंबातल्या लोकांच्या कबरी आहेत. गिझा इथलं 'पिरॅमिड ऑफ खूफू' हे इजिप्तमधलं सर्वात मोठं पिरॅमिड आहे.

आरोग्यमंत्र

## खाऊ नका पांढरं विष

आपण अन्न ग्रहण करतो ते पौष्टिक घटक आणि ऊर्जा मिळावी म्हणून; पण अनेकदा आपण जिभेचे चोचले पुरवणारे पदार्थच खातो. त्यांचा आरोग्याला किती फायदा होतो हे आपल्याला माहीत नसतं किंवा खाताना आपण त्याचा विचारही करत नाही. मात्र बरेचदा असे पदार्थ आरोग्यासाठी घातक ठरणारे असतात कारण त्यात साखर, मीठ, मैदा यांच्यासारखे घटक समाविष्ट असतात. साखर, मीठ, मैदा आदींना आरोग्याच्या दृष्टीनं 'पांढरं विष' असं म्हटलं जातं. साखर, मीठ, मैदा, पांढरा तांदूळ आणि गायीचे पाश्चराईज्ड दूध हे पाचही पदार्थ पोषणाच्या दृष्टीनं शून्य पोषणमूल्य मूल्य असणारे समजले जातात. या पदार्थांमधून आपल्याला शरीराला आवश्यक असणारी जीवनसत्त्व किंवा खनिजं यापैकी काहीही मिळत नाही, उलट त्यांचं अतिसेवन केल्यानं हे घटक आरोग्यासाठी हानिकारकच ठरतात.

या पाचही घटकांचा रंग पांढरा असल्यामुळे त्यांना 'पांढरं विष' म्हटलं जातं. साखरेला तर 'अन्नविरहित अन्न' असं म्हणतात. साखरेचं अतिप्रमाणात सेवन केल्यास स्थूलता आणि मधुमेहाचा धोका वाढतो. त्यामुळे भविष्यात हृदयविकाराचा झटका, कर्करोग, ब्रेनस्ट्रोक यासारख्या गंभीर समस्यांना सामोरं जावं लागू शकतं. प्रिन्सटन विद्यापीठातील वैज्ञानिकांनी केलेल्या अभ्यासात असे अनेक धक्कादायक निष्कर्ष पुढे आले आहेत. त्यातून या सर्व वस्तूंमुळे शरीराचं होणारं नुकसान अधिक असल्याचं ध्यानात येतं. खरोखर, पदार्थांची चव आणि त्याच्यापासून मिळणारे लाभ यांचं प्रमाण इथं व्यस्त आहे.

## पंचांग

**शुक्रवार ३१ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, कार्तिक शु. ९, चंद्रराशी : मकर, नक्षत्र : धनिष्ठा, योग : वृद्धि, सूर्योदय ६.४१, सूर्यास्त ६.०४

## फॉरवर्डस

**कांटों क़ा तों सिर्फ़ नाम हीं बदनाम हैं...**

**चुभतीं तों निग़ाह भीं हैं औऱ काटतीं तों ज़ुबाँ भीं हैं...!**

## भटकंती

गोवा... अत्यंत रमणीय असं हे राज्य. वारंवार गोव्याला जाणारे अनेकजण आहेत. तरूण मंडळीही बरेचदा गोव्याला ट्रिप काढतात. गोवा म्हटलं की स्वच्छ समुद्रकिनारे, मंदिरं, चर्च समोर येतात. सुटीत गोव्याला जाणाऱ्यांनाही इथे वेगवेगळे अनुभव घेता येतात. गोव्यात बरंच काही करण्यासारखं आहे. तुम्हीही गोव्याला जायची योजना आखत असाल तर यंदा काय करता येईल याविषयी...

✻ यावेळी गोव्यात स्थानिकांसारखं रहा. इथल्या मच्छीमारांप्रमाणे तुम्ही मासे पकडायला जाऊशकता. इथे बऱ्याच बोट टूर्स असतात. या टूरमध्ये तुम्ही मासे पकडण्याचा अनुभव घेऊ शकता. **(क्रमशः)**

करिअरवाटा

## व्हा ॲग्रीकल्चरल मार्केटर

सध्या शेतकऱ्यांचा माल थेट ग्राहकांपर्यंत नेण्यावर भर दिला जात आहे. या पद्धतीत ग्राहकांनाही माल स्वस्तात मिळतो आणि शेतकऱ्यांनाही चार पैसे जास्त मिळतात. या यंत्रणेतून ॲग्रीकल्चरल मार्केटर हा नवा घटक उदयाला आला आहे. पीक काढल्यानंतर या घटकाचं काम सुरू होतं, असं सर्वसाधारणपणे मानलं जातं. परंतु प्रत्यक्षात ते त्यापूर्वीच सुरू झालेलं असतं. शेतकऱ्यांना एक सल्ला दिला जातो की, पिकवाल ते विकण्याचा प्रयत्न करू नका, तर जे विकते ते पिकवा. म्हणजेच बाजारावर नजर ठेवून शेती करा. अशी नजर ठेवणं हे मार्केटिंगचंच काम आहे. म्हणून ॲग्रीकल्चरल मार्केटर हा शेतकऱ्यांना शेतात काय पिकवावं, याचा सल्ला देण्यापासून कामात गुंतलेला असतो. शेतमाल पिकवल्यापासून तो ग्राहकाच्या हातात पडेपर्यंत निवडणं, साठवणं, पॅकिंग, वाहतूक करणं, प्रोसेस करणं, जाहिरात करणं, वितरण करणं आणि विक्री एवढ्या क्रिया असतात. या सर्व कामात ॲग्रीकल्चरल मार्केटर उपयुक्त असतो. या कामाचं प्रशिक्षण देणाऱ्या काही संस्था कार्यरत झाल्या आहेत. पदवीनंतरचा ॲग्री बिझनेस एम.बी.ए. असा स्वतंत्र कोर्स तयार करण्यात आला आहे. इच्छुकांनी त्याचा लाभ घ्यावा.



खेचाखेची

## करवत नाही

**सुतार १ –** काय रे, तू काम का करत नाहीस?

.
.
.
.
.
.
.
.
.

**सुतार २ –** अरे, करवत नाही...

## वेगळं काही

हिंदू धर्मात दिवाळी या सणाला मोठं महत्त्व आहे. जगातल्या विविध देशांमध्येही दिवाळीच्या संकल्पनेशी मिळतेजुळते सण साजरे केले जातात. जगभरातल्या दिपोत्सवाच्या परंपरांवर नजर टाकू या.

✻ नेपाळ आणि मॉरिशसमध्ये भारताप्रमाणे दिवाळी साजरी केली जाते. इथे घरात नववधूच्या हातून पणती लावण्याची प्रथा आहे. मलेशियातही दिवाळीच्या दिवशी सुटी दिली जाते. मलेशियातले हिंदू धर्मीय दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी करतात. ✻ रावण वधानंतर विभिषण लंकेचा राजा झाला. वाईटावर चांगल्याच्या विजयाच्या निमित्ताने त्याने प्रजेला दिपोत्सव साजरा करायला सांगितला. त्यानंतर श्रीलंकेतही दिवाळीला दिवे लावले जातात. **(क्रमशः)**

संगोपन

## वातावरण सकारात्मक हवं

मुलांना सतत कोणत्या ना कोणत्या परीक्षेची तयारी करावी लागते. त्यांचा हा अभ्यास हसत खेळत, तणावरहित व्हावा यासाठी काही मुद्दे लक्षात घेणं गरजेचं ठरतं.



✻ आपल्या मुलांनी भरपूर गुण मिळवावे असं वाटत असलं तरी प्रत्येक मूल वेगळं असतं हे पालकांनी लक्षात घ्यायला हवं. त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव टाकू नका. ✻ मुलांची इतरांशी तुलना करू नका. यामुळे त्यांच्यामध्ये कमीपणाची भावना निर्माण होऊ शकते. ✻ मुलांवर सतत अभ्यास करण्याचा दबाव टाकू नका. अभ्यास करताना मुलांना येणाऱ्या अडचणींचा विचार करा. त्यांच्याशी बोला. एखादा विषय कठीण वाटत असेल तर चर्चा करून मार्ग काढा. ✻ मुलांशी प्रेमाने बोला. कमी गुण मिळाले म्हणून त्यांना ओरडू नका. कमी गुण का मिळाले यामागची कारणं जाणून घ्या. ✻ घरातलं वातावरण सकारात्मक आणि शांत ठेवा. ✻ मुलं डोकेदुखी, अंगदुखी, चक्कर येणं, विस्मरण, भीती वाटणं, अस्वस्थ वाटणं अशा तक्रारी करत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. त्यांना डॉक्टरांकडे न्या. गरज पडली तर समुपदेशकाची मदत घ्या.

## सुडोकू २१ [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | | | | ८ | | | ६ | |
| | | १ | | | | | ९ | |
| | ९ | २ | ४ | | | | ५ | |
| | | | | ७ | | | ४ | |
| ७ | | | २ | ५ | ९ | | | ३ |
| | ३ | | | ४ | | | | |
| | ८ | | | | ६ | ५ | १ | |
| | ७ | | | | | ९ | | |
| | ४ | | | ९ | | | | २ |

टीप –
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्व ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू २० चे उत्तर [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ९ | ४ | ८ | २ | ७ | ३ | ६ | १ |
| १ | ७ | २ | ९ | ६ | ३ | ५ | ४ | ८ |
| ८ | ६ | ३ | ५ | १ | ४ | ९ | ७ | २ |
| ९ | ५ | ७ | ६ | ३ | ८ | १ | २ | ४ |
| ४ | १ | ८ | ७ | ९ | २ | ६ | ५ | ३ |
| २ | ३ | ६ | ४ | ५ | १ | ८ | ९ | ७ |
| ३ | ८ | ९ | २ | ४ | ५ | ७ | १ | ६ |
| ७ | २ | ५ | १ | ८ | ६ | ४ | ३ | ९ |
| ६ | ४ | १ | ३ | ७ | ९ | २ | ८ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक २१

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | | ५ | | ६ | ७ | | ■ | ८ | ९ |
| १० | | | ■ | | ■ | | ■ | ११ | | ■ | १२ | ■ | |
| | ■ | १३ | १४ | ■ | १५ | ■ | १६ | ■ | ■ | १७ | | | |
| १८ | १९ | | | २० | | २१ | | २२ | | | | ■ | |
| २३ | | ■ | २४ | | ■ | | ■ | | ■ | २५ | | ■ | ■ |
| | ■ | २६ | | ■ | २७ | | २८ | ■ | २९ | ■ | ■ | ३० | ३१ |
| ३२ | | | ■ | ३३ | | ■ | ३४ | ३५ | | ३६ | ■ | ३७ | |
| | ■ | ३८ | | | ■ | ३९ | | | ■ | ४० | | ■ | |
| ४१ | ४२ | | ■ | | ■ | ४३ | | ■ | ■ | | ■ | ४४ | |
| ४५ | | | ४६ | | ■ | र | ■ | ४७ | | | ४८ | | ■ |
| | ■ | ■ | | ■ | ४९ | | | | ■ | ■ | ५० | | |
| ■ | ५१ | ५२ | ■ | ५३ | | | ■ | ५४ | | ५५ | ■ | ■ | ■ |
| ५६ | | | ५७ | ■ | | ■ | ५८ | | ■ | ५९ | ६० | ६१ | ६२ |
| | ■ | ६३ | | | ■ | ६४ | | | | ■ | ६५ | | |

**आडवे शब्द :–**
१) अशक्य गोष्टीचा प्रयत्न करणे (वा.प्र.)
८) सूर्याचे एक नाव
१०) गारा
११) मोठी गंमत
१३) लक्ष्मीचे एक नाव
१७) आत्महत्येचा जपानी प्रकार
१८) एका क्षणार्धात
२३) धातूचा धागा
२४) दरवाजा
२५) कोवळा अंकुर
२६) वजन
२७) कबूतर
३०) ह्या संताच्या नावात देव आहे
३२) ४८४०चौरस यार्ड इतकी जमीन
३३) रोग पसरवणारा किटक
३४) विपुलता
३७) रावणाच्या मुखांची संख्या, सर्पाच्या फण्यावरील आकडा
३८) देवांचा राजा इंद्राचे एक नाव
३९) लोकांचा जमलेला घोळका
४०) रुबाब, पत
४१) वैर, भांडण
४३) वावडी
४४) बोकड
४५) रक्षण करणारे सशस्त्र सैनिक
४७) प्रचंड
४९) श्रीमान, श्रीयुत
५०) संगीतातील एक राग
५१) गळाला अडकणारा जलचर
५३) फोडणी दिलेले वरण
५४) आगबोट
५६) आकाश
५८) कुंभाराची भट्टी
५९) ठार मारणारा
६३) शहर
६४) गणपतीचे एक नाव
६५) उत्तराधिकारी

**उभे शब्द:–**
१) जोराने आकांत करणे, शर्थीचे प्रयत्न करणे (वा.प्र.)
२) मोटार (इं.)
३) कौलारु छताची दुरुस्ती
४) हत्ती
५) नेहमी
६) स्वेद
७) शरम
९) उलट, विपरीत
१२) विश्वातील सर्व भाग
१४) श्रीमंत
१५) धान्य दळण्याचे घरगुती दगडी साधन
१६) ढमढम वाजणारे एक चर्मवाद्य
१७) खिळे ठोकण्याचे हत्यार
१९) पंख
२०) उर्ध्व दिशेला
२१) दृष्टी
२२) रानटी
२६) हमाल
२७) च्या जवळ
२८) अतिशय, प्रमाणापेक्षा खूप जास्त
२९) जहाजाचे लुटारु
३०) छंद, आवाज, व्यसन
३१) सम्राट, राजा
३३) आत्या
३५) अल्प, थोडे
३६) चटकन, त्वरित
३९) जगरुढी
४२) अवधान, चित्त
४४) भारी कपड्यास आतून लावण्याचे हलके कापड
४६) अहंकार
४७) ✻✻ ✻✻✻, जय किसान
४८) अस्थमा, एक श्वासरोग
४९) माया, प्रेम
५१) महिना
५२) माल, चीजवस्तू
५५) हिशेबातील खर्चाच्या विरुद्धची बाजू
५६) वडिलांची बहीण
५७) पर्वत, अस्सल माल
५८) आजोबा
६०) नर्मदा नदीचे एक नाव
६१) हस्त
६२) अस्वल

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दो | न्ही | द | र | डी | व | र | हा | त | ठे | व | णे | ■ | म |
| न | ■ | ह | ■ | न | व | थ | र | ■ | चा | रा | ■ | च | हा |
| दा | वा | न | ल | ■ | र | ■ | जी | व | ■ | ती | र | ■ | सा |
| ■ | र्ता | ■ | ह | य | ■ | ■ | त | स | ल | मा | त | ■ | ग |
| क | ला | का | र | ■ | अं | ग | ■ | न | ■ | गू | ■ | ख | र |
| सा | प | ■ | ब | रो | ब | र | ■ | वा | च | न | ■ | ळ | ■ |
| ई | ■ | ■ | ह | ज | र | ■ | म | त | ■ | घो | डा | गा | डी |
| ■ | सा | ख | र | ■ | खा | ■ | ग | ■ | तां | डे | ल | ■ | र |
| म | न | न | ■ | वि | ना | का | र | ण | ■ | ■ | न | ग | ■ |
| ध | ■ | न | वी | न | ■ | म | ■ | ■ | म | स्त | ■ | ज | म |
| मा | ग | ■ | र | व | ळ | ना | थ | ■ | हा | ■ | पं | ■ | ध्य |
| शी | त | ल | ■ | णी | ■ | ■ | रा | जा | रा | णी | गु | ला | म |
| ■ | का | ■ | दे | ■ | का | सा | र | ■ | णी | ■ | त्व | चा | ■ |
| च | ल | न | व | ल | न | ■ | क | ड | ■ | धी | ■ | र | सा |

## निवडक



### उमेदवारांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**उरण :** अलिबाग नेहुली येथे जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धा संपन्न झाल्या. त्यामध्ये उरण तालुक्यातील गोशीन रियु कराटे असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी नेत्र दीपक कामगिरी केली.या स्पर्धा विविध वजनी गटामध्ये खेळवल्या गेल्या. त्यामध्ये १९ वर्षाखालील विघ्नेश विशाल पाटील याने प्रथम क्रमांक, १७ वर्षाखालील वैदेही योगेश घरत प्रथम क्रमांक,तंमीर इसाक आली शहा प्रथम क्रमांक पटकाविले. या विद्यार्थ्यांची निवड विभागीय कराटे स्पर्धेमध्ये झाली आहे. तसेच १४ वर्षाखालील गटात सोज्वल याने तृतीय क्रमांक तर तनुज गावंड यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांना गोपाल दिनकर म्हात्रे, सिहान राजू कोळी, परेश पावसकर, अमिता घरत, राकेश म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले.सदर या स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी व सीहाण राहुल तावडे कराटे ऑर्गनायझेशन रायगड जिल्हा यांनी केले होते.

### कमबॅकसाठी शार्दुलचा प्लान

**मुंबई :** वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेसाठी आतापासूनच संघाची बांधणी केली जात आहे. खरं तर टीम इंडिया आठव्या स्थानावर फलंदाजी आणि गोलंदाजी करेल अशा खेळाडूचा शोध घेत आहे. या स्थानासाठी टीम इंडियाला फिरकी गोलंदाजाऐवजी वेगवान गोलंदाजाची आवश्यकता आहे. यासाठीच हार्षित राणाचा विचार केला जात आहे. शार्दुल ठाकुरचा या जागेवर डोळा आहे. कारण संघात पुन्हा स्थान मिळावायचं तर हे स्थानच योग्य ठरू शकते. शार्दुल ठाकुर अष्टपैलू खेळाडू आहे. पण त्याचा फॉर्म हा चिंतेचा विषय ठरला आहे. त्यामुळे त्याला इंग्लंड कसोटी मालिकेनंतर संघात स्थान मिळालं नाही. त्यामुळे आता देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करून संघात स्थान मिळवण्याचा प्रयत्न आहे. मुंबईचा रणजी ट्रॉफी कर्णधार शार्दुल ठाकुरने आठव्या जागेसाठी आपला दावा ठोकला आहे. रेव्ह स्पोर्टशी बोलताना शार्दुल ठाकुरने स्पष्ट केलं की, वनडे वर्ल्डकप स्पर्धा दक्षिण अफ्रिकेत होत आहे. त्यामुळे आठव्या क्रमांकावर गोलंदाजी करणाऱ्या अष्टपैलू खेळाडूला संधी मिळू शकते. मी त्या जागेसाठी प्रयत्नशील आहे. मी तयारीतच आहे.

### ईश्वरी अवसरेचा अर्धशतकांचा धडाका!



**पुणे :** बीसीसीआयच्या वतीने मुंबईत सुरू असलेल्या एकोणीस वर्षांखालील एलिट क महिला गटाच्या टी-२० साखळी क्रिकेट स्पर्धेत ईश्वरी अवसरेने केलेल्या नाबाद ५७ धावांच्या जोरावर महाराष्ट्राने केरळ संघावर आठ गडी राखून मात करताना सलग तिसऱ्या विजयाची नोंद केली..वानखेडे स्टेडिअमवर बुधवारी झालेल्या या लढतीत केरळ संघाने नऊ बाद १११ धावा केल्या यावेळी लेक्षिदा जायन (३३) व इसाबेलने (३०) डाव सावरला. जान्हवी वीरकरने तीन तर अक्षया जाधवने दोन गडी बाद केले. प्रत्यूत्तर देताना महाराष्ट्राने १४.२ षटकांत २ बाद ११२ धावा करून विजय मिळविला. यावेळी ईश्वरी अवसरेने ४६ चेंडूत आठ चौकार व एक षटकारासह केलेली नाबाद ५७ धावांची खेळी उपयुक्त ठरली. महाराष्ट्राचा चौथा सामना ३१ तारखेला दिल्ली संघाशी वानखेडे स्टेडिअमवर होणार आहे.

### पीएनपीच्या विद्यार्थिनीची महाराष्ट्र राज्य मैदानी स्पर्धेसाठी निवड



**अलिबाग :** जिल्हा क्रीडा अधिकारी मुंबई शहर यांच्या संयुक्त विद्यमाने व मलबार हील नेपियन्सी मुंबई शहर यांच्या विद्यमाने विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा २०२५/२६ घेण्यात आल्या होत्या या स्पर्धेमध्ये पीएनपी सायरस पूनावाला स्कूल नागाव शाळेतील विद्यार्थिनीने घवघवीत यश संपादन केले.१९ वर्षा खालील मुलीय वयोगटात आर्या कृष्णा भोईर ३००० मीटर धावणे या प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावून महाराष्ट्र राज्य मैदानी क्रीडा स्पर्धेकरिता तिची निवड करण्यात आली आहे. या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, पीएनपी सायरस पुनावाला स्कूल नागावच्या मुख्याध्यापिका गीतिका भूचर, क्रीडा मार्गदर्शक राकेश म्हात्रे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### बॉलिंग मशीनने घेतला युवा क्रिकेटपटूचा बळी



**मेलबोर्न :** नेटमध्ये फलंदाजीचा सराव करत असताना बॉलिंग मशीनमधून आलेला चेंडू डोक्याला लागून एका युवा क्रिकेटपटूचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना ऑस्ट्रेलियातील मेलबोर्न येथे घडली आहे. बेन ऑस्टिन असं या क्रिकेटपटूचं नाव असून, १७ वर्षीय ऑस्टिन मेलबर्न येथे सराव करत असताना मशीन मधून आलेला चेंडू लागून तो गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर उपचारांदरम्यान, त्याचा मृत्यू झाला. बेन याच्या मृत्युमुळे क्रिकेट जगतात शोककळा पसरली आहे.बेन ऑस्टिन हा मंगळवारी दुपारी फर्नट्री गल्लीतील वॉली ट्यू रिझर्व्ह येथे सराव करत होता. तेव्हाच ही दुर्घटना घडली. नेट्समध्ये ऑटोमॅटिक बॉलिंग मशीनमधून गोलंदाजीचा सराव करत असताना बेन याने हेल्मेट घातले होते. तरीही डोकं आणि गळ्याच्या भागात येऊन चेंडू लागल्याने त्याला जबर दुखापत झाली. त्यानंतर वैद्यकीय पथक तातडीने तिथे दाखल झालं. तसेच बेन याला गंभीर अवस्थेत मोनाश मेडिकल सेंटरमध्ये नेण्यात आले. डॉक्टरांनी त्याचे प्राण वाचवण्याचे पूर्ण प्रयत्न केले. मात्र बुधवारी त्याचा मृत्यू झाला.

# पुणेरी पलटन फायनलमध्ये!

## ॥ प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धा ॥ तेलुगू टायटन्स पराभूत

**। पुणे । प्रतिनिधी ।**

प्रो कबड्डी लीग २०२५ च्या क्वालिफायर २ मध्ये पुणेरी पलटनने तेलुगू टायटन्सला पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. सामन्यात पुणेरी पलटनने दमदार पुनरागमन करत ५०-४५ गुणांनी विजय मिळवला. आदित्य शिंदे आणि पंकज मोहिते यांनी मोलाचे योगदान दिले.

प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील क्वालिफायर २ चा सामना पुणेरी पलटन आणि तेलुगू टायटन्स या दोन्ही संघांमध्ये बुधवारी (२९ ऑक्टोबर) पार पडला. या सामन्यात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत पार पडली. पण शेवटी पुणेरी पलटनने बाजी मारत स्पर्धेतील अंतिम फेरीत स्थान मिळवले. आता पुणेरी पलटनचा अंतिम सामना दबंग दिल्लीविरुद्ध होणार आहे. दिल्लीतील त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या



सामन्यात तेलुगू टायटन्सकडून भरत हुड्डाने सर्वाधिक २३ गुणांची कमाई केली. तर पुणेरी पलटनकडून आदित्य शिंदेने २२ गुणांची कमाई केली. तसेच पंकज मोहितेने आपले सुपर १० पूर्ण केले.

या सामन्यात पुणेरी पलटनकडून अस्लम इनामदार पहिली चढाई करण्यासाठी आला. त्याने पहिल्याच चढाईत १ गुण घेत दमदार सुरूवात करून दिली. तेलुगू टायटन्सकडून भरत हुड्डाने बोनस आणि १ गुण घेत दणक्यात सुरूवात केली. सामन्यातील चौथ्या मिनिटाला पुणेरी पलटनला पहिला धक्का बसला. पुणेरी पलटनचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह पलटनवर १०-१ गुणांसह ९ गुणांची आघाडी घेतली. पुर्वार्धातील सुरूवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर तेलुगू टायटन्सचा संघ १३-७ गुणांसह ६ गुणांनी आघाडीवर होता.

पूर्वार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटात तेलुगू टायटन्सचा बोलबाला पाहायला मिळाला. पण त्यानंतर पुढील काही मिनिटांमध्ये पुणेरी पलटनने दमदार पुनरागमन केलं. पलटनकडून पंकज मोहिते लागोपाठ गुण घेऊन येत होता. दरम्यान १३ व्या मिनिटाला तेलुगू टायटन्सचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने १६-१२ गुणांसह दमदार पुनरागमन केलं. पूर्वार्धात सुरुवातीला मागे राहिलेल्या पुणेरी पलटनने पुढील काही मिनिटांमध्ये दमदार पुनरागमन केलं. २० मिनिटांचा खेळअझाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ २४-२० गुणसंह अवघ्या ४ गुणांनी पिछाडीवर होता.

उत्तरार्धातही पुणेरी पलटनने दमदार पुनरागमन केलं. उत्तरार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर तेलुगू टायटन्सचा संघ ३९- २७ गुणांसह ३ गुणांनी आघाडीवर होता. उत्तरार्धातील नवव्या मिनिटाला पंकज मोहितेने आपलं सुपर १० पूर्ण केलं. उत्तरार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ ३३-३२ गुणांसह एका गुणाने आघाडीवर होता. १३ व्या मिनिटाला तेलुगू टायटन्सचा संघ पुन्हा एकदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने ३८-३७ गुणांसह पुन्हा एकदा आघाडी घेतली. शेवटची ३ मिनिटे शिल्लक असताना आदित्य शिंदेने ४ गुण घेत पुणेरी पलटनला ४५-४० गुणांसह ५ गुणांची आघाडी मिळवून दिली. तेलुगू टायटन्सचा संघ पुन्हा एकदा ऑलआऊट झाला.

## श्रेयसने मानले चाहत्यांचे आभार

**। सिडनी । प्रतिनिधी ।**

भारतीय संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यरने त्याच्या दुखापतीबद्दल अपडेट दिले आहे. त्याने चाहत्यांच्या पाठिंब्याबद्दल आणि प्रार्थनांबद्दल आभार मानले आहेत.

गुरुवारी श्रेयसने ट्विट केले. मी सध्या बरा होत आहे. तुमच्या प्रेमळ शुभेच्छांबद्दल मनापासून धन्यवाद. हे माझ्यासाठी खूप अर्थपूर्ण आहे. माझ्या आरोग्यासाठी तुम्ही केलेल्या प्रार्थनांबद्दल धन्यवाद. यापूर्वी २८ ऑक्टोबर रोजी श्रेयसच्या प्रकृतीत शस्त्रक्रियेनंतर



सुधारणा होत असल्याची बातमी समोर आली होती. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी सांगितले की, श्रेयसला आयसीयूमधून जनरल वॉर्डमध्ये हलवण्यात आले आहे.

## दक्षिण अफ्रिकेची अंतिम फेरीत पहिल्यांदाच धडक

**। गुहाटी । प्रतिनिधी ।**

वुमन्स वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत उलटफेर झाला आहे. बलाढ्य इंग्लंडचा दक्षिण अफ्रिकेने धावांनी पराभव केला.

दक्षिण अफ्रिकेची सलामीची फलंदाज आणि कर्णधार लॉरा वॉल्वार्डने जबरदस्त खेळी केली. त्यामुळे इंग्लंडचा संघ पुरता बॅकफूटवर गेला. खर तर २५० धावांच्या आता दक्षिण अफ्रिकेला गुंडाळण्याचा प्रयत्न होता. मात्र हा प्रयत्न फसला. एकट्या लॉरा वॉल्वार्डने १६९ धावांची खेळी केली. या व्यतिरिक्त ताझमिन



ब्रिट्सने ४५, मराझेन कॅपने ४२ आणि क्लो ट्रायनने नाबाद ३३ धावांची खेळी केली. यामुळे दक्षिण अफ्रिकेने ५० षटकात ७ गडी गमवून ३१९ धावांपर्यंत मजल मारली आणि विजयासाठी ३२० धावांचं आव्हान दिलं. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ १९४ धावांवर बाद झाला. हा सामना दक्षिण अफ्रिकेने १२५ धावांनी जिंकून अंतिम फेरी गाठली आहे.

इंग्लंडची विजयी धावांचा पाठलाग करताना सुरुवात काही चांगली झाली नाही. आघाडीचे तीन फलंदाज खातं न खोलताच तंबूत गेले. यामुळे इंग्लंडला मोठा फटका सुरुवातीला बसला आणि धावगतीला खिळ बसली. एमी जोन्स, टॅमी ब्यूमोंट आणि हिथर नाइट यांनी खातं खोलता आलं नाही. त्यानंतर कर्णधार नॅट सायव्हर आणि एलिस कॅप्सी यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी १०७ धावांची भागीदारी केली. नॅट सायव्हर ब्रंट ६४ धावांवर बाद झाली नाही आणि इंग्लंडची आशाच संपुष्टात आल्या. एलिस कॅप्सी ५० धावा करून बाद झाली. सोफिया २ आणि शार्लोटला खातंही खोलता आलं नाही.

## न्यूझीलंडने केला इंग्लंडचा पराभव

**। हॅमिल्टन । प्रतिनिधी ।**

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडने इंग्लंडचा ५ विकेट्सने पराभव करत तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली.

इंग्लंडचा संघ ३६ षटकांत १७५ धावांवर आटोपला. न्यूझीलंडने १७६ धावांचे लक्ष्य ३३.१ षटकांत ५ गडी गमावून पूर्ण केले. डॅरील मिशेल नाबाद ५६ धावा, कर्णधार मिशेल सँटनरने फक्त १७ चेंडूत नाबाद ३४ धावा करून संघाला विजय मिळवून



दिला. त्यांचा पहिला बळी ३ धावांवर पडला. सलामीवीर बेन डकेटने ५ चेंडूंचा सामना केला आणि १ धाव काढली. इंग्लंडची ३० धावांपेक्षा जास्त फक्त एक भागीदारी झाली. जेमी ओव्हरटन आणि सॅम करन यांनी सातव्या विकेटसाठी ३२ चेंडूत ३८ धावांची भागीदारी केली. ओव्हरटनने २८ चेंडूत सर्वाधिक ४२ धावा केल्या.

### महिला कबड्डी खेळांडुचे स्नेहसंमेलन

**गडब :** कबड्डी क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या रायगड जिल्ह्यातील माजी महिला कबड्डी खेळांडु एकत्र येत एस. पी. फार्म हाऊस पेण येथे स्नेह संमेलन आयोजित केले होते. रायगड जिल्हा कबड्डी क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या माजी महिला कबड्डी खेळांडु एकत्र येत आपल्या जुन्या आठवणीना उजाळा दिला यातील बऱ्याचशा महिला खेळांडु पोलीस दलात इतर ठिकाणी कार्यरत आहेत. यामध्ये जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्टीय महिला खेळांडु सहभागी झाल्या होत्या.

## मयुरीचा विक्रम इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या योग शिक्षणक्रमाची विद्यार्थिनी मयुरी विजय शेलार हिने इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये आपले नाव नोंदवले आहे. तिने केवळ ३० सेकंदात ४७ चक्रासन पुश-अप्स करण्याचा विक्रम करून दाखवला आहे.

मयुरी मुक्त विद्यापीठाच्या पुणे येथील न्यू एज्युकेशन सोसायटी अभ्यास केंद्राची विद्यार्थिनी आहे. तिने याआधी मुक्त विद्यापीठाचा योगशिक्षक पदविका शिक्षणक्रम पूर्ण केला असून सध्या ती विद्यापीठाचाच एम.ए. योग शिक्षणक्रम शिकत आहे. मयुरीने २६ सप्टेंबर रोजी हा पराक्रम केला. ज्यास नुकतीच इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड अचिव्हर म्हणून मान्यता मिळाली आहे. या विक्रमासाठी तिला न्यू एज्युकेशन सोसायटी अभ्यास केंद्रप्रमुख डॉ. गिरीश धडफळे, योगशिक्षिका सुवर्णा भापकर तसेच सानिका बाम यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या प्रतिनिधी तथा रेकॉर्ड मॅनेजर मानसी सतेजा यांनी या विक्रमाची नोंद केली.



विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी रहाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, पुणे विभागीय केंद्र संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड व आरोग्य विज्ञान विद्याशाखा संचालिका डॉ. रश्मी रानडे यांनी या विक्रमाबद्दल मयुरी शेलारचे अभिनंदन केले आहे. आपल्या या यशाबद्दल बोलताना मयुरीने म्हटले की, मुक्त विद्यापीठातून योग डिप्लोमा आणि एम.ए. योग करत असताना मला खूप काही शिकायला मिळत आहे. अभ्यासकेंद्रातील शिक्षक व अधिकारी कर्मचारी यांचे उत्तम सहकार्य लाभले.

## अफगाणिस्तानचा टी-२० मध्ये झिम्बाब्वेवर ५३ धावांनी विजय

**। हरारे । प्रतिनिधी ।**

हरारे स्टेडियमवर झालेल्या पहिल्या टी-२० सामन्यात अफगाणिस्तानने झिम्बाब्वेचा ५३ धावांनी पराभव करून तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने ६ बाद १८० धावा केल्या. इब्राहिम झद्रानने ५२ धावांची अर्धशतक झळकावली. प्रत्युत्तरात झिम्बाब्वेचा डाव १२७ धावांवर संपुष्टात आला.

झाद्रान आणि गुरबाजची ७६ धावांची भागीदारी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, अफगाण संघाने इब्राहिम झाद्रान आणि रहमानुल्ला गुरबाज (३९) यांच्यासह शानदार सुरुवात केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ७६ धावांची भागीदारी केली. शेवटी, शाहिदुल्लाह कमालने १३ चेंडूत नाबाद २२ धावा करून संघाला १८० धावांपर्यंत पोहोचवले. झद्रानने त्याच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ११ वे अर्धशतक झळकावले. त्याने ३३ चेंडूत ५२ धावा केल्या, त्यात सहा चौकार आणि एक षटकार मारला. ५६ सामन्यांमध्ये त्याने २८.८२ च्या सरासरीने १,४४१ धावा केल्या आहेत, ज्याचा सर्वोच्च धावसंख्या ७२* आहे.

गुरबाज अफगाणिस्तानचा तिसरा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. गुरबाजने २५ चेंडूत ६ चौकार आणि १ षटकारासह ३९ धावा केल्या. यामध्ये त्याने नजीबुल्लाह झद्रानला मागे टाकले. यष्टीरक्षक फलंदाज गुरबाजने आतापर्यंत ७८ टी-२० सामन्यांमध्ये २५.११ च्या सरासरीने आणि १३२.९९ च्या स्ट्राईक रेटने १,९५९ धावा केल्या आहेत. अफगाणिस्तान संघासाठी त्याच्यापेक्षा जास्त धावा फक्त मोहम्मद नबी आणि मोहम्मद शहजाद यांनी केल्या आहेत.झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझाने २० धावा देत ३ बळी घेतले, तर वेगवान गोलंदाज ब्लेसिंग मुझारबानीने ४१ धावा देत २ बळी घेतले.झिम्बाब्वेचा डाव डळमळीत झाला; पहिल्या पाच षटकांत पाच विकेट पडल्या. १८६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, झिम्बाब्वेची सुरुवात निराशाजनक झाली. पहिल्या पाच षटकांत त्यांचा स्कोअर ३०/५ असा कमी झाला. अखेर संघ १२७ धावांवर आटोपला.

### ज्युनियर हॉकी विश्वचषक स्पर्धा | २८ नोव्हेंबरला तामिळनाडूमध्ये होणार

# पाकची जागा घेणार ओमान

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने बुधवारी जाहीर केले की, ज्युनियर हॉकी विश्वचषकात ओमान पाकिस्तानची जागा घेईल.

२०२४ च्या ज्युनियर आशिया कपमध्ये पाकिस्ताननंतर दुसऱ्या क्रमांकाचा संघ असल्याने ओमानला ही संधी मिळाली. ही स्पर्धा चेन्नई आणि मदुराई, तामिळनाडू येथे खेळवली जाईल. सामने २८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर दरम्यान होतील. पहिल्यांदाच, ज्युनियर हॉकी विश्वचषकात (पुरुष आणि महिला) प्रत्येकी २४ संघ सहभागी होतील. या स्पर्धेची शेवटची आवृत्ती २०२३ मध्ये मलेशियातील क्वालालंपूर येथे आयोजित करण्यात आली



होती. जर्मनीने ती जिंकली होती.

पाकिस्तान संघाने २४ ऑक्टोबर रोजी ज्युनियर हॉकी विश्वचषकातून माघार घेतली. त्यावेळी एफआयएचने म्हटले होते की, पाकिस्तान हॉकी फेडरेशनने अधिकृतपणे कळवले आहे की त्यांचा संघ स्पर्धेत सहभागी होणार नाही.पाकिस्तानचा गट ब मध्ये भारत, चिली आणि स्वित्झर्लंडसोबत समावेश होता. २२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर भारताच्या ऑपरेशन सिंदूरपासून भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. गेल्या महिन्यात बिहारमधील राजगीर स्टेडियमवर झालेल्या हॉकी आशिया कपमधून पाकिस्ताननेही माघार घेतली. ओमाननेही माघार घेतली. बांगलादेश आणि कझाकस्तानला स्पर्धेत स्थान देण्यात आले.

२८ सप्टेंबर रोजी झालेल्या अंतिम सामन्यात पाकिस्तानला हरवून भारतीय संघाने आशिया कप ट्रॉफी जिंकली. विजयानंतर, संघाने नक्वी यांच्याकडून आशिया कप ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ भारताने ही भूमिका घेतली.

नक्वी हे एसीसीचे अध्यक्ष असण्यासोबतच पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख देखील आहेत. ते पाकिस्तानचे गृहमंत्री म्हणूनही काम करतात.अंतिम सामन्यापूर्वी भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन केले नाही.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)